१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार । दि. ३ ऑक्टोबर २०२६ । अंक ११७ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## माजी जि.प. सदस्यांच्या सुनेची आत्महत्या

**पोलादपूर :** तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथे रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांच्या सुनेने गुरुवारी सकाळी राहत्या घरी गळफास घेतल्याची घटना घडली. गार्गी गणेश दरेकर (२४, पूर्वाश्रमीची नेहा सदाशिव दळवी) असे मृत विवाहितेचे नाव आहे. गार्गी या उशिरापर्यंत न उठल्याने कुटुंबियांनी दुसऱ्या चावीने खोलीचा दरवाजा उघडला असता त्या गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. घटनेची माहिती मिळताच पोलादपूर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला. मृत महिलेचा भाऊ प्रथमेश शिवाजी दळवी (२८) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## ‘शेतकरी, बचतगटांचे कर्ज माफ करा’

**बारामती :** दुष्काळी परिस्थितीमध्ये पाऊस पडला नाही तर माणसे कशी जगवायची हा प्रश्न आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी घेतलेले वैयक्तिक कर्ज आणि महिला बचत गटांचे कर्ज माफ करावे, अशी मागणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. शरद पवार यांनी पुणे जिल्ह्यातील दुष्काळी भागाचा पाहणी दौरा सुरू केला आहे. शुक्रवारी त्यांनी पुरंदर तालुक्यातील परिंचे गावात भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. पवार म्हणाले, राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी संकटात आहे.

### वेधक



## ट्रकमधून लोखंडी पाइप रस्त्यावर

**खांदा कॉलनी :** मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा खिंड परिसरात शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास मोठा अपघात होता होता टळला. गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या एका ट्रकचालकाचे अचानक नियंत्रण सुटल्याने ट्रक महामार्गाच्या संरक्षण कठड्याला धडकून पुन्हा मुंबईच्या दिशेने वळला. ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणावर लोखंडी पाइप तसेच संरक्षणासाठी वापरण्यात येणारे लोखंडी पत्रे होते. ट्रकचा तोल गेल्यानंतर हे साहित्य संरक्षण पत्रे तोडून पान २ वर



## शॉर्ट सर्किटमुळे स्टुडिओला आग

**आगरदांडा :** मुरुड शिघ्रे ग्रामपंचायत हद्दीतील शिघ्रे गावात पंकज भुरे यांच्या मालकीच्या पंकज फोटो स्टुडिओला शुक्रवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. या आगीत स्टुडिओमधील दोन संगणक, फोटो कॅमेरा, झेरॉक्स मशीन, व्हिडिओ कॅमेरा, पेपर, स्टुडिओ पडदे, खुर्च्या व इतर साहित्य जळून सुमारे ७ लाख ९० हजार रुपयांचे नुकसान झाले.

घटनेवेळी पंकज भुरे दुकान बंद करून जेवणासाठी घरी गेले होते. आग लागल्याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक पान २ वर

## अभिनेता दिनो मोरियाला अटक

**मुंबई :** मिठी नदी गैरव्यवहार प्रकरणी अभिनेता दिनो मोरिया याला मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी अटक केली. सुमारे आठ तासांच्या चौकशीनंतर त्याला राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. अधिक चौकशीसाठी त्याला मुंबई पोलीस आयुक्तालयात आणण्यात आले आहे. मिठी नदीतील कामांच्या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीने १३ जणांवर गुन्हे दाखल केले होते. त्यात दिनो मोरिया याचेही नाव समोर आले होते. यापूर्वी त्याचा जबाब नोंदवण्यात आला होता. शुक्रवारी पुन्हा चौकशीसाठी बोलावल्यानंतर त्याच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली.

### ग्यानू डन ब्रो, एक बिस्किट दो चाय, ज्ञानेश कुमार बाय बाय!

# ‘जेन नेक्स्ट’ची घोषणाबाजी

### ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी शिवाजी पार्क दणाणले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एक बिस्किट दोन चाय, ज्ञानेकुमार बाय बाय, ग्यानू बाबु इट्स डन ब्रो, एक चाय दोन खारी, ग्यानू अब तेरी बारी, अशा घोषणांनी शिवाजी पार्कचा आसमंत दणाणला. जेन नेक्स्टच्या आंदोलनात शुक्रवारी मोठ्या संख्येने तरुणांनी उपस्थिती लावली. शेतकरी कामगार पक्षासह तरुण, ज्येष्ठ नागरिकांनीही आंदोलकांना जोरदार पाठिंबा दिला. या आंदोलनात शेकापचे राज्य कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे उपस्थित होत्या.

अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वात शिवाजी पार्कात आज जेन नेक्स्टने एल्गार पुकारला. निवडणुकीतील कथित घोटाळ्यांच्या प्रकरणी पान २ वर






### ताानाशाहीविरोधात संविधान मांडू : ॲड. साम्या कोरडे

तुम्ही-आम्ही जिवंत आहोत आणि म्हणूनच आपली लोकशाही जिवंत राहिली पाहिजे, ही आपली जबाबदारी आहे. आज आपण येथे आलो आहोत. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी लोकशाहीचे खांब उद्ध्वस्त केलेले आहेत, यासाठी ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला पाहिजे. भारतात निवडणुका व्यवस्थित होणार नाहीत, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा शेतकारी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे यांनी दिला. आम्हाला मतदानाच्या पेट्यांपर्यंत पोहोचू द्यायचे नव्हते, हे भाजपाचे षडयंत्र होतं. अर्ज सहामध्ये १८ वर्षांवरील मुलं भरतात आणि नवीन मतदारांची नोंदणी करून घेतात. त्या अर्जामध्ये केलेले बदल इतर दोन निवडणूक अधिकाऱ्यांनी बेकायदा पान २ वर

## स्व. मीनाक्षीताईंच्या स्मृतिदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा

■ **अलिबागमध्ये नव्या पिढीच्या वक्तृत्वाला मिळणार हक्काचं व्यासपीठ**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरिय खुली वक्तृत्व स्पर्धा अलिबागमधील शेतकरी भवन येथे शनिवारी (दि.३) सकाळी नऊ वाजता सुरु होणार आहे. मीनाक्षी पाटील यांच्या अभ्यासू आणि प्रभावी वक्तृत्वाची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या नाविन्य उपक्रमातून नव्या पिढीच्या वक्तृत्वाला आज व्यासपीठ मिळणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेच्या न्याय हक्कासाठी लढा देणाऱ्या, महिलांचे प्रश्न सातत्याने विधिमंडळात मांडणाऱ्या शेकापच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. आपल्या राजकीय कारकीर्दीत तळागाळातील प्रश्न अभ्यासू वृत्तीने सातत्याने मांडण्याचे काम स्व. मीनाक्षी पाटील यांनी केले आहे. विधिमंडळात अभ्यासपूर्ण भाषणे आणि आक्रमक भूमिका ही त्यांची विशेष ओळख होती. आपल्या वक्तृत्वाची एक वेगळी छाप त्यांची राहिली आहे. पान २ वर

## रायगडसह संपूर्ण कोकण दुष्काळग्रस्त जाहीर करा

■ **शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख, मजुरांना २५ हजारांची मदत द्या**

■ **शशिकांत शिंदेंचा रायगडातून सरकारवर निशाणा**

**धम्मशील सावंत**

**। पाली/बेणसे ।**

राज्यात अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पाणी आणि चाऱ्याची तीव्र कमतरता जाणवत आहे, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केला. कोकणातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी रायगड दौऱ्यावर आलेल्या शिंदे यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेत सरकारवर जोरदार निशाणा साधला. रायगडसह संपूर्ण कोकण दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख, तर मजुरांना २५ हजार रुपयांची पान २ वर



### ‘राष्ट्रवादी काँग्रेस शेतकऱ्यांच्या सोबत’

**नागोठणे :** रायगड जिल्ह्यासह कोकण पट्ट्यातील शेतकऱ्यांना दुबार पेरणीला सामोरे जावे लागले असून, पावसाअभावी भाताची पिके पिवळी पडली आहेत. अनेक ठिकाणी पिके करपली असून, खाडीपट्ट्यात कंपन्यांनी सोडलेल्या केमिकलमुळे शेती नापीक झाल्याने शेतकरी हवालदिल आहेत. त्यामुळे दुष्काळग्रस्त म्हणून वगळलेले रायगडसह कोकणातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट करावेत, अशी ठोस भूमिका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नागोठणे येथे प्रसारमाध्यमांसमोर मांडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची आग्रही मागणी राज्य सरकारकडे केली आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार, जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उपाध्यक्ष सज्जाद डावरे, जिल्हा सचिव पान २ वर

### मुंबई-गोवा महामार्गावरही निशाणा

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामावर टीका करताना हा मार्ग निकृष्ट दर्जाच्या कामामुळे दयनीय अवस्थेत असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. ठेकेदारांची क्षमता न पाहता कामे दिल्याने महामार्गाची अवस्था झाली असून, या कामात पैशांची लूट सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. महामार्गाच्या कामात दोषी असणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

## ऐन पाणीटंचाईत सिडकोचे पिण्याचे पाणी बांधकामासाठी



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

एकीकडे पनवेल परिसरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना दुसरीकडे सिडकोच्या पंपिंग स्टेशनमधून पिण्याचे पाणी भरलेला टँकर थेट बांधकाम साईटवर जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. समाजसेवक प्रशांत रणवरे यांनी संबंधित टँकरचा पाठलाग करून बांधकाम सुरू असलेल्या इमारतीला पाणीपुरवठा करताना तो पकडला.

मिळालेल्या माहितीनुसार, सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाच्या पंपिंग स्टेशनमधून पाणी भरल्यानंतर एक टँकर तेथून निघाला. या टँकरचा रणवरे यांनी पाठलाग केला. संबंधित टँकर बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर तेथे बांधकामासाठी पाणी सोडले जात पान २ वर

## महिलेला चाकूचा धाक दाखवून लुटले

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

बारवई येथे चहाच्या टपरीवर असलेल्या महिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्याकडील सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाईल फोन आणि रोख रक्कम जबरदस्तीने लुटल्याची घटना वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीलगत घडली. या प्रकरणातील एका आरोपीला गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने अवघ्या चार तासांत अटक केली असून, त्याच्याकडून चोरीचा मोबाईल, गुन्ह्यात वापरलेला चाकू, दोन लोखंडी कोयते आणि काळ्या रंगाची बॅग हस्तगत करण्यात आली आहे. अन्य तीन आरोपी फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मीना कातकरी या पान २ वर

## बेसुमार बॉक्साईट उत्खननामुळे दुष्काळ?

### बागायती व शेतीचे अतोनात नुकसान

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

शासनाकडून श्रीवर्धन तालुका अधिकृतपणे दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आला असून, बाधित शेतकरी व बागायतदारांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. मात्र, तालुक्यात सध्या जाणवणारा तीव्र उष्णतेचा तडाखा आणि शेती-बागांचे झालेले प्रचंड नुकसान यामागे केवळ निसर्गाचा कोप नसून, तालुक्यातील बेसुमार बॉक्साईट उत्खनन मुख्यत्वे कारणीभूत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. राज्य सरकारच्या दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत रायगडमधून श्रीवर्धनचा समावेश करण्यात आला आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील हरवीत, कुडगाव, मेघरे, गुळधे, वांजळे, मामवली, भरडोली, पान २ वर



### पावसाअभावी श्रीवर्धनच्या भातशेतीवर संकट

**श्रीवर्धन :** तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाल्यानंतर श्रीवर्धनमधील भातशेतीसमोर पाण्याच्या टंचाईचे गंभीर आव्हान उभे राहिले आहे. अल निनोच्या पार्श्वभूमीवर पावसात पडलेल्या खंडामुळे भातखाचरांमध्ये अपेक्षित पाणीसाठा राहिलेला नाही. परिणामी, वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असलेल्या पिकाला पाण्याचा ताण जाणवत असून, उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या हवामानावर आधारित कृषी सल्ल्यानुसार शेतकऱ्यांनी भातखाचरांमध्ये पान २ वर


शेकाप

सस्नेह निमंत्रण..

प्रति, मा.

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी

यांच्या संयुक्त विद्यमाने...



स्व. मीनाक्षीताई पाटील स्मृती

रायगड जिल्हास्तरीय

खुली वक्तृत्व स्पर्धा २०२६

सप्रेम नमस्कार

स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी तसेच युवकांमध्ये वक्तृत्वकला, सामाजिक जाणीव व वैचारिक प्रबोधन वाढावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धा – 2026 या कार्यक्रमास आपली विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लाभावी, ही नम्र विनंती. आपल्या उपस्थितीने स्पर्धकांना निश्चितच प्रेरणा मिळेल आणि कार्यक्रमाची शोभा वाढेल.

शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६ | वेळ : सकाळी ९:३० वा |
स्थळ : शेतकरी भवन, अलिबाग

•आयोजक: शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी


उमेदमुळे महिलांचे व्यवसायात यशस्वी पाऊल | नवनवीन संधींमुळे आर्थिक स्थैर्यप्राप्तीसाठी हातभार

## गणेशमूर्ती विक्रीतून बचतगटांची कोटींची झेप

**1,57,612/-** गणपतीमूर्तींची विक्री

**15,74,59,000/-** उलाढाल





**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढकारातून उमेद अभियानांतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक थैर्य प्राप्त झाले आहे. गणेशोत्सवात जिल्ह्यातील सुमारे २४७ बचतगटांतील महिलांनी १ लाख ५७ हजार ६१२ गणेशमूर्तींची विक्री केली आहे. यातून तब्बल १५ कोटी ७४ लाख ५९ हजार रुपयांची उलाढाल झाली आहे.

रायगड जिल्ह्यात नुकताच गणेशोत्सव उत्साहात पार पडला. रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीव काम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना खास ओळख प्राप्त झाली असून, गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील महिला बचतगटही उतरले आहेत.या व्यवसायासाठी ‘उमेद’ पान २ वर

# लाखभर मतदारांच्या नोंदींवर प्रश्नचिन्ह

■ **एसआयआरच्या धावपळीत पनवेलकरांची तारांबळ;**

■ **लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांच्या लांबच लांब रांगा**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मतदार यादीतील नोंदींच्या विशेष सखोल पुनरीक्षणाने (एसआयआर) पनवेलकरांची चांगलीच धावपळ उडाली आहे. सुमारे दीड लाख मतदारांच्या नोंदींमध्ये बदल किंवा दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाल्याचे सांगितले जात असून, त्यापैकी सुमारे २७ हजार मतदारांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे कागदपत्रे घेऊन संबंधित केंद्रांवर पोहोचणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली असून, लहान मुलांसह पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र आहे.

नाव, पत्ता, नातेवाईकांची माहिती किंवा जुन्या मतदार यादीतील नोंदींमध्ये तफावत आढळल्यास मतदारांकडून कागदपत्रे मागवली जात आहेत. त्यामुळे 'मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी नव्हे, तर मतदार यादीत आपले नाव असल्याचे सिद्ध करण्यासाठीच धावपळ' अशी भावना काही नागरिकांनी व्यक्त केली.

एसआयआर प्रक्रियेत बूथ लेव्हल अधिकाऱ्यांकडून (बीएलओ) घरोघरी जाऊन माहिती घेणे, गणना अर्ज देणे व स्वीकारणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्ष प्रक्रियेत नागरिकांना कागदपत्रांसाठी केंद्रांवर यावे लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.




**मतदारांनी काय करावे?**

नोटीस मिळालेल्या मतदारांनी घाबरून न जाता आपले नाव प्रारूप मतदार यादीत तपासावे आणि आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. नाव, पत्ता किंवा इतर तपशीलात दुरुस्ती असल्यास निर्धारित मुदतीत दावा किंवा हरकत नोंदवावी. एसआयआरसाठी निवडणूक विभागाने मतदारांना नाव तपासणे आणि आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, नोकरी-व्यवसाय करणाऱ्या तरुणांना कामातून वेळ काढावा लागत आहे. लहान मुलांना सोबत घेऊन आलेल्या पालकांचीही मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे 'मतदारांच्या सोयीसाठी असलेली यंत्रणा मतदारांनाच कार्यालयाच्या दारात का उभी करते?' असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील दावे व हरकती दाखल करण्याची मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत वाढवली असून, त्यावरील कार्यवाहीची मुदत १० नोव्हेंबरपर्यंत करण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. तसेच, नव्या सूचनेनुसार नोटीस मिळालेल्या अनेक मतदारांना प्रत्यक्ष कार्यालयात सुनावणीसाठी येण्याची आवश्यकता नसून, बीएलओंकडून कागदपत्रे घरून घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# वरप ग्रामपंचायतीत कथित गैरव्यवहाराचा आरोप

■ **उपसरपंचांसह सात सदस्य राजीनाम्याच्या तयारीत**

■ **ग्रामसेवक-सरपंचांच्या कारभारावर सदस्यांचा गंभीर आक्षेप**

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वरप येथे २०२३ पासून विकासकामे व साहित्य खरेदीच्या नावाखाली कथित अनियमितता झाल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्यांनी केला आहे.

ग्रामसेवक व सरपंचांच्या कथित मनमानी कारभाराविरोधात उपसरपंच शोभा पांडुरंग दोरे यांच्यासह सात सदस्य आक्रमक झाले असून, ठोस कारवाई न झाल्यास राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे.

याप्रकरणी उपसरपंचांसह सात सदस्य व सामाजिक कार्यकर्त्यांनी १० ऑगस्ट २०२६ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती पेण गजानन लेंडी यांच्याकडे तक्रार करून ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी केली होती.



माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांमध्ये काही खरेदीच्या पावत्यांमध्ये विसंगती असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. प्रत्यक्ष साहित्य खरेदी, खर्च आणि पावत्यांबाबत प्रश्न उपस्थित करत काही ठिकाणी रकमा फुगवून दाखविल्याचा तसेच परस्पर ठराव करून खर्च केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनंतर विस्तार अधिकारी विक्राती तांडेल यांनी दोन वेळा चौकशी केल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. मात्र, चौकशीचा निष्कर्ष अद्याप कळविण्यात आला नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे संपूर्ण आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी उपसरपंच शोभा दोरे, खुमा दोरे व उमा दोरे यांनी केली आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीच्या पाहणीवेळी सरपंच गणेश मनवे व ग्रामसेवक के.पी. पाटील यांची भेट झाली नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे त्यांची आरोपांवरील प्रतिक्रिया मिळू शकली नाही. दरम्यान, प्रशासनाच्या चौकशीनंतर आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे स्पष्ट होणार आहे.

पान १ वरुन

## जेन नेक्स्टची घोषणाबाजी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनात बॉलिवूडमधील कलाकर नसीरुद्दीन शाह, शबानामा आझमी, गायक विशाल ददलानी हे उपस्थित होते. विशेष म्हणजे कामाठी पुरातील महिला देखील आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. तसेच रखरखत्या उन्हात सकाळपासूनच आंदोलक शिवाजी पार्कवर धडकत होते. कोणालाही कसला त्रास झाल्यास संबंधितांना तत्काळ उपचार मिळावे याकरिता नवी मुंबईतले डॉ नितीन दिघे व खोपोली येथील डॉ. पठाण हे आंदोलनाच्या ठिकाणी प्रथमोपचाराचे साहित्य घेऊन तैनात होते. दुपारपासूनच शेकडो जेन नेक्स्टने शिवाजी पार्कात ठाण मांडलं होतं. हातात तिरंगा घेऊन ज्ञानू, डन ब्रोच्या घोषणा देत हे तरुण शिवाजी पार्कात जमले होते.

**जोर से बोलो, गो ज्ञानू गो**

यावेळी जेन नेक्स्टने त्यांच्या जनरेशनच्या भाषेतील घोषणा दिल्या. संपूर्ण परिसर दणाणून सोडला. ग्यानू मस्ट गो, ग्यानू डन ब्रो, एक बिस्किट दो चाय, ग्यानेश कुमार बाय बाय, धर्मेंद्र प्रधान झांकी है, ज्ञानेश कुमार बाकी है. जोर से बोलो, गो ज्ञानू गो, एक कचोरी, दो समोसा ज्ञानू पर नही भरोसा आदी घोषणांनी तरुणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय अशा मराठी घोषणाही देण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण शिवाजी पार्क परिसर दणाणून गेला होता.

**जय भीम जय शिवाजी**

जय जय जय जय जयभीम जयभीम जयभीम, जोर से बोलो जयभीम जय भवानी, जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, भारत माता की जय, वंदे मातरम वंदे मातरम आदी घोषणाही तरुणांनी दिल्या.

**आंदोलकांपेक्षा पोलिसांची संख्या जास्त**

आंदोलन सुरू झाल्यानंतर मंत्रालयाची आंदोलनाच्या बाजूकडील दोन्ही प्रवेशद्वार बंद करण्यात आली होती. नवीन प्रशाकीय इमारतीचेही प्रवेशद्वार बंद करण्यात आले होते. मंत्रालय परिसरात सुरक्षेसाठी तैनात असलेला पोलिस फौजफाटा सतर्क झाला होता. त्यामुळे आंदोलकांपेक्षा पोलिसांचीच संख्या जास्त दिसत होती.

## तानाशाहीविरोधात संविधान मांडू : ॲड. साम्या कोरडे

असल्याचे म्हटले आहे. त्याविरोधात आम्ही बोलायला लागलो तेव्हा त्यांना बदल करावा लागला. पहिली लढाई आपण जिंकलो आहोत. भारतामध्ये जेथे जेथे एसआयआर झाले, पश्चिम बंगाल, बिहार येथे ज्या ज्या ठिकाणी एसआयआरमध्ये मतदारांची नावे वगळली गेली, तेथे तेथे भाजपाच्या उमेदवारांचा विजय झाला. आज महाराष्ट्रामध्येही एसआयआरची प्रक्रिया केली जाते. महाराष्ट्राच्या याद्यांवरून दोन कोटी मतदारांची नावे वगळली गेली आहेत, म्हणून एसआयआरसुद्धा रद्द झाला पाहिजे.काहीजण विचारतात, हा राजीनामा होईल काय? पण कोणालाही वाटलं नव्हतं की धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होईल. आपण प्रश्न विचारत राहिले पाहिजेत. प्रश्न विचारले की बदल नक्की घडतो. आज आपण आंदोलन करतोय आणि सत्ताधारी पक्षालाही आपल्या आंदोलनाविरुद्ध मुंबईत आंदोलन करावं लागतंय, ही त्यांची हार आहे. आम्ही निवडणूक आयोगाला प्रश्न विचारतो आणि उत्तर भाजपाची लोकं देतात, ही त्यांची हार आहे. जेव्हा जेव्हा ते तानाशाही मांडतील, तेव्हा तेव्हा आपण भारतीय संविधान मांडू, असा स्पष्ट इशाराही कोरडे यांनी दिला.

## रायगडसह संपूर्ण कोकण दुष्काळग्रस्त जाहीर करा

मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.दुष्काळी तालुके टप्प्याटप्प्याने जाहीर करण्याच्या निर्णयावर शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला. रायगडमध्ये केवळ श्रीवर्धन तालुक्याचा समावेश करण्यात आला असून, जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांनाही दुष्काळाच्या झळा बसत आहेत. त्यामुळे संपूर्ण कोकणाचा दुष्काळी परिस्थितीत समावेश करावा, अशी मागणी त्यांनी केली. मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.रायगडकडे दुर्लक्ष होत असल्याच्या प्रश्नावर शिंदे यांनी पालकमंत्रीपदाच्या मुद्द्यावरही भाष्य केले. अनेक वर्षे रायगडला पालकमंत्री नव्हता. आता पालकमंत्री म्हणून भरत गोगावले यांनी जनतेच्या अपेक्षेप्रमाणे काम करावे, असे ते म्हणाले. सरकारने शेतकरी आणि जनतेपर्यंत पोहोचणे गरजेचे असून, सरकारला जनतेच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपवर्गीकरण आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना शिंदे यांनी सत्तेसाठी विविध समाजघटकांना आश्वासने दिली जात असल्याचा आरोप केला. विविध जाती-धर्मांमध्ये संघर्ष निर्माण करून सत्तेचे राजकारण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगत, समाज आता वस्तुस्थिती समजून घेत असल्याने परिवर्तन अटळ असल्याचा दावा त्यांनी केला.अजितदादा यांच्या मृत्यूबाबत बोलताना शशिकांत शिंदे यांनी सरकार, सीबीआय आणि सीआयडीकडून झालेल्या चौकशीची माहिती अद्याप सार्वजनिक करण्यात आलेली नसल्याचा दावा केला. सत्य बाहेर आले पाहिजे, अशी जनतेची भावना असून ते अद्याप समोर येत नसल्याचे ते म्हणाले. इतके मोठे नेतृत्व केलेल्या व्यक्तीच्या मृत्यूबाबत एफआयआर नसल्याने शंका उपस्थित होत असल्याचेही त्यांनी म्हटले.

रायगडमध्ये पक्ष संघटना मजबूत करण्यावरही शिंदे यांनी भर दिला. रायगड हा शरद पवार यांना मानणारा जिल्हा असून कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केल्यास जनता पक्षाच्या पाठीशी उभी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच बँका आणि सावकारांनी संकटातील शेतकऱ्यांना त्रास देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.अभिजित दिपके यांच्या सामाजिक चळवळीबाबतही शिंदे यांनी भाष्य केले. ही चळवळ राजकीय पक्षविरहित आणि सामाजिक स्वरूपाची असल्याचे सांगत, अशा चळवळीत राजकीय पक्षांनी सहभागी होणे योग्य आहे का, यावर त्यांनी भूमिका मांडली. जनतेच्या विविध प्रश्नांवर महाविकास आघाडी प्रभावीपणे एकत्र येऊन काम करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आगामी निवडणुका ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर घेण्याची मागणीही शिंदे यांनी केली. दरम्यान, दिवेआगर समुद्र दुर्घटनेत आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त करून मृतांच्या कुटुंबियांना सरकारने आवश्यक मदत द्यावी, अशी मागणी केली.

## स्व. मीनाक्षीताईंच्या स्मृतिदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा

यांच्या आठवणींना उजाळा देण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वाचन, अभ्यास, विचार मांडण्याची क्षमता आणि प्रभावी वक्तृत्व विकसित व्हावे, या उद्देशाने शेकापच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. स्व. मीनाक्षी पाटील यांच्या सार्वजनिक जीवनात वक्तृत्व, नेतृत्व आणि सामाजिक प्रश्नांवरील सातत्यपूर्ण भूमिका यांना विशेष महत्त्व होते. त्यामुळे अलिबागमध्ये स्व. मीनाक्षीताई पाटील स्मृती रायगड जिल्हास्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा घेतली जाणार आहे. 'आजचा विद्यार्थी आणि उद्याचा भारत', 'रायगडचा विकास आणि जनतेची अपेक्षा', 'सत्तेच्या सिंहासनावर नव्हे, जनतेच्या हृदयात घर करणारी ताई- मीनाक्षीताई', 'कलम जब जागती है तब सत्ता कांपती है, मजबुती का नाम महात्मा गांधी', 'जखमी लोकशाहीच्या कपाळावर आशेचे कुंकू लावतीय मी' अशा वेगवेगळ्या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा घेतली जाणार आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विजेत्याला १५ हजार एक रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला ११ हजार एक रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला सात हजार एक रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकाला पाच हजार एक आणि चषक, पाचव्या क्रमांकाला तीन हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच पाच उत्तेजनार्थ म्हणून पाच बक्षिसे दिली जाणार आहेत. त्यामध्ये प्रत्येकी दोन हजार रोख व चषक देऊन सन्मानित केले जाणार आहे.

## महिलेला चाकूचा धाक दाखवून लुटले

बारवई येथील चहाच्या टपरीवर असताना चार आरोपी तेथे आले. त्यांनी कातकरी यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाईल फोन तसेच रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.घटनेनंतर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने तपास सुरू करून चोरीला गेलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण केले. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला.त्यानंतर इंदापूर पोलिसांच्या मदतीने मंगेश देसाई काळे ऊर्फ राहुल कांता राज पवार ऊर्फ मंजू (१९) याला ताब्यात घेण्यात आले. तो सध्या सरडेवाडी, इंदापूर येथे राहात असून, मूळचा डोमेगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलिसांनी आरोपीकडून चोरीचा मोबाईल, गुन्ह्यात वापरलेला चाकू, दोन लोखंडी कोयते आणि काळ्या रंगाची बॅग जप्त केली आहे. दरम्यान, तपासादरम्यान आरोपीचा पोलीस ठाण्यातील जबरी चोरीच्या गुन्ह्यासह शहापूर पोलीस ठाणे तसेच इचलकरंजी, कोल्हापूर येथील आणखी एका गुन्ह्याशी संबंध असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणातील फरार असलेल्या अन्य तीन आरोपींचा पोलीस शोध घेत असून, पुढील तपास सुरू आहे.

## ऐन पाणीटंचाईत सिडकोचे पिण्याचे पाणी बांधकामासाठी

असल्याचे निदर्शनास आले.पनवेल परिसरातील नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या अडचणींमुळे टँकरचा आधार घ्यावा लागत असताना पंपिंग स्टेशनमधून भरलेले पाणी बांधकामासाठी वापरले जात असल्याचे समोर आल्याने पाणीवाटप व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या घटनेबाबत सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी प्रशांत चाहरे यांच्याकडे विचारणा करण्यात आली. टँकरचालकाने परस्पर हा प्रकार केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच संबंधित चालकावर योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.दरम्यान, पाणीटंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्याचा वापर कोणत्या कारणासाठी केला जातो, याची स्पष्टता होणे आवश्यक असल्याचे रणवरे यांनी सांगितले. संबंधित प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी केली.

नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी येत असताना बांधकाम साईटवर पाण्याचा टँकर आढळला. या पाण्याचा वापर कोणत्या कारणासाठी करण्यात आला, याची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी.

– प्रशांत रणवरे, समाजसेवक

टँकरचालकाने परस्पर हा प्रकार केला आहे. संबंधित टँकरचालकावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

– प्रशांत चाहरे, अधिकारी, सिडको पाणीपुरवठा विभाग

## बेसुमार बॉक्साईट उत्खननामुळे दुष्काळ?

गडबवाडी, बापवली, कुरवडे आणि मारळ या भागात शासनाची मंजुरी मिळालेले अधिकृत खनिज पट्टे आहेत. मात्र, या उत्खननाचे पर्यावरणावर आणि स्थानिक हवामानावर गंभीर आणि दूरगामी दुष्परिणाम झाल्याचा दावा करण्यात येत आहे. बॉक्साईटचे साठे मुख्यतः डोंगररांगा आणि घनदाट जंगलात असल्याने उत्खननासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली. त्यामुळे हवेतील कार्बन शोषून घेणारी नैसर्गिक यंत्रणाच कोलमडून पडल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.वृक्षतोड आणि अवजड यंत्रसामग्रीच्या वापरामुळे वातावरणात हरितगृह वायूंचे प्रमाण वाढून स्थानिक तापमानात कमालीची वाढ झाल्याचा दावा करण्यात येत आहे. पाऊस अडवून भूगर्भात पाणी जिरवणारे डोंगर आता उघडे पडल्याने पावसाचे पाणी वाहून जाते, त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खालावली आहे. बाष्पोत्सर्जनाची क्रिया मंदावल्याने पावसाने आस दिली असून, श्रीवर्धन तालुका दुष्काळाच्या छायेत लोटला गेला आहे. तसेच सुपीक मातीचा थर नष्ट झाल्याने जमीन पडीक होऊ लागली आहे.

केवळ आर्थिक मदत देऊन हा प्रश्न सुटणारा नाही. बेसुमार बॉक्साईट उत्खननाने श्रीवर्धनच्या पर्यावरणाचा बळी घेतला आहे. मुख्यत्वे उष्णता वाढीने सुपारी गळ सुरू झाली आहे. शासनाने त्याचाही पंचनामा करावा. तसेच नारळ, आंबा, काजू पीकही संकटात सापडले आहे. शासनाने या उत्खननावर तातडीने कडक नियंत्रणे आणावीत. अन्यथा श्रीवर्धन रोठा सुपारी, नारळ, आंब्यांचे उत्पादन कमालीचे घटणार असून, श्रीवर्धन तालुका हा भाताचे कोठार ही ओळखही पुसली जाईल.

**– वसंत यादव, समाजसेवक, श्रीवर्धन**

## गणेशमूर्ती विक्रीतून बचतगटांची कोटींची झेप

अभियानामार्फत महिला बचतगटांना फिरता निधी तसेच ग्रामसंघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात येतो. यामुळे महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. गणेशोत्सवात जिल्ह्यातील सुमारे २४७ बचतगटातील महिलांनी १ लाख ५७ हजार ६१२ गणपतीमूर्तींची विक्री केली आहे. यातून तब्बल १५ कोटी ७४ लाख ५९ हजार रुपयांची उलाढाल झाली आहे. त्या माध्यमातून उपजीविकेच्या नवनवीन संधी निर्माण होऊन महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करता येत आहे.

| तालुका | विक्री केलेल्या मूर्तींची संख्या | एकूण उलाढाल |
|---|---|---|
| अलिबाग | ३२८ | ७८१००० रु. |
| कर्जत | ६१४ | १३४३००० रु. |
| खालापूर | ९५० | १९७५००० रु. |
| महाड | ७० | १७५००० रु. |
| माणगाव | २१२५ | ३४७५००० रु. |
| मुरुड | २०६० | ३३६५००० रु. |
| पनवेल | १८० | ५००००० रु. |
| पेण | १४९५०५ | १४२७५५००० रु. |
| रोहा | १९५ | ३९०००० रु. |
| श्रीवर्धन | २४० | ४६०००० रु. |
| सुधागड | ६०० | ८००००० रु |
| तळा | १५० | २८०००० रु. |
| उरण | ५९५ | ११६०००० रु. |
| **एकूण** | **१,५७,६१२** | **१५,७४,५९,००० रु.** |

## 'राष्ट्रवादी काँग्रेस शेतकऱ्यांच्या सोबत'

श्रीहर्ष कांबळे, रुपेश खांडवे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्षा अश्विनी ठाकूर, रोहा तालुका अध्यक्ष तुषार खरीवले, रोहा तालुका युवक अध्यक्ष मुजाहिद मुजावर, रत्नाकर मोकल, सहैफ शेख, मेधा खरीवले, दिनेश काटकर, राजू रोडेकर, आरिफ दुकानदार, अबू गोरमे, अजय डावरे आदींसह नागोठणे, रोहा, सुधागड, माणगाव तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

## .. श्रीवर्धनच्या भातशेतीवर संकट

शक्यतो ५ ते १० सेंटीमीटर पाण्याची पातळी राखावी. पाणी उपलब्ध असल्यास नदी, नाले, विहिरी, शेततळी किंवा अन्य स्रोतांमधून पाणी वळवून पीक वाचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोंबी बाहेर पडणे, पोटरी किंवा फुलोरा अवस्थेतील पिकाला पाण्याचा ताण असल्यास एक टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. फुलोरा अवस्थेत युरियाचा तिसरा हप्ता जमिनीत पुरेसा ओलावा असतानाच द्यावा. ओलावा नसल्यास पाऊस होऊन वाफसा येईपर्यंत खत देणे पुढे ढकलावे. निमगरव्या व गरव्या भात जाती वाढीच्या अवस्थेत असल्यास तणांचा प्रादुर्भाव झालेल्या शेतात तातडीने बेणणी करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

## ट्रकमधून लोखंडी पाइप रस्त्यावर

खाली कोसळले. त्यामुळे कर्नाळा पक्षी अभयारण्याकडून महामार्गावर येणाऱ्या भुयारी मार्गाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर लोखंडी पाइप रस्त्यावर पडले. लोखंडी साहित्य रस्त्यावर विखुरल्याने भुयारी मार्गातील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली. आज शासकीय सुट्टी असल्याने मोठ्या प्रमाणावर पर्यटक आपल्या गाड्या घेऊन लहान मुलांसह कुटुंबासोबत प्रवास करत होते. त्यामुळे या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने अपघाताच्या वेळी या ठिकाणी कोणतेही वाहन अथवा नागरिक लोखंडी पाइपच्या थेट आघातात आले नाहीत. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

दरम्यान, या भुयारी मार्गाच्या परिसरात अनेक रिक्षाचालक आपली वाहने उभी करतात. त्यामुळे अपघाताच्या वेळी रिक्षा किंवा प्रवासी तेथे असते तर गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता होती. या घटनेमुळे भुयारी मार्ग परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी लोखंडी पाइप आणि इतर साहित्य हटविण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, महामार्गावर अशा प्रकारे अवजड वाहनांचे नियंत्रण सुटणे आणि साहित्य रस्त्यावर कोसळणे ही बाब वाहनचालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनक आहे.या परिसरात रिक्षा उभ्या करण्यासह अवजड वाहनांच्या हालचालींवरही संबंधित यंत्रणांनी लक्ष देण्याची गरज आहे. कर्नाळा खिंड आणि भुयारी मार्ग परिसरात भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक आणि स्थानिकांकडून होत आहे.

## शॉर्ट सर्किटमुळे स्टुडिओला आग

ग्रामस्थांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला तसेच मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाला माहिती दिली. अग्निशामक दल व नागरिकांच्या प्रयत्नांनी आग आटोक्यात आल्याने शेजारील घरांना धोका टळला.

महसूल तलाठी विरुकुड मॅडम यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. या घटनेमुळे पंकज भुरे यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून, शासनाने लवकरात लवकर भरपाई द्यावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे नसरापूर, ता. कर्जत जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री गोपीचंद चेलाराम छाब्रिया यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असून, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे नसरापूर, तालुका कर्जत, जिल्हा रायगड.**

| सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.प्र | आकार |
|---|---|---|---|
| ६१ | १/ड/१/अ/२ | ०.२७.०० | ०.२७ |

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्युपत्रांकित, चार्ज, लिन, वगैरे, कोणत्याही प्रकारचा, हक्क असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली.

ठिकाण-

तारीख :- ०३.१०.२०२६

सही/-

**अधिवक्ता पोर्णिमा आनंद जाधव**

मो.नं ९७६४५४७६४३

पत्ता-मार्वल शिप्रा मुद्रे बुद्रुक कर्जत रायगड

दि. २/१०/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक नयना शरद धुरी यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कुरकुंडी, कोलटेंभी ता.अलिबाग | २२७ | ०-४८-००<br>पो.ख ०-०३-००<br>एकूण ०-५१-०० | ०.७७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी नयना शरद धुरी यांच्या हिश्याचे एकुण क्षेत्र ०-१७-०० हे.आर.आकार ०.२७ रु.पै ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त , पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानस सुधाकर पाटील**

मु.आंबेघर, पो.पोयनाड

ता.अलिबाग, जि. रायगड.

मोबा.नं. ७७४३८०९६५३

RDCC Bank
Let's grow together
ISO 9001:2008 BANK

**THE RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD., ALIBAG**

(District Central Co-operative Bank in Maharashtra)
Head Office: Alibag - Raigad, Maharashtra

**INVITING PROPOSAL FOR DR RACK HOSTING**

The Raigad District Central Co-operative Bank Ltd., Alibag, a leading District Central Co-operative Bank in Maharashtra, invites sealed Technical and Financial Proposals from eligible, experienced, and reputed Data Center Service Providers for providing Rack Hosting/ Colocation Services for the Bank's Disaster Recovery (DR) Infrastructure.
The Bank will install and maintain its own physical servers, storage, network devices, and other IT hardware at the selected Data Center.

SCOPE OF WORK

1. Provision of one full 42U server rack for hosting the Bank's Disaster Recovery (DR) infrastructure.
2. The Bank will install its own servers, storage, firewall, switches, network equipment, and other DR hardware in the allocated rack.
3. Provision of required continuous electrical power for the Bank's installed equipment.
4. Provision of a secure and reliable Data Center environment suitable for hosting critical banking infrastructure.
5. Required physical security, access control, CCTV surveillance, fire protection, cooling, and environmental facilities shall be provided by the Data Center.
6. The service shall be provided on a rack colocation / rental basis, including applicable rack space and power charges.

Interested vendors meeting the eligibility criteria may obtain the detailed Request for Proposal (RFP) from the Bank.

The completed Technical and Financial Proposals shall be submitted on or before **12-10-2026 up to 05:00 P.M. at Head Office, Alibag.**

For further details, please contact:
**The Raigad District Central Co-operative Bank Ltd., Alibag**

Phone: 02141-224315 | Email: tender@rdccbank.in

Date : 03-10-2026
Place: Alibag

Chief Executive Officer
The Raigad District Central
Co-operative Bank Ltd., Alibag

# नि|व|ड|क

## एनआयएसएम-सेबी रस्त्यावर मद्यप्राशन करणाऱ्यांचा उपद्रव

**रसायनी :** मोहोपाडा येथील एनआयएसएम-सेबी रस्त्यावर रात्री आठनंतर काही तरुणांकडून भररस्त्यावर मद्यप्राशन केले जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या महिला व नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचे सांगण्यात येत आहे. या मार्गावर रात्रीच्या वेळी काही जण मद्यप्राशन करून रस्त्याच्या कडेला तसेच सार्वजनिक ठिकाणी बसत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे कामानिमित्त किंवा इतर कारणासाठी सायंकाळनंतर या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या महिलांना असुरक्षित वाटत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर हरेश उतेकर यांनी पोलिसांकडे या प्रकाराची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. मोहोपाडा-एनआयएसएम-सेबी रस्त्यावर सायंकाळी सातनंतर नियमित पोलीस गस्त वाढवावी, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी उतेकर यांनी केली आहे. संध्याकाळी या मार्गावरून मोठ्या संख्येने महिला व नागरिक ये-जा करतात. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांमुळे महिलांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याने रसायनी पोलिसांनी या भागात नियमित गस्त घालून परिस्थितीवर नियंत्रण ठेवावे, अशी स्थानिक नागरिकांकडूनही होत आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत नागरिकांकडून व्हिडिओच्या माध्यमातूनही तक्रारी करण्यात येत असून, पोलिसांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## म. गांधींच्या पुतळ्याभोवती वाहनांचा गराडा

**उरण :** महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील गांधीजींच्या पुतळ्याला नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नगरपालिका कर्मचारीही उपस्थित होते. मात्र, गांधी जयंतीच्या दिवशीच गांधीजींच्या पुतळ्याभोवती वाहनांचे पार्किंग झाल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यांच्या जयंतीदिनीच पुतळ्याभोवतीचा परिसर पार्किंग झोन बनल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे गांधीजींच्या पुतळ्याला हार घालून अभिवादन करण्यापुरतेच प्रशासनाचे कर्तव्य आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पुतळ्याच्या परिसरात वाहनांचे बेशिस्त पार्किंग होत असताना नगरपालिका प्रशासनाचे याकडे लक्ष का गेले नाही? गांधी जयंतीसारख्या दिवशी तरी पुतळ्याभोवतीचा परिसर स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त ठेवण्याची जबाबदारी कोणाची? असे प्रश्न नागरिक विचारत आहेत. गांधीजींच्या विचारांना अभिवादन करताना परिसराचा सन्मान जपला जाणे अपेक्षित आहे. मात्र, पुष्पहार अर्पण करून प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी निघून जातात आणि पुतळ्याभोवती पुन्हा वाहनांचा गराडा पडतो, अशी स्थिती असेल तर हा गांधीजींच्या विचारांचा सन्मान की केवळ औपचारिकता, असा सवाल आता उरणकरांकडून उपस्थित होत आहे.



## परतीच्या पावसाने नागरिकांची त्रेधातिरपीट

**खांदा कॉलनी :** सध्या परतीचा पाऊस सुरू झाला आहे. सायंकाळच्या सुमारास वाऱ्यासह पाऊस कोसळत असल्याने त्याचा फटका झाडांना बसत आहे. झाडे कोसळल्याने तालुक्यातील अनेक ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता. बुधवारी सायंकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे ग्रामीण भागातील आकुर्ली, चिपळे जवळील झाडे रस्त्यावर कोसळली. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि अग्निशामक दलाच्या मदतीने रस्त्यालगत पडलेली झाडे हटवून बाजूला करण्यात आली. मात्र, तोपर्यंत परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतूक कोंडीचा फटका अनेकांना बसला. त्यातच विजेच्या तारांवर झाडे कोसळल्याने सायंकाळ पासून विद्युत पुरवठा खंडित झाला होता. काही ठिकाणचा विद्युत पुरवठा एक- दोन तासानंतर सुरळीत करण्यात आला. मात्र, काही गावांचा विद्युत पुरवठा सुरू व्हायला वेळ लागला. परतीच्या पावसाने नागरिकांची तधातिरपीट उडाल्याचे चित्र पनवेल तालुक्यात दिसत आहे.

# कोलाड परिसरात बेकायदेशीर भंगार दुकाने

## नियम धाब्यावर बसवून ई-कचऱ्याची साठवणूक; नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त

**| कोलाड | प्रतिनिधी |**

कोलाड परिसरामध्ये विनापरवाना चालणाऱ्या भंगार दुकानांचा (स्क्रॅप यार्ड्स) सुळसुळाट वाढला असून, कोणत्याही वैध कागदपत्राशिवाय हे व्यवसाय उघडपणे सुरू असल्यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या दुकानांवर प्रशासन व स्थानिक यंत्रणांनी तातडीने तपासणी करून कडक कायदेशीर पावले उचलावीत अशी मागणी जनतेमधून जोर धरू लागली आहे.

स्थानिक नियमांनुसार कोणत्याही भंगार दुकानासाठी शॉप परवाना, स्थानिक स्वराज्य संस्थेचे ट्रेड लायसन्स, अग्निशामक दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र आणि महाराष्ट्र प्रदूषण



नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र असणे बंधनकारक असते. कोलाड भागातील अनेक दुकानांमध्ये या नियमांना पूर्णपणे हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. विशेषत: या स्क्रॅप यार्ड्समध्ये ई-कचरा, जुन्या वाहनांचे संशयित सुटे भाग आणि रासायनिक बॅटऱ्यांची विनापरवाना साठवणूक केली जात असल्याने परिसरातील पर्यावरण व सार्वजनिक सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत कोलाड परिसरातील असंख्य ठिकाणी भंगार व्यावसाय अतिशय बेकायदेशीर सुरु असून येथील भंगारमधील विषारी रसायने आणि तेल वाहून जवळच्या नदीत, विहिरीत किंवा भुगर्भातील पाण्यात मिसळतात यामुळे पाणी दूषित होते यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होत आहे. याशिवाय भंगार दुकानात ज्वलनशिल पदार्थ असल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात आग लागण्याची दाट शक्यता असते.अशा या भंगार व्यावसायिकांना वरदहस्त कोणाचे आहे? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, या बेकायदेशीर व्यवसायांना वाचवण्यासाठी आता बनावट ओळखीचा वापर केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोलाडमधील एक भंगारवाला तर बोलत असतो की, हम भी पत्रकार है! असा थेट आव आणून त्याने स्वत: ची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, चौकशीअंती संबंधित भंगारवाला हा चक्क बोगस पत्रकार असल्याचे निष्पन्न झाले आहे. भंगाराचा अनधिकृत धंदा चालवण्यासाठी आणि कायद्याच्या कारवाईतून पळवाट काढण्यासाठी बनावट पत्रकारितेचे ओळखपत्र म्हणून वापरले जात असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड आश्चर्य व संताप व्यक्त होत आहे. या भंगार पत्रकाराची पण आता चौकशी केली जाणार आहे.

### नियम मोडणाऱ्यांवर कारवाईची मागणी

चोरीच्या संशयास्पद मालाची खरेदी-विक्री आणि पर्यावरणास घातक कचऱ्याची साठवणूक रोखण्यासाठी भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतुदींनुसार या दुकानांची तपासणी होणे गरजेचे बनले आहे. कोलाड परिसरातील अशा सर्व बोगस आडोशांमागे लपलेल्या अनधिकृत भंगार दुकानांचा शोध घेऊन त्यांना सील करावे आणि बोगस पत्रकारितेचा मुखवटा घालून नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# कर्करोग जनजागृतीसाठी खोपोली ते अलिबाग कार रॅली

**| खोपोली | प्रतिनिधी |**

बाल आणि महिलांमधील कर्करोगाबाबत जनजागृती करण्यासाठी खोपोली लायन्स क्लबच्या वतीने खोपोली ते अलिबाग महिला कार रॅलीचे आयोजन गुरुवारी (दि.१) ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या रॅलीत ३० महिला कारचालकांनी सहभाग घेत कर्करोगाचे वेळेत निदान आणि उपचाराचे महत्त्व अधोरेखित केले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी खोपोली लायन्स क्लबच्या ५५ वर्षांच्या वाटचालीनिमित्त राजेंद्रकुमार केजरीवाल, अशोक खंडेलवाल, बाळाराम म्हात्रे यांच्या उपस्थितीत वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्यानंतर महिला कार रॅलीला सुरुवात करण्यात आली.

महिला चालकांच्या सहभागातून संदेश महिलांनी स्वत: कार चालवत या जनजागृती मोहिमेत सहभाग घेतल्याने त्यांच्या आत्मविश्वासासोबतच आरोग्याबाबतची जागरूकताही अधोरेखित झाली. कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यास उपचाराच्या माध्यमातून बरे होण्याची शक्यता वाढते, त्यामुळे नियमित तपासणी आणि आरोग्यविषयक जागरूकता आवश्यक असल्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला.

यावेळी प्रवीण सरनाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहूल पाटील, पोलीस निरीक्षक सचिन हिरे, विक्रम साबळे, विजय गणात्रा, नमिता मिश्रा, अनिल म्हात्रे, दिलीप पोरवाल, अध्यक्षा शैली मेहता, नारायण कड़ी, एकता भदोरिया यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला कर्करोग जनजागृतीसाठी महिला चालकांच्या कार रॅलीचे आयोजन हा समाजप्रबोधनाचा प्रभावी मार्ग असल्याचे गीता धोटे, विशाल नेहूल पाटील, विक्रम साबळे यांनी सांगत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन बोराना यांनी केले.

## प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयातर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधींना अभिवादन



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयातर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि.२)ऑक्टोबर रोजी प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचाचे कार्यवाह ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी तसेच प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचाचे कार्यवाह नागेश कुळकर्णी आणि अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव नंदू टळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच जिल्हा ग्रंथालय अलिबागच्या वतीने म. गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी नागेश कुळकर्णी, रजिता माळवी, अर्चना माळवी उपस्थित होते.

# नेरळमधील उपोषण स्थगित

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नागरिकरण झालेल्या ग्रामपंचायतमध्ये विविध नागरी प्रश्नांवर उपोषण सुरू होते. चौथ्या दिवशी उशिरा प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर गोरख शेप यांनी आपले उपोषण स्थगित केले. नेरळ गावातील रस्त्यावरील अतिक्रमणे, नेरळ नगरपरिषद व्हावी, नेरळ ग्रामपंचायतीमधील गैरकारभार, पाणीपुरवठा बिल आणि नवीन नळजोडणी, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची जमीन, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील कचऱ्याचे विघटन तसेच नेरळ व्यापारी संकुल, फुटपाथ मोकळे करणे आदी विषयांवर



शेप यांनी २८ सप्टेंबर रोजी उपोषण सुरू केले. उपोषणाच्या चौथ्या दिवशी कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात झाल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. यावेळी सुनीता मोरे, गटविकास अधिकारी कांबळे, बांधकाम विभागाचे उप अभियंता राहुल देवांग, पोलीस अधिकारी राहुल वरोटे, उज्ज्वला भोसले यांच्या उपस्थितीत उपोषण स्थगित करण्यात आले.

# रोप-वे प्रकल्पासाठी रायगडवाडीचे ग्रामस्थ एकवटले

**| महाड | प्रतिनिधी |**

किल्ले रायगडावर शासनाच्या वतीने प्रस्तावित दुसरा रोप-वे प्रकल्प रायगडवाडी गावातूनच करण्यात यावा, अशी मागणी रायगडवाडी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत पालकमंत्री भरत गोगावले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ग्रामस्थांकडून त्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खा. सुनील तटकरे, रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष युवराज संभाजीराजे छत्रपती, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच राजिपकडे पाठविण्यात आल्या आहेत.

नाणा दरवाजा, टकमक टोक महादरवाजा, हिरकणी बुरुज मदारी



मेहतर यांची समाधी खुबलढा बुरुज आदी ऐतिहासिक स्थळांचे दर्शन रोप-वेतून दूरा करता येईल. काळ जलावद्युत प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर धरणाचा जलाशय व परिसराचे निसर्गरम्य दृश्य अनुभवता येईल. तसेच मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध आहे रायगडवाडी येथून रोप-वे झाल्यास किल्ले रायगड परिसरातील अनेक ऐतिहासिक वास्तू व स्थळांचे दर्शन पर्यटकांना रोप-वेतून घेता येईल, असे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे.

किल्ले रायगड रायगडवाडी, पडी कोळीआवाड. टकमकी निजामपूर, बावले, वारंगी, वाघेरी आदी गावांना रोजगाराच्या संधी मिळतील. प्रस्तावित रोपवे रायगडवाडीमधून करण्यासाठी शासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यास ग्रामस्थ तयार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पर्यटनविकासासोबतच परिसरातील गावांना रोजगार व विकासाची संधी मिळावी, यासाठी दुसरा रोप-वे मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# बार्डी गावाचा पिण्याच्या पाण्यासाठी मोर्चा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील बार्डी गावातील पाण्याचा प्रश्न वर्षानुवर्षे कायम असून, वारंवार निवेदने देऊनही कायमस्वरूपी तोडगा न निघाल्याने अखेर बार्डी गावातील महिला ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयावर मोर्चा काढत आक्रमक भूमिका घेतली. नळपाणी योजनेचे पाणी गावात तीन ते चार दिवसांतून एकदा आणि तेही अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने अनेक घरांना पाणी मिळत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

बार्डी गावातील नळपाणी योजनेचे काम वेळेत पूर्ण झालेले नाही. ग्रामस्थांना पाण्याची अडचण होत असल्याबद्दल



२६ डिसेंबर २०२५ आणि १८ मार्च २०२६ रोजी कर्जत पंचायत समितीकडे लेखी निवेदन देऊन नळपाणी योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला आहे.त्यात बार्डी गावात ग्रामपंचायत मार्फत होणारा पाणीपुरवठा हा अतिशय अनियमित असून, ३ ते ४ दिवसातून एकदा पाणी येते. तसेच येणारे पाणी हे अतिशय कमी दाबाने येत असून, कित्येक घरांना तर पाणी मिळत देखील नाही, याबाबत आम्ही आपणास पत्र दिले होते.

ग्रामपंचायती मार्फत या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी तात्पुरते आश्वासन देऊन वेळ ढकलण्यात येते, परंतु कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना केली जात नाही. याबाबत ग्रामस्थांनी अनेक वेळा ग्रामपंचायत, पंचायत समिती येथे भेट देऊन लेखी निवेदन देखील दिले आहे, तरी देखील आमच्या गावातील पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही.

शासनाकडून आणि जिल्हा परिषदकडून नळपाणी योजना पूर्ण होण्यासाठी कोणतेही सहकार्य पाणी पुरवठा विभाग करीत नाही. त्यामुळे कर्जत पंचायत समितीमध्ये मोर्चादरम्यान संबंधित अधिकारी किंवा जबाबदार व्यक्ती उपस्थित नसल्याने महिलांनी तब्बल अडीच तास ठिय्या मांडत संताप व्यक्त केला. अखेर जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती नारायण डामसे यांच्या मध्यस्थीने पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. कर्जत पंचायत समितीकडून कार्यवाही झाली नाही तर आम्ही पुन्हा आंदोलन करू असे इशारा महिला वर्गाने दिला आहे.

या महिलांच्या मोर्चात गावातील माजी सदस्या माजी उप सरपंच आणि महिलांचा सहभाग होता.

## रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

आजच्या धावपळीच्या जीवनात माणुसकी आणि प्रामाणिकपणाचे दर्शन घडविणारी घटना समोर आली आहे. रिक्षाचालक रामा जोशी यांनी रिक्षात विसरलेले २५ हजार रुपये रोख असलेले पाकीट प्रामाणिकपणे मूळ मालकाच्या स्वाधीन केले. रमेश गुडेकर हे लाईन आळी येथून कल्पतरू सोसायटीकडे रिक्षाने प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांचे २५ हजार रुपयांची रोकड असलेले पाकिट रिक्षातच राहिले. ही बाब लक्षात आल्यानंतर रिक्षाचालक जोशी यांनी कोणताही मोह न बाळगता पाकीट सुरक्षितपणे गुडेकर यांच्याकडे परत केले.

**गावाचा बाह्य जगाशी संपर्क तुटला | शासकीय व्यवहारही खोळंबले**

# कुडूकमध्ये महिनोंमहिने नेटवर्क गायब

**| महाड | सुजित धाडवे |**

देश डिजिटल इंडियाच्या गप्पा मारत असताना महाड आणि मंडणगड तालुक्याच्या सीमेवर, सह्याद्रीच्या कुशीत घनदाट जंगलाने वेढलेल्या कुडूक गावात आजही एका मोबाईल सिग्नलसाठी जीव टांगणीला लागला आहे. सुमारे तीनशे ते चारशे लोकवस्ती असलेल्या या कुडूक खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील भारत संचार निगम लिमिटेडचा (बीएसएनएल) टॉवर धूळत उभा असला तरीही ग्रामस्थ अद्यापही नेटवर्कच्या प्रतीक्षेत आहेत. मोबाईलच्या स्क्रीनवर दिवस-रात्र फक्त 'नो सर्व्हिस' दिसत असून संपूर्ण गावाचा बाह्य जगाशी संपर्क तुटला आहे.

हा बोजवारा केवळ मोबाईल टॉवरपुरता नाही. याच भागातील लँडलाईन आणि ब्रॉडबँड सेवाही



अनेक महिन्यांपासून ठप्प आहे. सेवा बंद असतानाही दरमहा बील भरावे लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे. याबाबत मंडणगड कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी तोंडी आणि लेखी तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप होत आहे. ग्रामस्थांनी या संदर्भात लेखी निवेदने दिली असून त्यावर कार्यालयाचा प्राप्त शिक्का देखील आहे, तरीही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

तांत्रिक बिघाड आणि देखभालीअभावी हा एकमेव टॉवर ठप्प झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामस्थांनी बीएसएनएल कार्यालयासह तहसील प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे वारंवार पाठपुरावा केला आहे, मात्र, आश्वासनांपलीकडे ठोस कारवाई झालेली नाही.

विशेष म्हणजे ही वाडी दरडग्रस्त म्हणून जाहीर असून तहसिलदर कार्यालयाकडून घरांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. अशा संवेदनशील ठिकाणी संपर्क यंत्रणा बंद असणे अधिक धोकादायक ठरत आहे.

या ठप्प नेटवर्कचा थेट फटका दैनंदिन जीवन, शिक्षण आणि रोजगारावर बसला आहे. शेतकऱ्यांचे सात-बारा, पीकविमा यासारखे शासकीय व्यवहारही खोळंबले आहेत.

त्यामुळे प्रशासनाने तातडीने जुन्या टॉवरची दुरुस्ती करण्यासोबतच अधिक क्षमतेचा नवीन टॉवर उभारून 'नो रेंज'चा प्रश्न कायमचा मिटवावा आणि बंद असलेल्या सेवा तात्काळ सुरू करून बंद कालावधीचे बील माफ करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

> डोंगरावर वसलेल्या आमच्या कुडूक गावात अजिबात नेटवर्क मिळत नाही. वाय-फाय बसवूनही उपयोग होत नाही. नेटवर्क आठवड्यातून एक-दोनदाच येते. आणीबाणीच्या वेळी संपर्कच होत नाही. शासनाने तातडीने नवीन टॉवर उभारावा.
>
> - संदेश पवार, ग्रामस्थ, कुडूक



## गरबा ड्रेसच्या खरेदीला उधाण

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

नवरात्रोत्सवाचे वेध लागताच खांदा कॉलनीसह पनवेल परिसरात गरबा-ड्रेसच्या खरेदीला सुरुवात झाली आहे. तरुणींसह महिलांकडून रंगीबेरंगी घागरा-चोळी, दागिने आणि आकर्षक गरबा पोशाखांना पसंती दिली जात आहे. देवीच्या जागरासोबत गरब्याचा तालावर थिरकण्यासाठी नवीन पोशाखांची लगबग सुरू झाली आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये पारंपरिक रंगांची आकर्षक फॅशनची झलक पाहायला मिळत आहे.

## काल मुंबई, आज ठाणे

१९८० आणि ९० च्या दशकात जे मुंबईत घडत होते ते आता ठाणे व लगतच्या परिसरात घडत आहे. शिवसेना ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांची हत्या हे त्याचेच लक्षण आहे. जमिनींचे वाद, राजकीय वर्चस्वाची लढाई आणि त्यातून मग खुनाखुनी असे असंख्य प्रकार तेव्हा मुंबईने पाहिले. विठ्ठल चव्हाण, कमलाकर जामसंडेकर हे सेनेशी संबंधित तर रामदास नायक, प्रेमकुमार शर्मा वगैरे भाजपशी संबंधित असे अनेक जण तेव्हा मारले गेले. फरक इतकाच की दाऊद, छोटा राजन, अरुण गवळी वगैरे टोळ्यांचा या प्रकरणांमध्ये हात होता. ठाण्यात अजून तरी असे काही झालेले नाही. पण सध्या ठाण्यात जी गुंडगिरीची व भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर येत आहेत ती संघटित गुन्हेगारीहून कमी नाहीत. यांना सरळ सरळ राजाश्रय आहे व हे पांढरपेशे नेते म्हणून समाजात मिरवत आहेत. पूर्णेकर यांच्या कुटुंबियांनी हत्येप्रकरणी एकनाथ शिंदे गटाच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे व त्यांचे पती यांच्यावर थेट आरोप केले आहेत. त्यांना आरोपी करावे अशी त्यांची मागणी आहे. याबाबत तक्रार नोंदवून घेईपर्यंत त्यांनी अंत्यसंस्काराला नकार दिला होता. आदित्य ठाकरे व संजय राऊत यांना पोलिस ठाण्यात जाऊन यासाठी ठिय्या द्यावा लागला. मीनाक्षी शिंदे यांनी अर्थातच आरोप नाकारले आहेत. पण एरवी ठाण्यावर आपले एकहाती वर्चस्व असल्याचा दावा करणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या गटाला या राजकीय खुनाचे स्पष्टीकरण द्यावे लागेलच. काहीच दिवसांपूर्वी अभंगे नावाच्या एका गुंडाला खंडणी मागत असल्याबद्दल ठाण्यातील भाजी विक्रेत्या महिलांनी पोलिस ठाण्यातच चोप दिला होता. त्यावेळी पोलिस या अभंगेच्या विरोधात तक्रार दाखल करून घेण्यास नकार देत होते. या बडवण्याचे व्हिडिओ सर्व वृत्तवाहिन्यांनी प्रसारित केले. मात्र यानंतर दोनच दिवसात ही हत्या झाली. पूर्णेकर हे मानपाडा भागातील नेते होते व त्यांचे बंधू सेनेचे नगरसेवक राहिलेले आहेत. पोलिसांनी या प्रकरणात २३ सदस्यांची एसआयटी स्थापन केली असून हा तपास लवकर होईल व योग्य मार्गाने होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यापलिकडे जनतेच्या हाती काहीही नाही.

### विकासाच्या नावाखाली

ठाण्याकडून बोरीवलीकडे जाणाऱ्या घोडबंदर रोडवर सध्या विकासाचा महापूर आलेला आहे. नेमका असाच विकास ८० व ९० च्या दशकात मुंबईत घडत होता. मध्य मुंबईतील गिरण्यांच्या जमिनी मोकळ्या करून त्यांच्यावर टॉवर उभारले जाणार हे दिसू लागले होते. त्यात हात धुवून घेण्यासाठी सर्वांची स्पर्धा होती. दुसरीकडे उपनगरांमध्येही मोकळ्या जागा भराभर संपत चालल्या होत्या. झोपड्यांचा पुनर्विकास हा परवलीचा शब्द बनला. त्यातून कालपर्यंत फाटक्या स्लिपर घालून फिरणारे लोक आज बिल्डर व डेव्हलपर झाले. यांच्यातले काही नंतर नगरसेवक इत्यादी झाले किंवा काही आधीपासूनच राजकारणात होते. मुंबईच्या विकासाची मर्यादा आता संपली आहे. आता हे केंद्र ठाणे व इतर परिसराकडे वळले आहे. ठाण्यात घोडबंदर रोड हा मध्यमवर्गाला परवडेल अशा घरांचा नवीन पत्ता झाला आहे. याच भागात ही वर्चस्वाची हाणामारी चालू आहे. पूर्णेकर यांना यापूर्वी काही धमक्या आल्या होत्या असे म्हणतात. त्यांचाच पूर्वीचा जवळचा सहकारी पप्या शिंदे याला या प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हे सर्व जण पूर्वी एकाच शिवसेनेत होते. आता ते दोन गटात विभागले गेले. यातील ठाकरे गट हा तुलनेने दुबळा आहे. एकनाथ शिंदे यांनी पालिकेत व इतरत्र एकछत्री अंमल स्थापित केला आहे. हे करताना अर्थातच संशयास्पद चारित्र्याच्या व गुंड प्रवृत्तीच्या लोकांना कळत नकळत संरक्षण दिले गेले आहे. काही दिवसांपूर्वी एका गुंडाचा पाठलाग करताना उपनिरीक्षक किसन भोईर गुंडाने फेकलेली वीट लागून मारले गेले होते. महापालिका निवडणुकीच्या काळात भाजप व शिंदे सेना यांच्यात या गुंडगिरीच्या व शिंदे सेनेच्या भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरून घमासान लढाई झाली होती. ठाण्यातील अमली पदार्थांचा व्यापार व पुरवठा वाढला असल्याचे भाजपचे आमदार संजय केळकर यांचे म्हणणे आहे. भाजपला शिरजोर होऊ द्यायचे नाही हे एकनाथ शिंदे यांचे एककलमी उद्दिष्ट असल्याने अशा आरोपांकडे दुर्लक्ष केले जाते.

### शिंदे यांची जबाबदारी

ठाण्यात जमिनींच्या असंख्य भानगडी आहेत. वागळे इस्टेट ही पूर्वी औद्योगिक वसाहत म्हणून प्रसिध्द होती. आता तिथे रहिवासी इमारती येऊ घातल्या आहेत. लोढा, हिरानंदानी यांसारख्या बिल्डरांनी मोठमोठी क्षेत्रे व्यापून टाकली आहेत. असा बिल्डरी विकास झाला की त्यात घोटाळे असतातच. पालिका अधिकाऱ्यांना यात हात धुवून घेता येतात. अशा वेळी तिथला राजकीय नेता नेक असेल तर तो या प्रकारांना चाप लावू शकतो. अधिकाऱ्यांवर कारवाईची भूमिका घेऊ शकतो. पण एकनाथ शिंदे यांनी असे केल्याचे दिसत नाही. उलट घोडबंदरचा विकास तसेच रिंग रोडसारखे प्रकल्प हे बिल्डरांच्या फायद्यासाठीच निर्माण केले जात असल्याचा आरोप आहे. या भागात पुरेसे पाणी नाही. घोडबंदर भागातील वसाहतींमध्ये अनेक इमारती टँकरने पाणी घेण्यासाठी महिन्याला लाखो रुपये खर्च करतात. त्यातच आता तेथे डेटा सेंटरसारखे प्रकल्प आणण्याचे घाटते आहे. यांना प्रचंड पाणी लागते. याला सर्व पक्षीय नागरिकांनी एकत्र येऊन विरोध केला आहे. पण याबाबत ठाण्याचे नेते म्हणवणाऱ्यांनी योग्य भूमिका घेतल्याचे दिसत नाही. गुंडगिरीचे प्रमाण वाढत चालले आहे. हेच प्रकार ठाण्यालगतच्या मिरा भाईंदर, कल्याण, डोंबिवली या भागांमध्ये होत आहेत. पालिका रुग्णालयातील डॉक्टरांना मारहाण करणाऱ्या रमेश म्हात्रेचे प्रकरण आता देशपातळीवर गाजते आहे. परवा सर्वोच्च न्यायालयाने त्याचा जामीन रद्द केला. हा म्हात्रे शिंदे गटाचा आहे हा योगायोग नाही. याच स्तंभात आम्ही आधी म्हटल्याप्रमाणे हा सत्तेचा माज आहे. आपल्याला कोणीही काही करू शकत नाही अशा गुर्मीतून हे प्रकार वाढत्या संख्येने घडत आहेत. भाजपवाल्यांकडे गृह खाते आहे. पण तेही याबाबत गप्प आहेत. रमेश म्हात्रेवर न्यायालयाच्या दबावामुळे आणि डॉक्टरांनी संप केल्यामुळे कारवाई करावी लागली. ठाण्यातील पूर्णेकर प्रकरणाला आपसातील वैमनस्य असल्याचे भासवण्याचा प्रयत्न होऊन कदाचित वेगळे वळण दिले जाईल. पण मुळात ही प्रकरणे खुनाखुनीपर्यंत जातात हे पोलिसी यंत्रणेचे अपयश आहे. पूर्णेकर यांच्या पत्नीने या संदर्भात खुद्द एकनाथ शिंदे यांना लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. शिंदे या प्रकरणाकडे राजकीय चष्म्यातून पाहतात की शहराचे पालक म्हणून काही वेगळी पावले उचलतात हे येत्या काही काळात दिसेलच. याकडे दुर्लक्ष झाल्यास आज जे सुपात आहेत ते उद्या जात्यात येऊन भरडल्याखेरीज राहणार नाहीत. मुंबईतील खुनाखुनीच्या प्रकरणात शिवसेनेतील अंतर्गत बंडाळी टोकाला गेली होती. त्यातूनच तो पक्ष कमकुवत होत गेला व आज त्याच्यात दुफळी झाली आहे. उद्या ठाण्यातही हेच घडू शकते.

**| विचार**

# जर्मनीतील उजव्या वळणाचे युरोपला संकेत

***जर्मनीच्या सॅक्सनी-अनहाल्ट प्रांतातील निवडणुकीने केवळ एका राज्यातील सत्तेचे समीकरण बदललेले नाही, तर जर्मनीच्या राजकारणासमोर आणि त्याहूनही व्यापक अर्थाने युरोपसमोर मतदारांची बदलती मानसिकता दाखवून दिली आहे. येथील 'अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी' या उजव्या विचारसरणीच्या पक्षाला मिळालेला विक्रमी पाठिंबा हा प्रस्थापित राजकीय व्यवस्थेविषयी वाढत चाललेल्या असंतोषाचा स्पष्ट संकेत आहे.***




**प्रा. जयसिंग यादव**

जर्मनीने दुसऱ्या महायुद्धानंतर लोकशाही, उदारमतवाद आणि संस्थात्मक स्थैर्य यांना आपल्या राजकीय व्यवस्थेचा आधार बनवले. नाझीवादाच्या भयावह अनुभवातून गेलेल्या या देशामध्ये अतिउजव्या विचारसरणीच्या राजकारणाकडे नेहमीच अत्यंत सावधपणे पाहिले गेले. त्यामुळे 'अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी' अर्थात 'एएडी'सारखा पक्ष लोकशाही मार्गाने सर्वाधिक मते मिळवणारा पक्ष म्हणून उदयास येणे ही केवळ निवडणुकीतील उलटफेराची बाब नाही, तर त्या सामाजिक आणि आर्थिक अस्वस्थतेचा आरसा आहे, ज्याकडे प्रस्थापित पक्षांनी पुरेसे गांभीर्याने न पाहिल्यास भविष्यात आणखी व्यापक परिणाम होऊ शकतात. 'एएडी'चा वाढता प्रभाव समजून घेताना केवळ 'उजव्या विचारसरणीचा उदय' एवढ्याच एका चौकटीत या निकालाकडे पाहणे चुकीचे ठरेल. त्यामागे स्थलांतराचा प्रश्न, महागाई, आर्थिक असुरक्षितता, सरकारच्या धोरणांविषयी असमाधान, युक्रेनमधील युद्धाचे परिणाम आणि इराणमधील संघर्षामुळे निर्माण झालेला आर्थिक ताण अशा अनेक घटकांचा गुंता आहे. 'एएडी'ने या असंतोषाला राजकीय भाषेत रूपांतरित केले आहे. प्रस्थापित पक्षांकडून आपल्या समस्यांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, अशी भावना असलेल्या मतदारांना या पक्षाने पर्याय उपलब्ध करून दिला. यातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे 'एएडी'ला मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या वाढण्याबरोबरच मतदानाचा टक्कादेखील लक्षणीयरीत्या वाढला आहे. सॅक्सनी-अनहाल्टमध्ये ७६.५ टक्के मतदान झाले. म्हणजेच 'एए डी'चा विजय हा केवळ पारंपरिक मतदारांच्या एकत्रीकरणातून झालेला नाही. निराश किंवा राजकीय प्रक्रियेपासून दूर गेलेल्या मतदारांनाही या पक्षाने मतदानाच्या प्रक्रियेत आणले.

लोकशाही व्यवस्थेवरील असमाधान मतदानाच्या माध्यमातून व्यक्त होते, तेव्हा त्याकडे केवळ पक्षीय पराभव-विजय म्हणून पाहणे धोकादायक ठरते. यामुळे जर्मनीतील सत्ताधारी पक्षांसमोर दुहेरी आव्हान उभे राहिले आहे. एकीकडे 'एएडी'सोबत राजकीय सहकार्य करणे प्रस्थापित पक्षांच्या दृष्टीने स्वीकारार्ह नाही, तर दुसरीकडे 'एएडी'ला पूर्णपणे दुर्लक्षित करूनही पुढे जाता येणार नाही. या विरोधाभासातून जर्मनीच्या राजकारणात एक प्रकारचा कोंडीचा टप्पा निर्माण झाला आहे. सॅक्सनी-अनहाल्ट हा मतदारसंख्येच्या दृष्टीने जर्मनीतील छोटा प्रांत असला, तरी तेथील निकालाची राजकीय प्रतिकात्मकता मोठी आहे. कारण एका राज्यातील मतदारांचे प्राधान्य इतर राज्यांमधील निवडणुकीवर परिणाम करणारे उदाहरण बनू शकते. 'एएडी'ला स्पष्ट बहुमत मिळालेले नसल्याने सहकारी पक्षाची आवश्यकता उभी राहिली. अशा वेळी 'बीएसडब्ल्यू' या पक्षाला मिळालेली मते या संदर्भात महत्त्वाची ठरू शकतात. 'एएडी'ला त्यांचा पाठिंबा मिळाल्यास प्रस्थापित पक्षांच्या विरोधात ध्रुवीकरण होऊन एक वेगळे राजकीय समीकरण निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत जर्मनीच्या प्रांतीय राजकारणात आजवर न दिसलेले समीकरण प्रत्यक्षात येईल; परंतु प्रश्न केवळ सरकार कोण बनवते यापुरता मर्यादित नाही. सरकार चालवण्याची क्षमता, प्रशासनाचा अनुभव आणि आर्थिक धोरणांची अंमलबजावणी यांचाही कस लागणार आहे.

'एएडी'ने सत्तेच्या शक्यतेचा विचार करून आपल्या नेत्यांना बजेट कायदे, मंत्रालयांचे दैनंदिन कामकाज आणि प्रशासकीय प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केल्याचा उल्लेख स्रोतामध्ये आहे. याचा अर्थ हा पक्ष केवळ विरोधी राजकारणापुरता मर्यादित राहण्याच्या पलीकडे जाऊन सत्तेची शक्यता गांभीर्याने पाहत आहे. प्रस्थापित पक्षांनी या निकालातून सर्वात महत्त्वाचा धडा कोणता घ्यायचा, हा प्रश्न येथे उपस्थित होतो. 'एएडी'ला रोखण्यासाठी केवळ टीका करून भागणार नाही. मतदार 'एएडी'कडे का वळत आहेत, याचे प्रामाणिक आत्मपरीक्षण प्रस्थापित पक्षांना करावे लागेल. महागाईचा परिणाम, रोजगाराची चिंता, सार्वजनिक सेवांवरील दबाव, स्थलांतराचा प्रश्न आणि आर्थिक सुधारणांचा सामान्य नागरिकांवर होणारा परिणाम या मुद्द्यांवर ठोस उत्तर देणे आवश्यक आहे. स्थलांतर हा 'एएडी'च्या राजकीय विस्तारातील प्रमुख मुद्दा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये जर्मनीमध्ये वाढलेले स्थलांतर आणि त्यातून निर्माण झालेले सामाजिक-आर्थिक प्रश्न यांचा राजकीय फायदा 'एएडी'ला झाला आहे. स्थलांतराचा प्रश्न दुर्लक्षित करणे जितके चुकीचे, तितकेच त्याचे सरसकटीकरण करून समाजात भीती आणि द्वेष निर्माण करणेही घातक आहे. प्रस्थापित पक्षांसमोरचे आव्हान म्हणजे सुरक्षा, कायद्याचे पालन आणि नियंत्रित स्थलांतर यांची आवश्यकता मान्य करताना मानवी मूल्ये आणि लोकशाहीची चौकटही कायम ठेवणे. याचा परिणाम जर्मनीपुरता मर्यादित राहणार नाही.

युरोपमधील अनेक देशांमध्ये स्थलांतर, महागाई, राष्ट्रीय ओळख, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक असुरक्षितता या मुद्द्यांवर उजव्या विचारसरणीच्या पक्षांना वाढता पाठिंबा मिळत आहे. सॅक्सनी-अनहाल्टमध्ये 'एएडी'ला मिळालेला मोठा विजय या पक्षांना मानसिक आणि राजकीय बळ देऊ शकतो. 'जर्मनीसारख्या देशात हे शक्य असेल, तर इतरत्रही शक्य आहे,' असा संदेश युरोपमधील उजव्या विचारसरणीच्या पक्षांना मिळू शकतो. त्यामुळे युरोपच्या स्थलांतर धोरणातही कठोरता वाढण्याची शक्यता आहे. अतिउजव्या पक्षांची वाढ रोखण्यासाठी मुख्य प्रवाहातील पक्षही स्थलांतरावर अधिक कठोर भूमिका घेऊ शकतात. यामुळे युरोपीय राजकारणाचा केंद्रबिंदू हळूहळू उजवीकडे सरकण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र अशा स्पर्धेत प्रस्थापित पक्षांनी अतिउजव्या पक्षांच्या भाषेची नक्कल केल्यास त्यातून त्यांना दीर्घकालीन राजकीय फायदा होईलच असे नाही. उलट, अतिवादी विचारांना वैधता मिळण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. आर्थिक आघाडीवरही या निकालाचे परिणाम गंभीर असतील. जर्मनीची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सरकारला कररचना, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक सुधारणांबाबत कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत; परंतु 'एएडी'चा विरोध आणि इतर विरोधी पक्षांकडून होणारा दबाव यामुळे सरकारची निर्णयक्षमता कमी होऊ शकते. सुधारणा करण्याची गरज आणि जनतेचा वाढता असंतोष यांच्यात संतुलन साधणे ही सरकारची खरी परीक्षा असेल. लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षाचा पराभव हा असामान्य नाही; परंतु एखाद्या प्रस्थापित व्यवस्थेविषयी व्यापक असंतोष निर्माण होऊन मतदार अतिउजव्या किंवा अतिडाव्या राजकीय पर्यायांकडे वळतो, तेव्हा ती बाब अधिक गंभीर ठरते. कारण अशा वेळी प्रश्न केवळ कोण सत्तेत येणार याचा नसतो, तर लोकशाहीतील मध्यममार्गी राजकीय सहमती किती टिकून राहणार, हा असतो. जर्मनीसाठी ही वेळ आत्मपरीक्षणाची आहे. 'एएडी'ला केवळ 'धोकादायक पक्ष' म्हणून नाकारून मतदारांच्या मनातील प्रश्न सुटणार नाहीत. त्याचबरोबर मतदारांच्या असंतोषाचा आधार घेऊन अतिउजव्या विचारसरणीला सामान्य राजकारणाचा भाग बनवणेही लोकशाहीसाठी हितावह नाही. या दोन्ही टोकांपासून दूर राहून रोजगार, अर्थव्यवस्था, स्थलांतर, सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक सेवांवर विश्वासार्ह धोरणे देणे आवश्यक आहे. मतदार मोठ्या संख्येने मतदान करून असंतोष व्यक्त करतात, तेव्हा त्यांचा संदेश ऐकण्याची जबाबदारी लोकशाही व्यवस्थेतील सर्व पक्षांची असते. जर्मनी हा युरोपीय संघातील सर्वात प्रभावशाली देशांपैकी एक असल्याने तेथील राजकीय बदलांचा पडसाद संपूर्ण खंडावर उमटतो. 'एएडी'ची वाढ ही त्यामुळे केवळ जर्मन राजकारणातील एका पक्षाची वाढ नाही, तर युरोपमधील बदलत्या राजकीय वाऱ्यांची चाहूल आहे. पुढील काळात हा वारा किती वेगाने वाहतो आणि मुख्य प्रवाहातील राजकारण तो कोणत्या दिशेने वळवतो, यावर युरोपच्या राजकीय स्थैर्याचे मोठे भवितव्य अवलंबून असेल.

लोकशाहीचे सौंदर्य हे मतदारांना पर्याय देण्यात आहे; परंतु लोकशाहीचे सामर्थ्य त्या पर्यायांमध्ये विवेक, सहिष्णुता आणि घटनात्मक मूल्ये जिवंत ठेवण्यात आहे. जर्मनीसमोरची खरी कसोटी आता 'एएडी'ला थांबवण्याची नसून बळ देणारी कारणे दूर करण्याची आहे. अन्यथा, सॅक्सनी-अनहाल्ट हा अपवाद न राहता युरोपमधील नव्या राजकीय पर्वाची सुरुवात ठरू शकतो.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

**| चर्चा आजची**

# सागरा प्राण तळमळला...




**राकेश लोहार**

रायगडचा समुद्र म्हणजे पर्यटकांसाठी निसर्गाचे आकर्षण. अथांग निळाशार समुद्र, फेसाळणाऱ्या लाटा आणि विस्तीर्ण वाळूचे किनारे पाहण्यासाठी दरवर्षी देश-विदेशातून, राज्य-परराज्यांतून हजारो पर्यटक जिल्ह्यात दाखल होतात. मात्र, याच समुद्राने अनेकदा आनंदाच्या क्षणांचे रूपांतर आक्रोशात केले आहे. मुरुडपासून काशीद, वेळास आणि आता दिवेआगरपर्यंत समुद्राच्या लाटांनी अनेकांचे जीव घेतले आहेत. विशेषतः सहलीसाठी आलेल्या विद्यार्थी आणि पर्यटकांच्या बुडण्याच्या घटनांनी समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुनः पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

२०१६ मधील मुरुडची दुर्घटना आजही अंगावर काटा आणणारी आहे. पुण्यातील आबेदा इनामदार महाविद्यालयाच्या सहलीतील विद्यार्थी मुरुडच्या समुद्रात उतरले असताना पाण्याचा अंदाज न आल्याने अनेक जण बुडाले. या दुर्घटनेत १३ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. बचावकार्यादरम्यान स्थानिक मच्छिमारांनी मोठी मदत केली होती. या दुर्घटनेनंतर रायगडच्या समुद्रकिनाऱ्यांवरील जीवरक्षक आणि सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न गंभीरपणे उपस्थित झाला होता.

मुरुडची ही जखम भरत असतानाच रायगडच्या विविध किनाऱ्यांवर बुडण्याच्या घटना सुरूच राहिल्या. काशीद समुद्रकिनाराही अनेक दुर्घटनांचा साक्षीदार ठरला आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये अकोल्याहून सहलीसाठी आलेल्या शालेय विद्यार्थ्यांपैकी आयुष रामटेके आणि राम खुटे या दोन विद्यार्थ्यांचा काशीदच्या समुद्रात बुडून मृत्यू झाला. सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेने पुन्हा ऐरणीवर आणला.

एप्रिल २०२५ मध्ये श्रीवर्धन तालुक्यातील वेळास समुद्रकिनाऱ्यावर तिघांचा बुडून मृत्यू झाला. पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली. स्थानिक तरुण, दिवेआगरचे सरपंच-उपसरपंच आणि दिघी सागरी पोलिसांनी बचावकार्य केले. तिघांना बाहेर काढून रुग्णालयात नेण्यात आले; मात्र त्यांना वाचवता आले नाही.

अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावरही पर्यटक बुडण्याच्या घटना घडल्या आहेत. समुद्र कितीही शांत दिसत असला तरी भरती-ओहोटी, समुद्रातील अंतर्गत प्रवाह आणि अचानक वाढणारी पाण्याची खोली यामुळे काही क्षणांत परिस्थिती बदलू शकते. त्यामुळे किनाऱ्यावर पोहण्याचा मोह अनेकदा जीवघेणा ठरतो. मात्र, दुर्घटनांबरोबरच रायगडमध्ये समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी काही उपाययोजनाही सुरू झाल्या आहेत. २०२६ मध्ये काशीद समुद्रकिनाऱ्यावर खोल पाण्यात बुडणाऱ्या पर्यटकांना वाचवण्यासाठी रोबोटिक वॉटरक्राफ्टचा वापर करण्यात आला. एका २० वर्षीय पुणेकर तरुणीचा जीव या यंत्राच्या मदतीने वाचविण्यात आला. रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर या तीन समुद्रकिनाऱ्यांवर रोबोटिक वॉटरक्राफ्ट उपलब्ध करून दिले आहेत. मात्र, अशा यंत्रणा असण्याबरोबरच प्रशिक्षित जीवरक्षक, धोकादायक ठिकाणी सूचना फलक, नियमित गस्त, आपत्कालीन बचाव पथके आणि पर्यटकांना समुद्राच्या धोक्याबाबत माहिती देणे तितकेच आवश्यक आहे. समुद्रकिनाऱ्यावर मौजमजा करण्यासाठी आलेल्या पर्यटकांना समुद्राच्या बदलत्या स्वरूपाची माहिती नसते. विशेषतः शालेय आणि महाविद्यालयीन सहलींमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे.

२०१६ मधील मुरुडची विद्यार्थी दुर्घटना, २०२५ मधील काशीद आणि वेळासच्या घटना आणि आता २०२६ मधील दिवेआगरची हृदयद्रावक दुर्घटना... या घटना वेगवेगळ्या असल्या तरी त्यातून एकच प्रश्न समोर येतो; तो म्हणजे, समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षा व्यवस्था आणखी किती मजबूत करायची?

दिवेआगरच्या घटनेने पुन्हा एकदा संपूर्ण रायगड हादरला आहे. सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याने आठ कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या दुर्घटनेत पुण्यातील आळंदी येथील विनर्स क्लासेसच्या आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. एकूण ४८ विद्यार्थी सहलीसाठी आले होते.

समुद्र पर्यटन हे रायगडच्या अर्थव्यवस्थेचे मोठे साधन आहे. त्यामुळे पर्यटक येऊ नयेत, असा प्रश्नच नाही. मात्र, पर्यटक आले की त्यांची सुरक्षित परतफेड करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. प्रत्येक दुर्घटनेनंतर चौकशी, सूचना आणि उपाययोजनांची चर्चा होते; पण त्या उपाययोजना प्रत्यक्ष किनाऱ्यावर कायमस्वरूपी दिसणे आवश्यक आहे.

समुद्र हा सुंदर आहे; पण तो खेळण्याचे ठिकाण नाही. फेसाळणाऱ्या लाटांमागे लपलेला धोका ओळखला नाही तर एका क्षणात संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. म्हणूनच आता प्रश्न केवळ समुद्राचा नाही, तर सुरक्षेचा आहे. प्रश्न केवळ पर्यटकांच्या बेफिकिरीचा नाही, तर प्रशासनाच्या कायमस्वरूपी सज्जतेचाही आहे. रायगडचा समुद्र पर्यटकांना आनंद देत आलाय, तो तसाच कायम आनंदी देणारा असावा, दुःखाचा डोंगरा कोणासमोरही नको. आणि, म्हणूनच, ''सागरा प्राण तळमळला...'' ही हाक पुन्हा कोणत्याही आई-वडिलांच्या काळजाला चिरणारी ठरू नये, एवढीच अपेक्षा.

**लोकसंसद**

### फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण रोखणार कसे ?

संपूर्ण देशात फटाक्यांवर बंदी घालणे शक्य नसल्याचे सांगताना माननीय सर्वोच्च न्यायालयाने फटाके फोडण्यासाठी वेळ निश्चित करावा लागेल, जेणेकरून सण साजरा करता येईल आणि लोकांना त्रासही होणार नाही असेही सांगितले. दिवाळी, ख्रिस्ती नववर्षारंभ यावेळी मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जातात. दिवाळीच्या आधी दरवर्षी माननीय न्यायालय फटाके फोडण्यासाठी वेळ निश्चित करून देते. तरीही या वेळा ना नागरिकांकडून पाळल्या जात ना पोलीस प्रशासन किंवा पालिका प्रशासन नागरिकांवर कारवाई करते. मुंबईसारख्या सर्वाधिक प्रदूषित शहरात दिवाळीच्या दिवसांत रात्री १२ वाजल्यानंतरही फटाके फोडले जातात हे वास्तव नाकारून चालणार नाही. याकडे पोलीस प्रशासन कोणाची तक्रार येईपर्यंत सोयीस्करपणे कानाडोळा करते. मुंबईतील पोलीस वसाहतींमध्ये सुद्धा रात्री उशिरापर्यंत फटाके फोडले जातात. त्यामुळे न्यायालयाच्या या आदेशाला प्रशासन गांभीर्याने घेत नाही ही वस्तुस्थिती आहे. फटाक्यांमुळे प्रदूषणात वाढ होऊन केवळ माणसाच्याच नव्हे तर पक्षी आणि प्राण्यांच्या आरोग्याचेही अपरिमित नुकसान होते. फटाके फोडणे म्हणजे केवळ धनाचाच अपव्यय नव्हे, तर फटाक्यांमुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात जैविक आणि वित्तीय हानी होत असते. क्षणिक सुखाव्यतिरिक्त कोणतेही लाभ नसणारी फटाके फोडण्याची प्रथा ही मुळात भारतीय संस्कृतीचाही भाग नाही. दिवाळी आणि फटाके फोडणे यांचा तर तिळमात्र संबंध नाही. फटाक्यांमुळे होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण रोखणार तरी कसे ?

**– सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई**

**| दिनविशेष**

# इलियास होवे - शिवणयंत्राचा शोधक

वस्त्र हे व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्वाचा घटक. वस्त्राचा इतिहासही रंजक आहे. वस्त्रोद्योगात मोठी क्रांती घडविणाऱ्या शिवणयंत्राचा शोध लावणारे इलियास होवे यांचा आज जन्मदिन. त्यानिमित्ताने.....

त्यांचा जन्म ९ जुलै १८१९ रोजी अमेरिकेतील मॅसेच्युसेट्समधील स्पेन-सर येथे झाला. त्यानंतर ते लॉवेल येथे एका टेक्सटाइल कारखान्यात प्रशिक्षणार्थी म्हणून राहिले. वर्ष १८३७ मधील आर्थिक मंदीमुळे तो कारखाना बंद पडला. त्यानंतर केंब्रिजमधील नार्थेनिएल पी. बँक्स यांच्या कंपनीत चुलतभावाबरोबर मेकॅनिक म्हणून हजर झाले. वर्ष १८३८ मध्ये ऍरो डेव्हिस या केंब्रिजमधील प्रसिद्ध वर्कशॉपमध्ये नोकरीस लागले. तेथेच नोकरीत असतानाच शिवणकामाच्या मशीनच्या कल्पनेवरून ते



पछाडले गेले.

शिवणकाम हा एक कलाप्रकार आहे व त्याचा इतिहासही रंजक आहे. मानवास वस्त्राची प्रथम माहिती झाल्यापासून हजारो वर्षांपासून प्रगती होत राहिली आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत कपडे नेसले जायचे, त्यावेळी शिवणकामाची गरज नव्हती. भारतात स्त्रिया साडीसदृश कपडे परिधान करीत, तसेच कापडाच्या पट्टीचा कंचुकी म्हणून वापर करीत तर पुरुष धोतरसदृश कपडे व उपरणे वापरीत. कापडामध्येही रेशमी, सुती, प्राण्यांचे स्नायू, कातडी तसेच वनस्पतीच्या सालीपासून धागा बनवून अनेक प्रकार अस्तित्वात आले व त्यात आजपर्यंत सतत सुधारणा होत राहिली आहे.

अगदी सुरुवातीस हातशिलाई सुरू झाली तेव्हा जिवणकामाच्या सुया, हाडे किंवा प्राण्यांच्या शिंगांनी बनविल्या जायच्या. सुमारे साठ हजार वर्षांपूर्वीची पक्ष्याच्या हाडापासून केलेली सुई दक्षिण आफ्रिकेतील गुहेत सापडली. तसेच तीस हजार वर्षांपूर्वी हस्तिदंतापासून केलेली सुई रशियात सापडली, तर इ.स.पूर्व ४४०० वर्षे तांब्यापासून केलेली सुई इजिप्तमध्ये सापडली. त्यानंतर इ.स.पूर्व ४०० वर्षे लोखंडी सुई वापरात आली.

माणसाला सौंदर्यविषयक दृष्टिकोन आल्यावर शरीरमानाप्रमाणे शोभिवंत वस्त्रप्रावरण वगैरे गोष्टीत रूची निर्माण झाली. पुरुष व स्त्रियांच्या कपड्यांमध्ये आमूलाग्र बदल होत गेले व शिवण यंत्राचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. पूर्वीच्या काळी भारत व चीन कापड तयार करण्यात आघाडीवर होते. पाश्चिमात्यांनी शिवणयंत्र संशोधनासाठी भरपूर प्रयत्न केले.

वर्ष १७५५ मध्ये ब्रिटिश जर्मन संशोधक, चार्ल्स वेसेन्थाल तसेच वर्ष १७९० मध्ये थॉमस सेंट यांनी एक मशीन विकसित केले होते. वर्ष १८३० मध्ये यांत्रिक शिवणकामाचा शोध फ्रेंच शिंपी, बार्थेलेमी थिमोनिर यांनी लावला होता. परंतु फ्रान्समधील शिवण कारागिरांनी बेरोजगारी वाढेल म्हणून त्याचा कारखाना जाळून टाकला. वर्ष १८३४ मध्ये वॉल्टर हंट यांनी अमेरिकेत पहिले शिलाई मशीन बनविले. त्यावेळी सुमारे ८० संशोधक शिवण यंत्र बनविण्यासाठी झटत होते. त्या स्पर्धेत इलियास होवेही उतरले. त्यांनी यात स्वतःला झोकून दिले.

१० सप्टेंबर १८४६ रोजी लॉकस्टिच डिझाइन वापरून शिवणकामासाठी त्यांना अमेरिकेचे पेटंट मिळाले. मात्र, त्यांना इलियास यांना सिगर कंपनी व वॉल्टर हंटबरोबरच पेटंट रोखण्यासाठी न्यायालयात संघर्ष करावा लागला व वर्ष १८५४ मध्ये त्यांनी दावा जिंकला. १८६५ च्या दरम्यान. इलियासने ब्रिजपोर्ट, येथे होली मशीन कंपनीची स्थापना केली. ३ ऑक्टोबर १८६७ रोजी होवे यांचे निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ ऑक्टोबर

१) श्रीम.क्षमा दत्तात्रेय जोशी चेंढरे-अलिबाग दि.३-१०-१९५२

२)श्री.हरिश्चंद्र मोरू पाटील मु.कार्ले, अलिबाग दि.३-१०-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**

**विनायक दिनकर चितळे, स्मरणार्थ अलिबाग**

**स्व. सदानंद शंकर पाटील स्मृतिप्रीत्यर्थ अलिबाग**

**रुपचंद दीपचंद लाठे, बेलापूर, नवी मुंबई**

## सुरेश ठाकूर यांचे निधन

**उरण :** उरण नगरपरिषदेचे नगरसेवक अतुल ठाकूर यांचे वडील तसेच उरणमधील सुप्रसिद्ध व्यावसायिक वॉटर सप्लायर सुरेश पांडुरंग ठाकूर यांचे बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी निधन झाले.



त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी ठाकूर कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवार, दि.९ ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर येथे होणार आहे. तसेच उत्तरकार्य रविवार, दि.११ ऑक्टोबर रोजी त्यांच्या राहत्या घरी, अयोध्या इमारत, पालवी हॉस्पिटलजवळ, उरण येथे करण्यात येणार आहे.

# ई-पीक नोंदणीत अडचणी

## तलाठ्यांमार्फत प्रत्यक्ष नोंद करण्याची मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

**शेती कर्ज घेण्यासाठी आणि शेती विमासाठी ई-पीक पाहणी अहवाल आवश्यक असतो. कर्जत तालुक्यात पीक पाहणी अहवालाबाबत कोणत्याही प्रकारची नोंद ऑनलाइन नोंदणी होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे जाऊन आपली समस्या मांडली आहे.**

कर्जत तालुक्यात ई-पीक पाहाणीच्या नव्या ॲपमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने शेतकऱ्यांना पीक नोंदणी करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी कर्जतचे तहसिलदार धनंजय जाधव यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी कर्जत खरेदी विक्री संघाचे संचालक चंद्रकांत मांडे तसेच प्रदीप सुर्वे, पंढरीनाथ दाभाड, बच्चू शिंदे, विशाल निगुडकर, अनंत चव्हाण, बबन देशमुख, वामन भोईर, भरत खेडेकर, रघुनाथ रुठे, विठ्ठल देशमुख, रतन घारे, लक्ष्मण हिंदोळा यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. अनेक शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या ई-पीक पाणी याबद्दल आक्रमक भूमिका घेतली आहे.



शेतकऱ्यांना गट क्रमांकाच्या नोंदीसंदर्भात अडचणी येत असून प्रत्यक्ष भातशेती करूनही सात-बारा उताऱ्यावर पीक नोंद होत नसल्याने पीकविमा व विविध शासकीय योजनांच्या लाभावर परिणाम होण्याची शक्यता आहे. पडीत जमिनीवर वाढलेल्या गवतामुळे प्रत्यक्ष पाहाणी करणे कठीण होत आहे. मोबाईल नेटवर्कची समस्याही आहे. त्यामुळे जुन्या पद्धतीने पीक नोंदणी करावी किंवा तलाठ्यांमार्फत प्रत्यक्ष नोंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### योजनांच्या लाभांवर परिणाम होण्याची शक्यता

दरम्यान, मागील काही दिवसांपासून पावसाअभावी काही भागांतील जमिनींना भेगा पडल्याने कर्जत तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या धर्तीवर अनुदान द्यावे, अशी मागणी केली. गट क्रमांकाच्या नोंदीसंदर्भात अडचणी येत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे प्रत्यक्ष भातशेती करूनही सात-बारा उताऱ्यावर पीक नोंद होत नसल्याने पीकविमा व विविध शासकीय योजनांच्या लाभावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे मोबाईल नेटवर्कची समस्याही आहे. त्यामुळे जुन्या पद्धतीने पीक नोंदणी करावी किंवा तलाठ्यांमार्फत प्रत्यक्ष नोंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

## वक्तृत्व स्पर्धेत जिया हिलम प्रथम

**माणगाव :** महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत माणगाव येथे झालेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ३ ते ५ या गटात वावेदिवाळी केंद्रातील राजिप निळज आदिवासी वाडी शाळेची विद्यार्थिनी जिया जयवंत हिलम हिने प्रथम क्रमांक पटकावला.

यापूर्वी झालेल्या केंद्रस्तरीय स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळवून ती तालुकास्तरावर सहभागी झाली होती. 'माझ्या स्वप्नातील विकसित भारत' या विषयावर तिने आपले विचार प्रभावीपणे मांडले. तिच्या वक्तृत्वाने स्पर्धेला उपस्थित तालुक्यातील सर्व शिक्षक विद्यार्थी पदाधिकारी व अधिकारी थक्क झाले. निळज आदिवासी वाडी या ग्रामीण भागातील एका आदिवासी विद्यार्थिनीने आपल्या वक्तृत्वातून मांडलेला विकसित भारत सर्वांना भारावून गेला. जियाच्या या उज्वल यशाबद्दल व रायगड जिल्हा वक्तृत्व स्पर्धेसाठी माणगाव तालुका गटशिक्षणाधिकारी प्रसाद पाटील, वरिष्ठ विस्तार अधिकारी सुरेखा तांबट यांनी शुभेच्छा दिल्या.



## विज्ञान प्रदर्शनातून वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना

| रोहा | प्रतिनिधी |

राष्ट्रीय अभियंता दिनानिमित्त दीपक नायट्राईट कंपनी, धाटाव, दीपक फाउंडेशनचा प्रकल्प यंग सायंटिस्टएसटीईएम आणि रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने रा.जि.प. शाळा, खैरे खुर्द येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनात एकूण ३१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत ३१ विज्ञान मॉडेल्स तयार करून त्यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि नाविन्यपूर्ण विज्ञान मॉडेल्सच्या सादरीकरणामुळे प्रदर्शनाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये 'शिकणे, प्रयोग करणे आणि नव्याने निर्माण करणे' या दृष्टिकोनाला चालना मिळून भविष्यातील वैज्ञानिक व तांत्रिक क्षमतांच्या विकासासाठी भक्कम पाया तयार होण्यास मदत होईल, असा आशावाद आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला.




## वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची किनार



| उरण | प्रतिनिधी |

उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी आपला वाढदिवस समाजसेवेतून साजरा केला. विशेष मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवितानाच ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून त्यांनी वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची किनार दिली.

स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान संचलित सीबर्ड विशेष मुलांची शाळा, नवःशांती, बोरी नाका, मोरा रोड येथे नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी भेट देऊन या मुलांसोबत काही आनंदाचे क्षण घालविले. यावेळी मुलांना खाऊ आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

तसेच, वाढदिवसाच्या निमित्ताने उरणच्या विमला तलाव परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात जनरल चेकअप, रक्त तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर, ईसीजी तसेच नेत्र तपासणी करण्यात आली. उरण मेडिकल असोसिएशन, शंकरा व्हिजन सेंटर आणि शासकीय आरोग्य विभागातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. मेडिकल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. घन:श्याम पाटील, सेक्रेटरी सत्या ठाकरे यांच्या टीमने विशेष मेहनत घेत शिबीर यशस्वी केले.

## महिला शेतकरी नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |

शेती आणि शेतीपूरक व्यवसायात सक्रिय असलेल्या महिलांना जमिनीच्या मालकीशिवाय अधिकृत 'शेतकरी' म्हणून कायदेशीर ओळख देणाऱ्या महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिलांना शेतकरी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी गुरुवारी (दि.१) श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन ग्रामपंचायत कार्यालयात महिला शेतकरी नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ग्रामपंचायत आणि कृषी विभागाच्या सहभागातून आयोजित या शिबिरात ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर आणि कृषी सहाय्यक पंकज पाटील यांच्या उपस्थितीत महिला शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली. शेतकरी प्रमाणपत्राचे महत्त्व, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे तसेच उपलब्ध शासकीय सुविधांबाबत महिलांना माहिती देण्यात आली.

दिशा महिला प्रभाग संघाच्या अध्यक्षा मानसी जाधव आणि ग्रामसखी आदिती मयेकर यांनी शिबिरात नोंदणीसाठी महिलांना विशेष सहाय्य केले. शेतजमीन स्वतःच्या नावावर नसली तरी प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिलांना महिला शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळणार आहे. तसेच मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन, मधमाशीपालन, फलोत्पादन, पुष्पोत्पादन, अळंबी लागवड, कृषी-वनीकरण आणि गौण वनोत्पादन संकलन अशा शेतीपूरक व्यवसायात कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळणार आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे पात्र महिलांना बँक कर्ज, शासकीय अनुदाने, पीकविमा आणि विविध कृषी योजनांचा लाभ घेणे अधिक सोपे होणार आहे. तसेच इतर कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठीही हे प्रमाणपत्र उपयुक्त ठरणार आहे.

पंचायत समिती सदस्य सुकूमार तोंडलेकर यांनी शिबिराला भेट देऊन जास्तीत जास्त महिलांनी शेतकरी म्हणून आपली नोंदणी करून उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## चिमुकल्यांच्या वेशभूषेतून उमटले गांधी विचारांचे संस्कार

| माणगाव | प्रतिनिधी |

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त माणगाव येथील एस. एन. शिपूरकर प्री-प्रायमरी अँड प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्री-प्रायमरी विभागात गांधी जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत गांधीजींच्या विचारांना बालमनातून अभिवादन केले.

गांधी जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याची आठवण करून देणाऱ्या आकर्षक वेशभूषा केल्या होत्या. काही चिमुकले गांधीजींच्या वेशात, तर काही विद्यार्थ्यांनी विविध सर्जनशील रूपांमध्ये सहभाग घेतला. या निरागस वेशभूषेतून सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि साधेपणाचा संदेश बालमनापर्यंत पोहोचविण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला. आपल्या छोट्या-छोट्या कृतींतून विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या महान विचारांना जणू भावपूर्ण मानवंदना दिली. लहान वयातच विद्यार्थ्यांना देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, महात्मा गांधींचे योगदान आणि त्यांच्या जीवनमूल्यांची ओळख व्हावी, तसेच सत्य, अहिंसा, प्रेम, बंधुभाव आणि स्वच्छतेची मूल्ये त्यांच्या मनात रुजावीत, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



## महात्मा गांधी जयंती साजरी

**कोलाड :** श्रीमती गीता द.तटकरे तंत्रनिकेतन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छता व सामाजिक बांधिलकीची शपथ घेतली. कार्यक्रमास संस्थेतील रजिस्टार अजित तेलंगे, संस्थेचे प्रा. विपुल मसाल, आयटीआयचे प्रा.संजय हजारे, शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**सागरी पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश | ६२ स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग**

# एन.एस.एस.विभागातर्फे कामथ समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता

| अलिबाग | प्रतिनिधी |

एल. एस. पी. एम. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा २४ सप्टेंबर रोजी वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिन तसेच सागरी स्वच्छता दिनाचे औचित्य साधून कामथ येथील समुद्रकिनाऱ्यावर विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सागरी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.




या स्वच्छता अभियानात महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागासोबत सागरी सीमा मंच, किहीम, महाविद्यालयातील डी.एल.एल.ई. विभाग, किहीम ग्राम पंचायत, कामथ गावातील ग्रामस्थ तसेच भिल्लेश्वर क्रीडा मंडळ, जय भवानी क्रीडा मंडळ यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ६२ स्वयंसेवकांनी समुद्रकिनाऱ्यावर प्रत्यक्ष स्वच्छता करून प्लास्टिक, कचरा व इतर घनकचरा गोळा केला.

समुद्रकिनारे हे केवळ पर्यटनाचे ठिकाण नसून सागरी जैवविविधतेचे महत्त्वाचे अधिवास आहेत. समुद्रकिनाऱ्यावर साचणारा प्लास्टिक व इतर कचरा समुद्री जीवसृष्टीसाठी घातक ठरतो तसेच सागरी पर्यावरणाचा समतोल बिघडवतो. त्यामुळे समुद्रकिनारे स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारी आहे. 'स्वच्छ समुद्रकिनारा, निरोगी पर्यावरण' हा संदेश या अभियानातून देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी स्वतः स्वच्छता करून पर्यावरण संरक्षणाची जाणीव समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. लीना पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घेत सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# निवडक

## रघुनाथ खोले सेवानिवृत्त

**रसायनी :** रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा (रसायनी) येथे सुमारे ४० वर्षे प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा बजावून मोहोपाडा येथील रघुनाथ दत्तात्रेय खोले हे दि.३० सप्टेंबर २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ सेवेनिमित्त सेवानिवृत्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. रघुनाथ खोले यांनी १८ जुलै १९८६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा येथे सेवा बजावली. आपल्या सेवाकाळात त्यांनी कंपनीच्या कार्यप्रणालीत महत्त्वपूर्ण योगदान देत जबाबदारी, शिस्त आणि समर्पणाची भावना जपत सेवा केली. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त अनंता पाटील फार्म हाऊसजवळ, तळेगाव पानशिळ रोड येथे गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहकारी, मित्रपरिवार व हितचिंतकांनी रघुनाथ खोले यांचा सत्कार करून त्यांच्या दीर्घ सेवेला गौरवपूर्ण निरोप दिला. यावेळी उपस्थितांनी रघुनाथ खोले यांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील योगदानाच्या आठवणींना उजाळा देत त्यांना निरोगी, आनंदी व सुखी सेवानिवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.





## शाळेत आजी-आजोबा दिन साजरा

**खानाव :** रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा खानाव येथे आजी-आजोबा दिन उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेत उपस्थित राहिलेल्या आजी-आजोबांचे त्यांच्या नातवंडांनी तसेच शाळेतील शिक्षिकांनी औक्षण करून प्रेमपूर्वक स्वागत केले. नातवंडांच्या हातून झालेले औक्षण पाहून आजी-आजोबांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून येत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. आजी-आजोबांचा आदर करणे, त्यांच्याशी प्रेमाने वागणे, त्यांचे अनुभव व संस्कार आत्मसात करणे आणि त्यांच्या भावनांची जपणूक करणे, याबाबत विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली. आजी-आजोबांनीही आपल्या नातवंडांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी आपल्या जीवनातील अनुभव, आठवणी आणि संस्कारमूल्ये विद्यार्थ्यांसोबत शेअर केली. त्यांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना अनेक मौल्यवान गोष्टी शिकण्याची संधी मिळाली. या उपक्रमातून आजी-आजोबा आणि नातवंडांमधील प्रेमाचे व जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ झाले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठ व्यक्तींबद्दल आदर, कृतज्ञता आणि संवेदनशीलता निर्माण करण्यास मदत झाली.

## अंजली भोले यांचे यश

**रसायनी :** ॲडव्होकेट अंजली अनिल भोले यांनी एलएल.एमची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अंजली भोले यांच्या या यशामुळे तिच्या कुटुंबीयांचे व आप्तेष्टांचे स्वप्न साकार झाले असून, त्यांच्या मेहनतीला आणि जिद्दीला यशाची जोड मिळाली आहे. या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांना पुढील शैक्षणिक तसेच व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. अंजली या जेष्ठ पत्रकार रमेश भोळे यांची नात असून जेष्ठ पत्रकार अनिल भोळे यांची मुलगी आहेत.






## महात्मा गांधी जयंती साजरी

**वाघ्रण :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या मा. वि.मं. फोफेरी हायस्कूलमध्ये मेरा युवा भारत रायगड केंद्राच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या देश आणि व्यसनमुक्तीच्या शपथेने झाली. यावेळी रॅली देखील काढण्यात आली. त्यानंतर महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्रींच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पेढांबेचे उपसरपंच रुपेश पाटील, रायगड भूषण वाघ्रणचे पत्रकार दिपक पाटील, मेरा युवा भारत केंद्र रायगडचे असिस्टन जयेश म्हात्रे होते. तर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अनंत गायकर, निवेदक संजय गायकवाड आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. प्रश्नमंजुषाही घेण्यात आली. यातील विजयी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय भाषण झाल्यावर विद्यार्थांना खेळाचे साहित्य केंद्राच्या वतीने जयेश म्हात्रे, प्रमुख अतिथी यांनी शिक्षकांकडे सुपुर्द केला.



## उरण तालुक्यात 'नेतृत्व संवाद' बैठक

**चिरनेर :** सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने, उरण तालुक्यातील चिरनेर येथील ग्रामपंचायत सभागृहात 'नेतृत्व संवाद' बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. फार्मर कपमध्ये सहभागी झालेल्या शेतकरी गटांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीला कृषी सहाय्यक अधिकारी अदीका पानसरे, उपकृषी अधिकारी अलका बुरकुल, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर, तसेच पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक आशिष लाड व विजय नाचरे यांच्यासह शेतकरी गटांचे प्रतिनिधी व शेतकरी उपस्थित होते. यावेळी फार्मर कपच्या माध्यमातून शेतकरी गटांनी केलेल्या कामाचा आढावा घेताना, खरीप हंगामानंतर गटाची पुढील वाटचाल, गटातील एकजूट, सामूहिक शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीसाठी भविष्यातील उपक्रम याबाबत बैठकीत सकारात्मक संवाद साधण्यात आला.

# नवी मुंबईत मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रम

**| उरण | वार्ताहर |**

नवी मुंबई पोलीस अंतर्गत पोर्ट विभागाच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान विविध गुन्ह्यांमध्ये हस्तगत करण्यात आलेला एकूण २०,१८,३०२ रुपये किमतीचा मुद्देमाल मूळ फिर्यादींना परत करण्यात आला.

पोलीस पथकाने तांत्रिक कौशल्य व अथक तपास करून जप्त केलेला १० प्रकरणांतील मुद्देमाल फिर्यादींना सोपवला. यामध्ये प्रामुख्याने भारतीय चलनातील नोटा, सोन्याचे कॉईन, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे. या कारवाईअंतर्गत सचिन शर्मा, सुरेंद्रकुमार मस्के, शिवानंद गुरु, सोनाली मिरगे, प्रीतम पाटील, सुबोध राव, सोनू कनोजिया, अतुल अग्रवाल आणि अल्लाउद्दीन शेख या फिर्यादींना त्यांचा मुद्देमाल सुपूर्द केला.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.आशिष विश्वनाथ लाड व श्री. चेतन विश्वनाथ लाड, रा. वेणगाव दहिवली रोड, ५८७, संजय नगर, दहिवली, ता.कर्जत,जि.रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे जामरूंग, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०७/३/क | ०.८४.३०<br>पो.ख. ०.०३.७०<br>एकुण ०.८८.०० | ०.७८ | श्री. कपिल दिलीप देशपांडे |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :-०३/१०/२०२६.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे. मो.नं. ७३८५००४८०६.

## उपविभागीय अधिकारी रोहा, उपविभाग रोहा यांच्या न्यायालयात
## जाहीर नोटीस

अर्ज क्र. ०२/२०२६

१. लिलावती तानाजी मांढरे
रा. दिघेवाडी, पो.नांदगाव, ता.सुधागड जि.रायगड
अपिलार्थीतर्फे अखत्यारी — अपिलार्थी
सुमित सुभाष मांढरे
रा.दिघेवाडी, पो.नांदगाव, ता.सुधागड जि.रायगड

विरूद्ध

१. मोहन रामचंद्र मेहता (मयत) मयतांस कोणीही वारस नाही.
२. मीना मधुकर शेठ
रा.मु.पो. पाली, गांधी चौक,
ता.सुधागड,जि.रायगड
३. सुरेखा शरद बुटाला मयत तर्फे वारस
३/१. सुधीर शरद बुटाला
३/२. सुनिल शरद बुटाला
३/३. संजय शरद बुटाला
३/१ ते ३/३ रा. मु.पो.खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी
४. सुप्रिया शरद शेठ — उत्तरार्थी
रा. मु.पो.पोलादपुर, ता.पोलादपूर, जि. रत्नागिरी
५. उषा शशिकांत तलाठी मयत तर्फे वारस
५/१. पारूल राकेश तलाठी
५/२. लिनल राकेश तलाठी
दोघेही रा. ओंकार को ऑप. सोसायटी, जय कॉम्पलेक्स,
चिंचपाडा, रोड, ता. पेण, जि. रायगड
६. अशोक कृष्णकांत मेहता
७. राजेंद्र कृष्णकांत मेहता
८. मनिषा जयंत मेहता
९. विराज जयंत मेहता
१०. स्वराज जयंत मेहता
अ.क्र. ६ ते १० रा. मु. पो. पाली बाजारपेठ (मोहल्ला)
ता. सुधागड, जि. रायगड
११. प्रदीप चंद्रकांत मेहता
१२. सरोज संतोष मेहता
१३. अजय चंद्रकांत मेहता
अ.क्र. ११ ते १३ रा. मेहता पेट्रोल पंपाच्या शेजारी, दापोली विद्यापीठ रोड,
ता. दापोली, जि. रत्नागिरी
१४. संध्या सुहास तलाठी
रा. मु. पो. वाकड, ता. वाकड, जि. पुणे
१५. तलाठी सजा नांदगाव
ता. सुधागड, जि. रायगड
१६. मंडळ अधिकारी नांदगाव
ता. सुधागड, जि. रायगड

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये मौजे दिघेवाडी, ता. सुधागड येथील ग.न. २७८, या मिळकतीबाबत दाखल फेरफार क्र. २४५ च्या विरोधात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक १५/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतः अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.
दि. २४/०९/२०२६
दिनांक: २४/०९/२०२६

**उपविभागीय अधिकारी रोहा**
**उपविभाग रोहा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेल्या खालील परिशिष्ठामध्ये वर्णनिलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी या जमीन मिळकतींचे सध्याचे मालक, १. दिलीप शामराव कुलकर्णी, २. प्रदीप शामराव कुलकर्णी, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**१. मौजे - मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| गाव | जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मिरचोली | दिलीप शामराव कुलकर्णी | १४/५/अ | १.४३.००<br>या एकूण क्षेत्रापैकी दिलीप शामराव कुलकर्णी, यांचे भोगवटासदरी नावे असलेले ०.२१.७९ इतके क्षेत्र विकत देणेचे ठरले आहे. | ०.१४ |
| मिरचोली | प्रदीप शामराव कुलकर्णी | १४/५/अ | १.४३.००<br>या एकूण क्षेत्रापैकी प्रदीप शामराव कुलकर्णी, यांचे भोगवटासदरी नावे असलेले ०.२१.१४ इतके क्षेत्र विकत देणेचे ठरले आहे. | ०.०५ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. ०३/१०/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. वैभव अशोक शिंदे**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ७०५८८५१२२१/७७४४८५१४६९

## जाहीर नोटीस

आमचे अशिल १) श्रीमती. मनिषा अरूण भागवत, रा.निर्मला एनक्लेटर, फ्लॅट नं.१०४, चावडी नाका, पेण, ता.पेण, जि.रायगड, २) श्री.अशिष अरूण भागवत, रा. प्लॉट नं.१०, सर्व्हे नं.१३३/१, साई प्लॉझा मोनीलाल वृद्धाश्रमाच्या मागे गुरूद्वारा चौक चिंचवड, पुणे, ४११ ०३३, ३) श्री.अमित अरूण भागवत, रा.भागवत वाडा, देवआळी, गोपाळकृष्ण हॉलजवळ, ता.पेण जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणेः-

आमचे अशिलांनी १. श्री.जितेंद्र देवजी शहा, २ .श्री.निरव जितेंद्र शहा, दोघे रा.ए, १२०६, शंकर शेट पॅलेस, ३००/सी, जाओजी दादाजी रोड, नाना चौक, ग्रॅट रोड, पश्चिम, मुंबई ४०० ००७, यांना तारीख २८/०९/२०२६ मौजे रामराज ता.पेण भुमापन क्र.१५/१, १६, १७/१, २२/२/अ, २२/३/अ, २२/४ या मिळकतीसंदर्भात तारीख १९/०६/२०२४, २९/०३/२०२५ रोजीचे करार आणि अखत्यारपत्र रद्द केले आहेत. तरी यापुढे वर नमूद मिळकतीबाबत कोणीही श्री.जितेंद्र देवजी शहा व निरव जितेंद्र शहा यांच्याशी कोणीही व्यवहार करू नये. तसा कोणीही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर होईल व कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

तारीख : १/१०/२०२६

सही/-
**ॲड.डी.एन.जोशी**
**जिल्हा न्यायालय अलिबाग**

## टायटल व्हेरिफिकेशनची जाहिर नोटीस

सर्व लोकांना कळवण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** :- तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत पैकी **मौजे चाफेवाडी, तालुका कर्जत**, जिल्हा रायगड, तलाठी सजा खांडस, यासी हद्दीतील शेती जमीन मिळकत, यांसी **सर्व्हे नं. ३१/१/ब** यांसी एकूण **क्षेत्र २ हे. ४० आर १० चौं.मी. यांसी आकार रु. ३.००, त्यापैकी ० हे. ४० आर ०० चौं.मी. क्षेत्र** असलेली शेती जमीन मिळकत. यांसी **चतुः सिमा- पूर्वेस ३१/२, दक्षिणेस इन्टर्नल प्लॉट नं. ६, पश्चिमेस इन्टर्नल प्लॉट नं. ९ व १०, उत्तरेस ३१/१.** वरील नमूद **० हे. ४० आर ०० चौं. मी. क्षेत्राची शेती जमीन मिळकत** ही **श्री. अपुर्व हेमंद्र सातिया** यांच्या मालकी हक्कातील मिळकत असून, सदर मिळकतीच्या निर्वेधपणाची व मालकी हक्काची खात्री करणेकरीता प्रस्तुतची टायटल व्हेरिफिकेशनची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सबब, सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही तऱ्हेने **मालकी हक्क, हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लायसन्स, लियन, अन्नवस्त्र, कोर्टवाद, कर्जबोजा, जप्ती, अटॅचमेंट, करार, ताबा, वारसाहक्क, हक्कसोड, दावा, हरकत, अधिग्रहणाची कार्यवाही किंवा इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा हितसंबंध** असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांचे** आत आमच्या ऑफिसमध्ये येऊन/मेल करून/व्हाट्स ॲप क्रमांकावर, त्यासंबंधीच्या **साक्षांकित दस्तऐवजांसह लेखी हरकत** घ्यावी. अन्यथा, सदर मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत **ही निर्वेध, बोजारहित व तबदील करण्यास योग्य** आहे, असे समजण्यात येईल. तसेच सदर मुदतीनंतर येणाया अथवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाया हरकती तसेच **संबंधित कागदपत्रांशिवाय घेतलेल्या हरकती** विचारात घेतल्या जाणार नाहीत. **ही टायटल व्हेरिफिकेशनची जाहीर नोटीस.** तारीख : ०२/१०/२०२६

**ॲडव्होकेट, सागर पी. साबळे** (बी.ए.एल.एल.बी.)
पत्ता - २८, मिलेनियम चेम्बर्स, दुसरा मजला मर्चंट टॉवर, शालिमार नाशिक, व्हाट्स ॲप क्रमांक-९४२२२२१०४०
Email: sagar.sabale@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सौविक कमलेश भट्टाचार्य यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे आर-पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ७६ | ६ | २-१३-०० | १-९० |

वरील जमिन मिळकतीमध्ये जमिन मालक यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-२०-० हे. आर. पॉ विकत देत आहेत.

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/१०/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-आंबिवली-बुद्रुक, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| शारदा उर्फ शारदाबाई सदानंद जोशी<br>माधवी नरेश जोशी | ४२ | २/ब | ०.१८.५० | २.०३ |

वर वर्णन केलेली शेतजमिन मिळकतींच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील शेतजमिन मिळकतींशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०२/१०/२०२६

अधिवक्ता
**श्री. संपत पांडुरंग हडप**
कार्यालय : विहंग अपार्टमेंट, गाळा नं ५,६,
कोतवाल नगर, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९८२२००६८५२/८४८४९०३३९
९०२८५५६४४७/९३७१८९९९५६

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्रीमती.अस्मिता वसंत पटवर्धन, रा.बी./४४ मिनीनगर, एस.एन.दुबे रोड, हनुमान मंदिराजवळ, रावलपाडा, दहिसर, पूर्व, मुंबई नं.६८ यांनी दिलेल्या माहितीवरून जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणेः

आमचे अशिलांनी १.श्री.जितेंद्र देवजी शहा, २.श्री.निरव जितेंद्र शहा, दोघे रा.ए.१२०६, शंकर शेट पॅलेस, ३००/सी, जाओजी दादाजी रोड, नाना चौक, ग्रॅंट रोड, पश्चिम, मुंबई, ४०० ००७, यांना तारीख २८/०९/२०२६ मौजे रामराज ता.पेण भुमापन क्र.३५/८, ५०/१ व ३३ ब या मिळकतीसंदर्भात तारीख १९/०६/२०२४, २९/०३/२०२५ रोजीचे करार आणि अखत्यारपत्र रद्द केले आहेत. तरी यापुढे वर नमूद मिळकतीबाबत कोणीही श्री.जितेंद्र देवजी शहा व निरव जितेंद्र शहा यांच्याशी कोणीही व्यवहार करू नये. तसा कोणीही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर होईल व कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

तारीख : १/१०/२०२६

सही/-
**ॲड.डी.एन.जोशी**
**जिल्हा न्यायालय अलिबाग**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. योगेश अशोक भोपतराव, सौ.योजना योगेश भोपतराव यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे टाकवे, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमिन मिळकत सर्व्हे नं १/९ एकुण ००.०२.५० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी शेतजमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०३/१०/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १४१/२०२६

श्रीमती मानसी महादेव घाणेकर वगैरे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीस द्वारे असे कळविणेत येते की, श्रीमती मानसी महादेव घाणेकर आणि श्री. मयूर महादेव घाणेकर हे कै. महादेव सदाशिव घाणेकर यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही कै. महादेव सदाशिव घाणेकर यांना कायदेशीर वारस नाहीत असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी कै. महादेव सदाशिव घाणेकर यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयांत दिनांक ०५/११/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक ०५/११/२०२६ रोजी या जाहीर नोटीसला अनूसरुन अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार याचे लाभात वारस दाखल जारी करणेची पुढील कार्यवाही करेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

अलिबाग

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
वरिष्ठ स्तर,अलिबाग

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांबरोबर खाली वर्णन केलेली जमीन मिळकतीचा खरेदी-विक्री व्यवहार करण्यासाठी सदर मिळकतीचे विद्यमान मालक कुणाल सुरेंद्र शाह, दिपक नंदलाल शाह, भरत नंदलाल शाह यांनी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) | भू-धारणा पद्धती |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी तालुका अलिबाग, जिल्हा रायगड | २३५/९ | ०-४१-०० | १-२८ | भोगवटादार वर्ग-१ |

तरी सदर जमीन मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्याचा कोणाचाही दावा असल्यास त्यांनी खाली सही करणार यांच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत त्यांच्या हक्काविषयीची कागदपत्रे घेवून हजर राहण्याचे आहे. जर उक्त मुदतीत कोणीही सदर मिळकतीवर हक्क सांगण्यासाठी कायदेशीर कागदपत्रांसह हरकत घेतली नाही किंवा म्हणणे मांडले नाही तर आमचे अशिल सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून सदर जमीन मिळकतीच्या विद्यमान मालकांबरोबर विक्री व हस्तांतरण व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत आल्यास ती आमच्या अशिलांवर तसेच जमीन मालकांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : २९-०९-२०२६

**(ॲड. अमर अशोक घरत)**
मु.पो.-थळ, ता.अलिबाग,
जिल्हा-रायगड.
मो-८८०५०३७४७४.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे अबीटघर, ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| अबीटघर ता.मुरुड | ७ | वरकस ३-२३-००<br>पो.ख. ०-६७-००<br>एकुण ३-९०-०० | १.८७ |
| | १५ | वरकस १-६२-००<br>पो.ख. ०-४२-००<br>एकुण २-०४-०० | ०.९४ |

वर वर्णन केलेल्या गट नं. ७ या मिळकती पैकी विद्यमान मालक यांचे नावे असलेले १-३०-०० हे. आर. क्षेत्र आणि गट नं.१५ या मिळकती पैकी विद्यमान मालक यांचे नावे असलेले १-२४-०० हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती या विद्यमान मालक १) प्रकाश गजानन गोरेगावकर, २) प्रविण गजानन गोरेगावकर, ३) लिना मोहन माहीमकर, ४) राजश्री राजेंद्र पिसाट, ५) तृप्ती व्यंकटेश हळदवणेकर, ६) पुजा प्रदिप हाटे, ७) दिपीका दिनेश जामसांडेकर, ८) अशोक गजानन गोरेगांवकर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारीही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०२/१०/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हणआळी, राम मंदिर समोर,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक मे. मंदार इंटरप्रायझेस यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याविषयी ठरले असून लवकरच खरेदीखत रजिस्टर करण्यात येणार आहे. सदर मिळकती निर्वेध, बोजाविरहीत असल्याबद्दल खात्री करण्याकरीता ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता. अलिबाग ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील सर्व्हे नं. ९६, हिस्सा नं. १ सी २, क्षेत्र ०-०४-५० आर चौ. मी. व सर्व्हे नं. ९६ हिस्सा नं १ सी ३ क्षेत्र ०-०४-५० आर चौ. मी. या मिळकतींवरील ओम वक्रतुंड रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे या इमारतीमधील, तळ मजल्यावरील दुकान गाळा नं. ०३ क्षेत्र १२.६३ चौ. मी कारपेट, दुकान गाळा नं. ०४ क्षेत्र १२.६३ चौ. मी कारपेट व दुकान गाळा नं. ०८ क्षेत्र १२.६३ चौ. मी कारपेट.

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कुणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क व खरेदीखत या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

याप्रमाणे मुदतीत कुणाचीही तक्रार, हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध समजून मिळकतीचे मालकाबरोबर रजिस्टर खरेदीखत पूर्ण केले जाईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.
हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/१०/२०२६

MP's Consultancy
**श्री.मधुकर पाटील**
१५. त्रिमुर्ती प्लाझा, ए बिल्डींग
बीच रोड. अलिबाग अर्बन बँक समोर,
अलिबाग ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, गट नं. ८९/४, क्षेत्र ०-२०-५० हे.आर., पो. ख. ०-०२-३० हे.आर., एकूण क्षेत्र ०-२२-८० हे.आर., आकार ४.०५ रू. पै. ही भातशेती व गवत मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. अभय अर्जुन पारकर २) श्रीमती उर्मिला बब्रुवान पारकर ३) श्रीमती शारदा मेघनाथ पारकर ४) श्री. संजय मेघनाथ पारकर ५) विरश्री विजय शिरणकर उर्फ सबीरा सकिर अली शेख ६) श्री. विजय कृष्णा कदम ७) श्री. सागर कृष्णा कदम ८) सुनिता कृष्णा कदम ९) रूपाली भालचंद्र पाटील १०) समिधा सुनिल पेडणेकर ११) श्री. अमित राजेंद्र पारकर १२) श्रीमती रेखा राजेंद्र पारकर १३) श्री. समीर राजेंद्र पारकर यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/१०/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे गौळवाडी ता. कर्जत जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**मौजे गौळवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४९ | ७ | ०-५२-६०<br>पो.ख. ०-०४-३०<br>एकुण क्षेत्र ०-५६-९० | ३.०० |
| ५० | ७ | १-०१-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण क्षेत्र १-०३-००<br>या पैकी<br>०-०१-०० रस्त्यासाठी | ०.७३ |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री उदय पंढरीनाथ भदे व इतर यांच्या ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : ३०/०९/२०२६

**ॲड. पराग मनोहर सावंत**
नाना मास्तर नगर कर्जत
ता. कर्जत जि. रायगड ४१०२०१
९८३३४४५५३३
श्री. दिपेश रतीलाल सेठीया
श्री. नितीन विजयसिंह पोंदकुले
९९३०८२९९९१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा What-sApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● **झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी** मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९

● जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८० ३४५०९

● **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 50,000 Per Month, Location Zirad. Contact - 9823585321

● **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 Per Month, Location : Bamansure, Chondhi. Contact - 9823585321.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष :** व्यवसायात साधारण स्थिती राहील. अमिषाला बळी पडू नका. आर्थिक व्यवहारात सावध रहा.
- **वृषभ :** मनाजोग्या घटना घडतील. प्रगतीच्या संधी लाभतील. उद्योगात नव्या बदलासाठी प्रयत्न होतील.
- **मिथुन :** कलाकारांचा उत्साह वाढेल. विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागेल. संयम बाळगावा.
- **कर्क :** नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावे. धावपळ, दगदग होईल.
- **सिंह :** कामाचा उत्साह वाढता राहील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रगतीच्या संधी लाभतील.
- **कन्या :** आर्थिक समस्या संभवतात. कौटुंबिक मतभेद टाळावेत. सांस्कृतिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ :** नोकरी-व्यवसायात बदलाचा विचार होईल. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. विचारानं रहावं.
- **वृश्चिक :** सरकारी कामांमध्ये प्रगती होईल. बेरोजगारांना दिलासा मिळेल. आर्थिक समस्या सुटतील.
- **धनु :** चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. बोलण्यातून गैरसमज निर्माण होतील. विचारानं रहायला हवं.
- **मकर :** व्यवसायात नवीन संधी चालून येतील. महत्त्वाच्या कामांबाबत दिलासा मिळेल. समाधानी रहाल.
- **कुंभ :** सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल. मानसिक स्वास्थ्य लाभणार आहे.
- **मीन :** अपेक्षित वार्ता कानी येईल. मित्र-मैत्रिणींचं सहकार्य लाभेल. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.

## दिन विशेष

### ३ ऑक्टोबर

**१७७८ :** कॅप्टन जेम्स कूक अलास्का इथे दाखल.
**१९४२ :** जर्मनीतील पीनेमुंडे तळावरुन व्ही-२ ए-४ क्षेपणास्त्राचं प्रक्षेपण. हे क्षेपणास्त्र म्हणजे सर्वप्रथम अंतराळात पोहोचलेली मानवनिर्मित वस्तू होती.
**१९८५ :** स्पेस शटल अटलांटिसने अंतराळात प्रथमतः झेप घेतली.
**२०१३ :** केंद्रीय मंत्रिमंडळाने वेगळ्या तेलंगण राज्याच्या निर्मितीसाठी केंद्रीय मंत्रिगटाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला.

## आरोग्यमंत्र

### कोलेस्टेरॉलसंबंधी...

कोलेस्टेरॉल हा शब्द आपण वारंवार ऐकतो. यासंबंधीच्या दुखण्याची माहितीही घेतो. हे रक्तदाबाशी घनिष्ठ संबंध असणारं एक जैवरसायन म्हणजे पेशीपटलाचा एक आवश्यक घटक आहे. कोलेस्टेरॉलची उत्पत्ती यकृतात होते. मात्र शरीराला आवश्यक असणारे हे संप्रेरक शरीरात अनेक ठिकाणी अनावश्यक प्रमाणात गोळा होऊन व्याधींना कारणीभूत ठरु शकतं. १७५८ मध्ये फ्रेंच वैद्यकतज्ज्ञ फ्रँकाय पुलेटिए यानं पित्ताशयातील विकारांवर संशोधन करताना त्यातील काही अज्ञात स्वरूपाचे खडे वेगळे




केले. यानंतर १८१५ मध्ये मायकेल-युजिन शेव्हरूल या फ्रेंच वैद्यकतज्ज्ञाने पित्ताशयातील या खड्यांपासून स्फटिकरूपातला कालांतरानं 'कोलेस्टेरॉल' या नावाने ओळखला गेलेला पदार्थ वेगळा केला. पण या कोलेस्टेरॉलचा हृदयविकाराशी असणारा संबंध स्पष्ट होण्यास आणखी एक शतक जावं लागलं. मानवी शरीरातल्या रोहिण्यांमध्ये जाडसर पदार्थ जमा होत असल्याचं जर्मन वैद्यकतज्ज्ञांना एकोणिसाव्या शतकातच लक्षात आलं होतं. १९१० मध्ये जर्मन रसायनतज्ज्ञ ॲडॉल्फ विंडॉस यांनी रक्तदाबाची लक्षणं असणाऱ्या रुग्णाच्या रोहिणीच्या आत जमा झालेल्या जाडसर थराचं पृथःकरण केलं. त्या थरातलं कोलेस्टेरॉलचं प्रमाण सर्वसाधारण रोहिण्यांमधल्या थरात असणाऱ्या कोलेस्टेरॉलपेक्षा २५ पट अधिक असल्याचं त्यांना आढळले. त्यानंतर १९१३ मध्ये निकोलाय अनित्शोकॉव या रशियन वैद्यकतज्ज्ञाने पुढील संशोधन करुन हा थर जमा होण्याची कारणं शोधली.

## नॉलेज

### प्लास्टिकमुक्त पृथ्वीसाठी...

त्यातील बरंच साहित्य एकदा वापरून टाकून दिलं जातं. अर्थात या वस्तूंना पर्यायही सापडायला हवेत.

प्लास्टिकचं विघटन होण्यास काही हजार वर्षांचा कालावधी लागतो. प्लास्टिकच्या पिशव्या किंवा इतर वस्तू रिसायकल केल्या नाहीत तर त्या पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात. या वस्तू वातावरणात जशाच्या तशा रहातात. प्लास्टिकचा बराच कचरा समुद्रात टाकला जातो. यामुळे मासे आणि इतर समुद्री जीवांचं जीवन धोक्यात येतं. समुद्रात टाकलेलं प्लास्टिक वर्षांनुवर्षे तळाशी साठून रहातं. त्यामुळे तुम्हीही प्लास्टिकचा वापर थांबवा आणि तुमच्या मित्रमैत्रिणींनाही याचं महत्त्व समजावून सांगा. पृथ्वी प्लास्टिकमुक्त करणं हे आपल्यापैकी प्रत्येकाचं कर्तव्य आहे.

## ब्युटी टॉक

### लिपस्टिकचा असाही वापर

तुमच्याकडच्या लिपस्टिकचा वापर वेगवेगळ्या पद्धतींनी होऊ शकतो. त्यामुळे तुमच्याकडे काही मेक अप उत्पादनं नसली तरी चालू शकतं. एका लिपस्टिकचा कसा उपयोग करता येईल याविषयी...

* गुलाबी गाल खूप सुंदर दिसतात. ब्लशमुळे चेहऱ्याचं सौंदर्य खुलतं. तुमच्याकडे ब्लश नसेल तर काळजी करू नका. लाल किंवा गुलाबी लिपस्टिक घ्या. थोडीशी लिपस्टिक गालांवर लावा. बोटांनी पसरून घ्या. यामुळे तुम्हाला ब्लश लूक मिळेल. * डोळ्यांखालची काळी वर्तुळं लपवण्यासाठीही लिपस्टिक वापरता येईल.काळ्या वर्तुळांवर थोडी लिपस्टिक लावा. हलक्या हातांनी पसरवरून घ्या. त्यावर फाउंडेशनचा थर द्या. यामुळे काळी वर्तुळं लपतील. * लिपस्टिकचा वापर आयशॅडो म्हणूनही करता येईल. यासाठी पापण्यांलगत थोडीशी लिपस्टिक लावा. बोटांनी पसरवून घ्या. * अंगावर काढलेला टॅटू काही प्रसंगांमध्ये खटकतो. अशा वेळी लिपस्टिकने हा टॅटू लपवता येईल. टॅटूवर लिपस्टिक लावून पसरवून घ्या. आता त्यावर कंसीलर किंवा पावडर लावा. टॅटू लपेल.

## पंचांग

**शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद कृ. ७/८, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा, योग : वरियान, सूर्योदय ६.३२४, सूर्यास्त ६.२५

## फॉरवर्ड्स

**मालूम था क़ी डूब जाना हैं मुक़द्दर एक़ दिन...**

**उन कागज़ क़ी कश्तियों क़ा ग़ुरूर भीं क़माल था...!**

## भटकंती

बूंदीमध्ये किल्लेही आहेत. इथला एक किल्ला दोन भागांमध्ये विभागला गेला आहे. या किल्ल्याचा वरचा भाग तारागड म्हणून ओळखला जातो आणि खालच्या भागाला फक्त गड असं म्हणतात. १२४२ मध्ये राव देवाजीने या शहराची स्थापना केली. बूंदा मीणा या सरदाराच्या नावावरून या शहराला बूंदी हे नाव पडल्याचं म्हटलं जातं. या शहरातलं हाथी पोल हे द्वार भव्यतेचं प्रतीक आहे. हे द्वार स्थापत्यकलेचा उत्तम नमुनाही आहे. हे द्वार बूंदीतलं एक खास आकर्षण आहे. पावसाळ्यात या शहराचं सौंदर्य अधिकच खुलतं. नोव्हेंबर-डिसेंबरमध्येही इथे जाता येईल.

## करिअरवाटा

### वेळ दवडू नका

स्पर्धा परीक्षा देताना प्रश्नपत्रिका हातामध्ये पडल्यानंतर लगेचच ती सोपी आहे की अवघड याचा अंदाज घेण्याची काहींना सवय असते. अवघड प्रश्न बघून काहींना दडपणही येतं. वास्तविक प्रश्नपत्रिकेतला प्रत्येक प्रश्न कठीणच असतो असं नाही. काही प्रश्नांची शब्दयोजना वेगळ्या पध्दतीनं केलेली असते. मात्र विद्यार्थी शब्दयोजनेचं इंगित शोधण्याच्या प्रयत्नात बराच



घालवतात आणि मनःस्थितीही खराब करून घेतात. पण हे टाळून सोपे वाटणारे आणि ज्यांची उत्तरे हमखास माहीत आहेत असे प्रश्न आधी हाताळावेत. दरम्यान विचारांची प्रक्रिया सुरूच असते आणि थोड्या वेळानं आपोआप शब्द फिरवून विचारलेल्या त्या प्रश्नाचा अर्थही साकार झालेला असतो. ताण कमी झाल्यामुळेही हे शक्य होतं. असा उलगडा झाला की तो प्रश्न लगेच सोडवायला घ्यावा. या पध्दतीमध्ये वेळेचं व्यवस्थापन आहे आणि आपल्या मनःस्थितीचंही व्यवस्थापन आहे. शेवटी प्रश्नपत्रिका सोडवताना हे दोन्हीही आवश्यक असतं. प्रश्नपत्रिकेवर एक नजर टाकली की ताबडतोब लिहायला सुरूवात करावी. न लिहिता एकही मिनीट वाया घालवू नये. प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी अभ्यास आवश्यक आहे त्याचप्रमाणे व्यवस्थापनही आवश्यक आहे.

## खेचाखेची

### झोप

**प्राध्यापक (वर्गात):** मुलांनो, तुम्हाला फार अभ्यास करायचा आहे. आता परीक्षा जवळ येत आहेत. पण तुम्ही रोज कमीत कमी ७ तास झोप घेतलीच पाहिजे.

**बाळू:** सर, हे कसं शक्य आहे? कॉलेज तर फक्त सहाच तास असते ना?

## वेगळं काही

मध्यंतरी सिडनीतल्या एका महिलेने जाडजूड मुलीला जन्म दिला. जन्माच्या वेळी तिचं वजन जवळपास सहा किलो होतं. ऑस्ट्रेलियात नवजात बाळांचं सरासरी वजन ३.३ किलो असतं. इमा नावाच्या २७ वर्षीय महिलेने या वजनदार मुलीला जन्म दिला. हे बाळ एखाद्या सुमोसारखं दिसत असल्यामुळे त्याला 'मिनी सुमो रेसलर' हे टोपण नाव देण्यात आलं. बाळाचं वजन जास्त असेल याची कल्पना इमा आणि तिच्या पतीला होती. गरोदरपणातल्या काही चाचण्यांमधून ही बाब समोर आली होती. मात्र बाळ एवढं वजनदार असेल याची त्यांनी कल्पनाही केली नव्हती. दरम्यान इमाच्या पहिल्या बाळाचं वजन ३.८ किलो तर दुसऱ्या बाळाचं वजन ५.५ किलो होतं.

## सौंदर्यसाधना

### झटपट तयार होण्यासाठी...

सौंदर्यसाधनेस पुरेसा वेळ हाती नसेल तर तयार होताना काही टिप्स अनुसरा... त्या खात्रीने कामी येतील.

* अचानक पार्टीचा बेत ठरला आणि चेहरा निस्तेज दिसत असेल तर तुम्ही घरगुती फेस पॅक लावू शकता. बाजारातही भरपूर फेस पॅक्स उपलब्ध आहेत. या फेसपॅकचा वापर करून तुम्ही चेहरा उजळवू शकता. बाजारात इन्स्टंट फेसमास्कही



मिळतात. यामुळे तुम्ही झटपट ताज्यातवान्या दिसू शकता. * पायांचं सौंदर्य उजवळण्यासाठी तुम्ही मध आणि साखर यांचं मिश्रण लावू शकता. हे मिश्रण पायांवर लावून पाच मिनिटं मसाज करा. यानंतर धुवून टाका. यामुळे पाय छान उजळतील. * लिपस्टिकऐवजी लिप क्रेयॉन्सचा वापर करू शकता. यामुळे तुम्हाला इन्स्टंट मेक अप लूक मिळेल. * मेक अप करायला फार वेळ नसेल तर चेहऱ्याला सीसी क्रीम लावता येईल. आय लायनर, ब्लश आणि काजळही लावता येईल. भुवयांचा मेक अप करायला विसरू नका. आयब्रो पेन्सिल नसेल तर क्लियर मस्काराचा वापर करा * चेहऱ्याला शोभून दिसणारी हेअरस्टाईल करा. त्यामुळे वेगळा लूक मिळेल.

## सुडोकू १५६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | ६ | | | | ९ | ३ |
| | ८ | | | ७ | | ५ | | |
| | | ५ | | ४ | २ | | | १ |
| | ५ | | | | | | | |
| ९ | ३ | ६ | | १ | | ७ | ४ | ८ |
| | | | | | | | ३ | |
| १ | | | ७ | ८ | | २ | | |
| | | ८ | | ९ | | | १ | |
| ५ | ७ | | | | ४ | | | ६ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २ | ६ | ३ | ९ | ८ | १ | ७ | ४ |
| ७ | ३ | १ | ६ | ४ | २ | ८ | ५ | ९ |
| ४ | ९ | ८ | ५ | ७ | १ | ३ | ६ | २ |
| ६ | १ | ९ | २ | ८ | ३ | ५ | ४ | ७ |
| ८ | ४ | ५ | १ | ६ | ७ | ९ | २ | ३ |
| २ | ७ | ३ | ९ | ५ | ४ | ६ | ८ | १ |
| ९ | ८ | ७ | ४ | ३ | ५ | २ | १ | ६ |
| ३ | ५ | २ | ७ | १ | ६ | ४ | ९ | ८ |
| १ | ६ | ४ | ८ | २ | ९ | ७ | ३ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक १५६



**आडवे शब्द :-**
१) महादेवाचे एक नाव
३) विधवा
६) आग्रा येथील जगप्रसिद्ध वास्तू
१०) पाताळ
१२) भ्रमर
१३) मध्यस्थ
१५) पाळीपाळीने
१६) इच्छा
१८) चुलता (हिं.)
१९) ताजा ***, नव्या दमाचा
२१) अफवा
२४) सान
२६) काढलेली सुट्टी
२८) नेत्र
३०) चंद्र
३३) समुद्राच्या लाटांचा आवाज
३५) सत्वयुक्त
३७) सगळा, जमीनीवरील कर
३९) बंदी, मना
४०) पं नेहरुजींचे नाव
४२) पटल,
४३) दरवडा
४५) मंगलप्रसंगी वाजविण्याचे वाद्य
४६) मनाचा ओढा
४८) मोठा नगारा
५०) दारूचा एक प्रकार
५२) जमीन
५३) उपवासाचे तांदूळ
५४) दात
५६) लोणचे
५९) सुपारीचा तुकडा
६०) हिंदुस्थानी
६२) कपाळावरील भाग्यरेखा
६३) फोक, छडी
६५) गंध
६८) मोठी टोपली
६९) पराकाष्ठेचा लाभ
७०) सारखा
७२) लगेच, पाठोपाठ
७४) बसकर, योगाचे प्रकार
७५) भरभराट
७७) अंगाने जाड असलेली
७९) वाहणारी हवा
८०) गुंडांच्या दोन गटातील मारामारी
८१) पाठवणी
८२) सावकाराला कर्जावर द्यावयाची अधिक रक्कम

**उभे शब्द :-**
१) शनिवार
२) बाण सोडणे
३) अवस्था, स्थिती
४) पायाचा खालचा भाग
५) श्रीविष्णूचा बुटका अवतार
६) बळ, शक्ती
७) सोन्याचा धागा
८) चलनवलन
९) सत्ता
११) उंट हाकणारा
१४) जाळणे
१७) एक अधिक एक चतुर्थांश
२०) जासूद, पायदळातील नाईक
२२) कोवळा अंकुर
२३) दुर्दशा
२५) यावर्षी, यंदा
२७) जागृत, स्थान, ठिकाण
२९) धमनी
३१) प्रत्यक्ष कृती
३२) रोमांच उभे करणारे
३४) एक प्रकारची मोठी तलवार
३६) गाल, हनुवटीवरील केस
३८) आपला परका अशी भावना
४०) जन्म
४१) गर्द तांबडा रंग
४४) निमित्त, सबब
४७) कोवळे गवत
४९) एक प्राचीन पर्वत
५१) दिवटी
५५) किंमत
५७) बारीक नक्षीकाम
५८) सुंदर, शोभिवंत
६१) तीर्थयात्रा करीत फिरणे
६४) स्वस्तच्या विरुद्ध
६५) वाल्मिकी ऋषींचे पहिले नाव
६६) उत्सव
६७) प्रत्येक ठिकाणी
६९) रेशीमाचा किडा, कोळी
७१) दहावी रास
७३) सर, माळ, पानांचा भारा
७४) कुंभाराची भट्टी
७५) बांधलेला
७६) तेव्हा (ग्रा.)
७६) संध्याकाळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

# 'बजरंगी'च्या पोस्टरचे रहस्य



मराठी चित्रपटसृष्टीतील हरहुन्नरी अभिनेता सिद्धार्थ जाधव पुन्हा एकदा आपल्या चाहत्यांसमोर काहीतरी वेगळे घेऊन येत आहे. त्याच्या आगामी 'बजरंगी' या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले असून, पोस्टरने चित्रपटाच्या कथेपेक्षा त्यामागचे गूढ अधिक चर्चेत आणले आहे. हनुमंताचे विराट रूप, त्यामागे दिसणारा किल्ला, त्यावर डौलाने फडकणारा भगवा ध्वज आणि हनुमंताच्या मूर्तीसमोर सोनेरी प्रकाशात उभा असलेला एक तरुण... असे या पोस्टरचे लक्षवेधी रूप आहे. या तरुणाची पाठ प्रेक्षकांकडे असून, त्याच्या हातात भगवा कपडा दिसत आहे. या पोस्टरमध्ये सिद्धार्थ जाधव कोणत्या रूपात दिसणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, चित्रपटाच्या नावाप्रमाणेच हनुमंताच्या विराट मूर्तीला पोस्टरमध्ये महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. मात्र या सगळ्या दृश्यांमागची नेमकी कथा निर्मात्यांनी अद्याप गुलदस्त्यात ठेवली आहे.

'बजरंगी'मध्ये सिद्धार्थ जाधवची भूमिका नेमकी काय आहे, त्याचा हनुमंताशी संबंध कसा जोडला जातो आणि त्याच्या आयुष्यात कोणता महत्त्वाचा प्रसंग घडतो, हे अद्यापि स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे पोस्टर पाहिल्यानंतर प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन तेजस लोखंडे यांनी केले असून लेखन हेमंत एदलाबादकर यांचे आहे. अवंतिका सिने एंटरप्राइजेस या चित्रपटाची निर्मिती करत आहेत. दिग्दर्शकांच्या म्हणण्यानुसार, कथा अशा एका प्रसंगापासून सुरू होते, जो सुरुवातीपासूनच अनेक प्रश्न उपस्थित करतो. श्रद्धा आणि अविश्वास यांच्या कोंडीत सापडलेल्या एका माणसाचा हा प्रवास असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या प्रवासात त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या काही अनपेक्षित घटनांचा उलगडा होत जाणार आहे.

सिद्धार्थ जाधवने विनोदी भूमिकांपासून गंभीर व्यक्तिरेखांपर्यंत विविध छटा पडद्यावर साकारल्या आहेत. त्यामुळे 'बजरंगी'मध्ये तो कोणत्या अंदाजात दिसणार, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे, पोस्टरमधून चित्रपटाची कथा उघड न करता केवळ वातावरण आणि व्यक्तिरेखेबद्दल उत्सुकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हनुमंताची भव्य मूर्ती, किल्ला, भगवे ध्वज आणि एक गूढ तरुण या सगळ्यांची सांगड चित्रपटाच्या कथेशी कशी घातली आहे, हे चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच समोर येईल. त्यामुळे सध्या तरी 'बजरंगी'चा पोस्टर लूक प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढवणारा ठरला असून, सिद्धार्थ जाधवच्या या नव्या भूमिकेची झलक कधी मिळणार, याची प्रतीक्षा कायम आहे.

# लक्षात राहणारा अभिनेता

पडद्यावर येताना काही कलाकारांच्या नावाची मोठी चर्चा होत नाही; पण त्यांची एंट्री झाली की प्रसंगाला वेगळीच रंगत येते. मुश्ताक खान हे असेच कलाकार होते. तब्बल ४५ वर्षांच्या कारकिर्दीत ४०० हून अधिक चित्रपट आणि टीव्ही कार्यक्रमांमध्ये त्यांनी काम केले. 'हम हैं राही प्यार के'मधील मिश्रा जी असोत किंवा 'वेलकम'मधील बल्लू द हॉकी प्लेयर, त्यांच्या छोट्या भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहिल्या. मात्र या लोकप्रियतेमागचा प्रवास संघर्षाने भरलेला होता. मध्य प्रदेशातील बालाघाटमधून आलेल्या मुश्ताक यांनी डॉक्टर व्हावे, अशी कुटुंबियांची इच्छा होती. वैद्यकीय शिक्षणाचा प्रयत्न केल्यानंतर अभिनयाची ओढ अधिक तीव्र असल्याचे त्यांना जाणवले. कॉलेजमधील नाटकांपासून सुरू झालेला हा प्रवास मुंबईच्या रस्त्यांपर्यंत पोहोचला. सुरुवातीच्या दिवसांमध्ये खाण्यापिण्याची आणि राहण्याचीही सोय नसल्याने त्यांनी उपाशीपोटी रस्त्याच्या कडेला रात्री काढल्या.

रंगभूमीने त्यांना आधार दिला आणि पुढे 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है?'मधून चित्रपटात संधी मिळाली. नंतर त्यांचे काम सलीम खान यांच्या लक्षात आले आणि महेश भट्ट यांनी त्यांना आपल्या अनेक चित्रपटांमध्ये काम दिले. अमिताभ बच्चन यांच्यासोबत 'कालिया'मध्ये काम करण्याची संधी मिळाली तेव्हाही परिस्थिती सोपी नव्हती. घराचे पाच महिन्यांचे भाडे थकले होते आणि रोजच्या जेवणाचीही चिंता होती. 'कालिया'तील नऊ दिवसांच्या कामाने त्यांना केवळ पैसेच मिळाले नाहीत, तर अमिताभ यांच्यासारख्या दिग्गज कलाकाराची दादही मिळाली. पुढे अमिताभ यांनी त्यांच्या घरासाठी शिफारसपत्र दिले. अभिनयातील त्यांची क्षमता असूनही 'हम हैं राही प्यार के'मधील मिश्रा जीच्या विनोदी भूमिकेमुळे त्यांच्यावर कॉमेडी कलाकाराचा ठसा उमटला. तरीही प्रत्येक भूमिकेत त्यांनी स्वतःची छाप सोडली. 'वेलकम'मधील बल्लूने मात्र त्यांना घराघरात पोहोचवले. 'मेरी एक टांग नकली है, मैं हॉकी का बहुत बड़ा खिलाड़ी था' हा संवाद आजही प्रेक्षकांच्या आठवणीत आहे. विशेष म्हणजे या भूमिकेसाठी सुरुवातीला त्यांच्याकडे एकही संवाद नव्हता. नंतर मिळालेल्या त्या संवादाने त्यांच्या कारकिर्दीलाच नवे वळण दिले. 'वेलकम'साठी अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक दिवस काम करूनही त्यांना केवळ एक लाख रुपये मिळाले. पुढे त्यांच्या आयुष्यात अपहरणासारखा धक्कादायक प्रसंगही घडला; मात्र ते त्यातून बचावले. आयुष्यभर छोट्या-मोठ्या भूमिकांमधून प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार २४ सप्टेंबरला कर्करोगामुळे कायमचा पडद्याआड गेला. त्यांच्या भूमिका संपल्या, संवाद थांबले; पण पडद्यावर त्यांनी निर्माण केलेले क्षण आणि साध्या चेहऱ्याने मोठी छाप सोडण्याची त्यांची कला प्रेक्षकांच्या आठवणीत कायम राहणार आहे.



# 'पंचायत-५' लवकरच भेटीला

फुलेराच्या गल्ल्यांमध्ये पुन्हा एकदा प्रधानजींची धावपळ पाहायला मिळणार आहे. 'पंचायत'च्या पाचव्या हंगामाची प्रतीक्षा करणाऱ्या चाहत्यांसाठी खुद्द प्रधानजी अर्थात रघुबीर यादव यांनीच महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यामुळे मालिकेचा नवा हंगाम नेमका कधी येणार, या प्रश्नाचे उत्तर आता काहीसे स्पष्ट झाले आहे. पाचव्या हंगामाचे शूटिंग पूर्ण झाले असून, रघुबीर यादव यांनी आपल्या भागाचे डबिंगही पूर्ण केले आहे. मात्र, मालिकेच्या प्रदर्शनासाठी चाहत्यांना अद्यापि काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

रघुबीर यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या 'पंचायत'च्या पाचव्या हंगामाच्या एडिटिंगचे काम सुरू आहे. त्यामुळे मालिकेला आणखी दोन ते तीन महिने लागू शकतात, असा त्यांचा अंदाज आहे. म्हणजेच पुढील काही महिन्यांत नव्या हंगामाच्या प्रदर्शनाबाबत अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे. मात्र, निर्मात्यांकडून अद्याप अधिकृत प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे चाहत्यांना सध्या प्रधानजींच्या या अंदाजावरच समाधान मानावे लागणार आहे. यावेळी 'पंचायत'च्या कथेसोबतच मालिकेच्या संगीतामध्येही काही वेगळे प्रयोग पाहायला मिळू शकतात. संगीतकार अनुराग सैकिया यांनी यापूर्वी नव्या हंगामातील संगीताबाबत प्रयोग केले जात असल्याचे संकेत दिले होते. दरम्यान, रघुबीर यादव यांनी आपल्या सहकलाकारांचाही विशेष उल्लेख केला. 'बिनोद'ची भूमिका साकारणारे अशोक पाठक आणि 'भूषण'ची भूमिका करणारे दुर्गेश कुमार यांच्यासह मालिकेतील



कलाकारांच्या कामाचे त्यांनी कौतुक केले. आता फुलेरातील पुढची कथा कोणते नवे वळण घेते आणि प्रधानजींसह बनराकस, बिनोद आणि भूषण पुन्हा कोणता गोंधळ घालतात, याची उत्सुकता चाहत्यांना लागली आहे.

# स्त्री आवाजाचा भ्रम

आवाज ऐकून गायक की गायिका, असा प्रश्न पडावा आणि उत्तर समोर आल्यानंतर आश्चर्याचा धक्का बसावा, असे एखादे गाणे क्वचितच असते. 'कांतारा' चित्रपटातील 'कर्मा' हे गाणे याच कारणामुळे विशेष चर्चेत आले आहे. सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीच्या चुकीच्या कृत्याची किंवा गुन्ह्याची पार्श्वभूमी सांगताना हे गाणे ऐकू येते. गाण्याची चाल आणि त्यातील आवाज इतका वेगळा आहे की, ते एखाद्या महिला गायिकेने गायले असावे, असा अनेकांचा समज होतो. मात्र, हा समज चुकीचा आहे. 'कर्मा'ला आवाज देणारे गायक आहेत वेंकटेश डी.सी. आणि त्यांचा आवाजच या गाण्याची सर्वात मोठी खासियत ठरला आहे. वेंकटेश यांच्या आवाजात एक वेगळा हस्की पोत आहे. त्याच वेळी ते उंच पट्टीत गाताना आवाजात वेगळी धार आणतात, तर कमी पट्टीतही त्यांचा आवाज तितकाच सुरेल आणि प्रभावी वाटतो. त्यामुळे 'कर्मा' ऐकताना महिला आवाजाचा भास निर्माण होतो. विशेष म्हणजे हा केवळ हिंदी आवृत्तीचा परिणाम नाही. 'कांतारा'च्या संगीताची जबाबदारी बी. अजनीश लोकनाथ यांनी सांभाळली होती. चित्रपट हिंदीत प्रदर्शित होताना या गाण्यासाठी वेगळ्या गायकाचा विचार करण्याऐवजी त्यांनी मूळ गायक वेंकटेश यांच्याकडूनच हिंदी आवृत्ती गाऊन घेतली. गाण्यात त्यांच्या आवाजातून व्यक्त होणाऱ्या भावना आणि मूळ ढब हिंदी आवृत्तीतही कायम राहावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला.



# विश्व 'विक्रमी' नायक

हिंदी चित्रसृष्टीत अनेक कलाकारांनी दीर्घकाळ काम केले. मात्र, मूकपटांपासून सुरू झालेला आणि तब्बल ७० वर्षे सुरू राहिलेला पी. जयराज यांचा प्रवास आजही वेगळा ठरतो. त्यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत सुमारे ३०० चित्रपटांमध्ये अभिनय केला. विशेष म्हणजे, त्यांच्या या विक्रमाची आजपर्यंत कुणालाही बरोबरी करता आलेली नाही. १९२९ मध्ये 'स्टार क्लिंग यूथ' या मूकपटातून त्यांनी अभिनयाला सुरुवात केली. त्यानंतर 'शिकारी'मधून बोलपटांच्या युगातही त्यांनी आपली छाप कायम ठेवली. सुरुवातीच्या काळात रोमँटिक आणि ॲक्शन नायक म्हणून लोकप्रिय झालेल्या जयराज यांनी पुढे हिंदीसोबतच मराठी, गुजराती आणि उर्दू चित्रपटांमध्येही काम केले. विविध भाषांमध्ये काम करत त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील बदलता काळ जवळून अनुभवला.



पी. जयराज यांची कारकीर्द केवळ अभिनयापुरती मर्यादित नव्हती. अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता म्हणूनही त्यांनी चित्रसृष्टीत योगदान दिले. सुमारे १७० चित्रपटांमध्ये त्यांनी प्रमुख नायकाच्या भूमिका साकारल्या. 'बादबान', 'हातिम ताई', 'परदेसी' आणि 'रजिया सुलतान' यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले. १९५० आणि १९६० च्या दशकांमध्ये त्यांनी ऐतिहासिक व्यक्तिरेखाही साकारल्या. अमर सिंह राठोड, पृथ्वीराज चौहान आणि महाराणा प्रताप यांसारख्या व्यक्तिरेखा त्यांच्या अभिनयामुळे पडद्यावर जिवंत झाल्या. त्यामुळे नायकाच्या भूमिकेपासून ऐतिहासिक व्यक्तिरेखांपर्यंत त्यांच्या अभिनयाची व्याप्ती वाढत गेली.

नायक म्हणून त्यांचा शेवटचा चित्रपट 'खूनी कौन, मुजरिम कौन' हा १९६५ मध्ये प्रदर्शित झाला. मात्र त्यांचा चित्रसृष्टीशी असलेला संबंध त्यानंतरही कायम राहिला. तब्बल ३०० चित्रपट आणि ७० वर्षांची कारकीर्द यामुळे त्यांच्या नावाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. हा विक्रम आजही अबाधित असल्याचे संदर्भात नमूद करण्यात आले आहे. चित्रसृष्टीतील योगदानाची दखल घेत १९८० मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मूकपटांच्या काळात सुरू झालेली त्यांची कारकीर्द बोलपट, विविध भाषांतील चित्रपट आणि बदलत्या सिनेमासोबत पुढे जात राहिली. २००० मध्ये त्यांचे निधन झाले; मात्र ३०० चित्रपट आणि सात दशकांचा हा प्रदीर्घ प्रवास त्यांना हिंदी सिनेमातील असा दिग्गज कलाकार बनवतो, ज्यांचा विक्रम आजही चर्चेत आहे.

# 'रामायण'समोर 'गॉडजिला'चे आव्हान

रणबीर कपूरचा बहुप्रतीक्षित 'रामायण' अद्यापि प्रदर्शित व्हायचा असतानाच त्याच्या बॉक्स ऑफिस गणिताची चर्चा सुरू झाली आहे. सुमारे ४ हजार कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार होत असलेल्या या भव्य पौराणिक चित्रपटासमोर आता जपानी चित्रपट 'गॉडजिला माइनस जीरो'चे आव्हान उभे राहिले आहे. विशेष म्हणजे, दोन्ही चित्रपटांची प्रदर्शनाची तारीख एकच आहे. त्यामुळे दिवाळीच्या सुट्टीत भारतीय प्रेक्षकांसमोर एका बाजूला भारतीय पौराणिक कथेचा भव्य पडद्यावरील आविष्कार, तर दुसऱ्या बाजूला जगभरात लोकप्रिय असलेल्या 'गॉडजिला'चा ॲक्शन अवतार असे चित्र पाहायला मिळणार आहे. 'रामायण'च्या प्रदर्शनापूर्वीच 'गॉडजिला माइनस जीरो'बद्दल वाढलेली उत्सुकता या बॉक्स ऑफिस सामन्याला अधिक रंगत आणत आहे.

'गॉडजिला माइनस जीरो' हा २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गॉडजिला माइनस वन'चा पुढचा भाग आहे. ताकाशी यामाजाकी यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. नुकताच न्यूयॉर्कमध्ये या चित्रपटाचा विशेष प्रीमियर झाला. प्रदर्शनानंतर प्रेक्षकांनी उभे राहून चित्रपटाला दाद दिल्याचे संदर्भात नमूद करण्यात आले आहे. सोशल मीडियावरही परदेशी प्रेक्षकांकडून चित्रपटाचे कौतुक होत असून, काही जणांकडून त्याला ऑस्करसाठी पात्र ठरवण्याची मागणी केली जात असल्याचे सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे, यामाजाकी यांच्या 'गॉडजिला माइनस वन'ला यापूर्वी ऑस्कर पुरस्कार मिळाला होता. त्यामुळे नव्या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'गॉडजिला माइनस जीरो' हा टोहो स्टुडिओच्या गॉडजिला फ्रँचायझीमधील ३९ वा चित्रपट आहे.

या दोन मोठ्या चित्रपटांची टक्कर दिवाळीत होणार आहे. 'गॉडजिला माइनस जीरो' ६ नोव्हेंबर २०२६ रोजी जपानीसह अन्य भाषांमध्ये जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. 'रामायण' परदेशात ६ नोव्हेंबरला, तर भारतात ८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार असल्याचे संदर्भात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे दिवाळीच्या काळात प्रेक्षकांना मनोरंजनाचे दोन वेगळे पर्याय मिळणार आहेत. एका बाजूला रणबीर कपूरच्या 'रामायण'मधून भारतीय पौराणिक कथेचा भव्य आविष्कार पाहण्याची उत्सुकता आहे, तर दुसरीकडे 'गॉडजिला माइनस जीरो'च्या ॲक्शन आणि व्हिज्युअल भव्यतेची चर्चा सुरू आहे. प्रदर्शनानंतर या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा प्रतिसाद कसा मिळतो, याकडे आता चित्रपटप्रेमींचे लक्ष लागले आहे.



# फॅशनची 'धवल' क्रांती



फॅशनच्यानियेत कधी कधी रंगांची आतषबाजी करण्याची गरज नसते; एकच रंग आणि त्याची अचूक मांडणी पुरेशी ठरते. करिना कपूर खानने अलीकडच्या आपल्या लूकमधून नेमके हेच दाखवून दिले आहे. पांढऱ्या रंगाच्या साध्या पोशाखात दिसणारी करिना वरवर पाहता अगदी सहजसुंदर वाटते; पण तिच्या या लूकमध्ये डोळ्यांना दिसणाऱ्या साधेपणापेक्षा फॅशनची बारकाई अधिक आहे. 'व्हॉट वुमेन वॉन्ट'च्या नव्या पर्वासाठी केलेल्या छायाचित्रणातील तिचा हा अंदाज पाहून फॅशनप्रेमींच्या नजरा थांबल्या नसतील तरच नवल! विशेष म्हणजे, याआधी जुन्या फॅशनला नव्या ढंगात सादर करणारी करिना यावेळी मात्र अगदी स्वच्छ, आधुनिक आणि थोडी पुरुषी धाटणी असलेल्या रूपात दिसली.

पांढऱ्या रंगाचा शर्ट आणि त्याच रंगाची नेटक्या आकाराची पँट असा हा पोशाख. पण गंमत अशी की, या लूकला खास बनवण्यासाठी करिनाने रंगांची नव्हे, तर छोट्या छोट्या तपशीलांची साथ घेतली. किंचित पारदर्शक पोत असलेल्या शर्टाच्या लांब मनगटपट्ट्यांनी पोशाखाला वेगळा उठाव दिला आहे. गळ्याजवळील काळ्या मण्यांची नक्षी पांढऱ्या रंगाच्या शांततेला छानसा धक्का देते. कमरेवरचा काळा पट्टा आणि त्यावरील सोनेरी नक्षी लूकला आकार देतात. पण खरी फॅशनची चाल दिसते ती पादत्राणांमध्ये! पांढऱ्या पँटसोबत पांढरे बूट घालण्याचा सहज पर्याय टाळत करिनाने त्वचेच्या रंगाशी मिळतेजुळते टोकदार बूट निवडले. त्यामुळे पोशाख एकसुरी न वाटता अधिक उठावदार दिसतो. त्यावर सोनेरी दागिन्यांची साथ म्हणजे साधेपणावर हलकीशी चमकदार फोडणीच!



# बालांगण

## नको भेटवस्तू, आणा शालेय वस्तू!

गणेशोत्सव म्हटला की, बाप्पाचे दर्शन, प्रसाद आणि भेटवस्तूंची देवाण-घेवाण हे चित्र सर्वसाधारणपणे डोळ्यांसमोर येते. मात्र, मुंबईतील पूजा आणि दीपेश देढिया या दाम्पत्याने या परंपरेला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड देत यंदा एक वेगळीच विनंती केली आहे. त्यांच्या घरी गणपती दर्शनासाठी येणाऱ्या आप्तेष्ट-मित्रमंडळींनी भेटवस्तू किंवा मिठाईऐवजी नवीन आणि न वापरलेले शैक्षणिक साहित्य आणावे, असे त्यांनी आवाहन केले आहे. वह्या, पेन्सिली, पेन, रंग, चित्रकलेच्या वह्या आणि कंपास बॉक्स अशा साहित्याचे संच तयार करून खडवली येथील आदिवासी आश्रम शाळेतील सुमारे ४०० विद्यार्थ्यांपर्यंत ते पोहोचवण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारे उत्सवातील एक छोटीशी भेट एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी उपयोगी ठरू शकते.

देढिया दाम्पत्याचा हा उपक्रम अचानक सुचलेली कल्पना नाही. पूजा या प्रशिक्षित शेफ आणि प्रमाणित आहारतज्ज्ञ, तर दीपेश हे बँकिंग क्षेत्रात कार्यरत



आहेत. दोघेही 'मातोश्री फाउंडेशन'च्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवत आहेत.

सामाजिक

जुलै २०२३ पासून ते दर रविवारी वंचित समुदायातील १००हून अधिक लोकांना नाश्त्याचे वाटप करत आहेत. हा उपक्रम आतापर्यंत सलग १६७ रविवारपासून सुरू आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सवात त्यांनी ४० मुलांसाठी शैक्षणिक साहित्याचे संच तयार केले होते. त्या मुलांना साहित्य मिळाल्यानंतर दिसलेला आनंद त्यांच्या लक्षात राहिला आणि यंदा हा उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

४०० विद्यार्थ्यांसाठी संच तयार करणे हे मोठे काम असले, तरी प्रत्येक संचामागे शिक्षणाला हातभार लावण्याची भावना आहे.

या गणेशोत्सवाची आणखी एक विशेष बाब म्हणजे, पर्यावरणपूरकतेचा आग्रह! देढिया दाम्पत्य पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करते आणि घरच्या घरी विसर्जन करते. विसर्जनानंतर तेच पाणी झाडांसाठी वापरले जाते. आता उत्सवातील भेटवस्तूंचाही उपयोग समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गणेशदर्शनासाठी येणाऱ्या आप्तेष्ट-मित्र परिवाराकडून शैक्षणिक साहित्याची मदत स्वीकारली जाणार आहे. महाराष्ट्रातील इतर भागांत, देशात किंवा परदेशांत राहणाऱ्यांनाही पूजा आणि दीपेश देढिया यांच्याशी संपर्क साधून सहभागी होता येईल. दीपेश देढिया यांचा संपर्क क्रमांक ९८९२५८७९७५, तर पूजा देढिया यांचा क्रमांक ९९३०२६१९१३ आहे. एका वहीपासून पूर्ण संचापर्यंतची मदत एखाद्या विद्यार्थ्याच्या शाळेच्या दप्तरात शिक्षणाची नवी उमेद घेऊन जाऊ शकते.

## सौरऊर्जेवर चालणारी ट्रायसिकल

सध्याच्या काळात वाढतं प्रदूषण, इंधनाची कमतरता अशा कारणांमुळे इलेक्ट्रॉनिक तसंच सौर ऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांची गरज निर्माण झाली आहे. इलेक्ट्रॉनिक स्कूटर्स, गाड्यांची निर्मिती होऊ लागली आहे. यामुळे पेट्रोल, डिझेल भरण्याचा वेळ आणि पैसाही वाचतो. फ्रान्समधल्या 'वॅलो' नावाच्या स्टार्ट अप कंपनीने सौरऊर्जेवर चालणारी ट्रायसिकल सादर केली आहे. या ट्रायसिकलमधून चार लोक प्रवास करू शकतात. गर्दीच्या ठिकाणी गाडी नेता येत नाही. तसंच शहरांमधल्या वाहतूक कोंडीतून मार्ग काढणं कठीण होऊन बसतं. अशा वेळी ही छोटीशी ट्रायसिकल तुमच्या कामी येऊ शकते.



या ट्रायसिकलमध्ये बॅटरी बसवण्यात आली आहे. ही बॅटरी पूर्ण चार्ज केल्यानंतर १०० किलोमीटर अंतर अगदी सहज कापता येतं. यात रिचार्जेबल बॅटरी आणि सोलर पॅनल्स बसवण्यात आले आहेत. हे पॅनल्स गाडीच्या टपावर आहेत. या ट्रायसिकलमध्ये एक माणूस पुढे बसू शकतो. मागे एक प्रौढ आणि दोन मुलं बसू शकतात. म्हणजे एका कुटुंबासाठी ही ट्रायसिकल हा खूप चांगला पर्याय ठरू शकते. या ट्रायसिकलचं रुपांतर कार्गो बाईकमध्ये करता येतं. यासाठी मागच्या सीट्स काढून टाकाव्या लागतात. या भागात सामान ठेवता येतं. ही ट्रायसिकल खूपच बारीक आहे. त्यामुळे दुचाकीप्रमाणे ती चिंचोळ्या जागेतूनही चालवता येईल.

न्यू टेक



## हिमालयाची गोष्ट

आता हिमालय जिथे आहे तिथे सुमारे दहाकोटी वर्षांपूर्वी अतीप्राचीन काळातला टेथिस नावाचा समुद्र होता. त्या काळातही पृथ्वीच्या पोटातले थर गतिमान होते. या थरांना प्लेट्स म्हणतात. भारत आणि आशिया प्लेटसची टक्कर झाल्यामुळे हिमालयाची निर्मिती झाली. या प्लेटसचा एकमेकांवर बराच काळ दाब पडत राहिला. त्यामुळे त्या प्लेटसच्या कडांवरुन हिमालय पर्वत हळूहळू वर आला. हिमालय पर्वताच्या जन्माच्या सुरुवातीच्या काळात टेथिस समुद्राचा मधला भाग वरती आला. तेव्हा या पर्वताच्या उत्तर भागात ज्वालामुखीचा जन्म झाला. त्यातून लाव्हारस बाहेर पडला आणि तो लाव्हा लडाख आणि काराकोरम या नावाने सध्या ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात पसरला. हिमालयाच्या जन्माच्या दुसऱ्या अवस्थेत हिमालयाची उंची अजूनच वाढली. मध्यनूतन युगाच्या मध्यात टेथिस नावाचा हा समुद्र जवळजवळ नाहीसाच झाला.त्यावेळी हिमालयात अनेक रचनात्मक बदल झाले. पुढील कालखंडात पर्वतावरील कडे कोसळले. शिवालिक टेकड्यांवरील वने बर्फाखाली गाडली गेली. वनातील प्राणी नष्ट झाले. सुमारे वीसलक्ष वर्षांपूर्वी हिमालयाच्या निर्मितीच्या अंतिम अवस्थेला प्रारंभ झाला. या काळात हिमालयाची उंची कित्येक हजार फुटांनी वाढली. हिमालयात घडणारे भूस्खलन आणि भूकंप यांवरुन हिमालय निर्मितीची प्रक्रिया अजूनही चालूच आहे असे वाटते. वरवर शांत आणि बर्फाने आच्छादलेला हा पर्वत अजूनही क्रियाशील आहे. मात्र वाढत्या प्रदूषणामुळे सध्या जी हवामान बदलाची प्रक्रिया सुरू आहे, त्यामुळे हिमालयातील बर्फ आणि बर्फाच्या नद्या वितळायला लागल्या आहेत. पाकिस्तानात येणाऱ्या मोठमोठ्या पुराचे हेदेखील एक कारण आहे.

जाणून घ्या

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) 'व्यास सन्मान पुरस्कार' कोणत्या क्षेत्रासाठी दिला जातो?
२) हैदराबादमधला हुसेन सागर तलाव कोणी बांधला?
३) आदी शंकराचार्य यांचा जन्म कुठे झाला?
४) सीआयडीचं पूर्ण रूप काय?
५) होपमॅन कप कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
६) वैष्णवी आडकर कोणता खेळ खेळते?
७) २०२६ च्या 'आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवा'चं आयोजन कुठे करण्यात आलं होतं?
८) २०२२ मध्ये ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचं आयोजन कुठे झालं होतं?
९) तमिळनाडूची राजधानी कोणती?
१०) सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यान कुठे आहे?

उत्तर : १) साहित्य २) हझरत हुसेन शाह वाली ३) केरळमधल्या एर्नाकुलममध्ये असलेल्या कलादी येथे ४) क्राईम इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंट ५) टेनिस ६) बॉक्सिंग ७) अहमदाबाद ८) मेघालय ९) चेन्नई १०) केरळ

## अग्निपक्षी आणि इव्हान झारेविच

फार फार वर्षांपूर्वी फार वर्षांपूर्वी रशियातील सारतोवा गावात स्लोवोल्व्हस्की नावाचा एक राजा राज्य करत होता. त्याला तीन मुले होती. सर्वात धाकट्या मुलाचे नाव होतेइव्हान झारेविच. राजाने सोन्याच्या सफरचंदाची एक सुंदर बाग बनवली होती. त्याचे आपल्या या बागेवर खूप प्रेम होते. एकदा एक फायरबर्ड म्हणजे अग्निसारखा चम कणारा अद्भुत पक्षी त्या बागेत आला. बागेतील सोन्याची सफरचंदं पाहून त्या अग्निपक्ष्यालाया फळांचा मोह पडला. त्याने रोज सफरचंदांची चोरी करायला सुरुवात केली. सफरचंदं कमी होत आहेत हे राजाच्या लक्षात आले तसे त्याने आपल्या मुलांना



त्या पक्ष्याला पकडण्याची आज्ञा दिली. पण तो पक्षी जंगलात पळून गेला. त्याच्या दोन्ही मोठ्या मुलांना अग्निपक्ष्याला पकडण्यात यश मिळाले नाही. शेवटी धाकटा राजपुत्र इव्हान झारेविचधैर्याने जंगलात निघाला. वाटेत त्याला एक बोलणारा कोल्हा भेटला. त्याच्या मदतीमुळे इव्हानने त्या पक्ष्याला पकडले आणि राजासमोर हजर केले. राजाने त्या अग्निपक्ष्याला एका सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवून दिले. कुणीही

त्या पक्ष्याला हात लावू नये म्हणून त्याला सोन्याच्या घंटा लावून घेतल्या. एकदा नकळत इव्हानने तो पिंजरा उचलला. हजारो घंटा किणकिणल्या. पक्ष्याला कुणीतरी स्पर्श केला आहे हे राजाला सम जले. 'तू गुन्हा केला आहेस. तुला शिक्षा तर भोगावीच लागेल.' राजाने संगितले. दक्षिणेकडच्या जादूच्या जंगलातला सोन्याचा घोडा आणिसुंदर राजकुमारी हेलेनाला घेऊन ये. इव्हानुने एकदा बोलणाऱ्या कोल्ह्याच्या मदतीने इव्हान सर्व अडचणींवर मात करत सोन्याचा घोडा आणि राजकुमारी हेलेनालाघेऊन आला. त्याचे धैर्य, शहाणपणा,चिकाटी,आज्ञापालनाची वृत्ती यामुळे राजास्लोवोल्व्हस्कीने इव्हानचाविवाह राजकुमारी हेलेनाशी विवाह करुन दिला. सारे राज्य त्याच्या हाती सोपवले आणि सर्वजण सुखाने राहू लागले.

रशियन लोककथा

## गुरुकिल्ली भविष्याची

प्रत्येकाच्या पालकांचे स्वप्न असते की, आपल्या मुलाने उच्च शिक्षण घेऊन करिअरची उत्तुंग शिखरे गाठावीत. मात्र, बदलत्या काळात शिक्षण आणि इतर गरजांचा खर्च झपाट्याने वाढत आहे. अशा वेळी मुलांच्या भविष्यासाठी योग्य वयातच आर्थिक नियोजन करणे अत्यंत गरजेचे ठरते. पालकांची हीच गरज ओळखून भारतीय आयुर्विमा महामंडळाने (एलआयसी) तीन विशेष बाल योजना सादर केल्या आहेत. 'अमृतबाल', 'चिल्ड्रन्स मनी बॅक' आणि 'जीवन तरुण' या योजना गॅरंटेड परतावा, मनी-बॅक सुविधा देऊन पालकांच्या अनुपस्थितीतही मुलांचे शिक्षण व करिअर सुरक्षित ठेवतात.



या योजनांमध्ये मुलांच्या वयानुसार आणि गरजांनुसार विविध पर्याय उपलब्ध आहेत. 'एलआयसी अमृतबाल' (प्लॅन नंबर ८७४) योजनेत दरवर्षी प्रति हजार सम एश्योर्डवर ८० रुपये गॅरंटीड बोनस मिळतो. 'चिल्ड्रन्स मनी बॅक' (प्लॅन नंबर ८३२) योजनेत मुलाच्या वयाच्या १८ व्या, २० व्या आणि २२ व्या वर्षी प्रत्येकी २०% रक्कम मिळून उरलेली ४०% सम एश्योर्ड रक्कम २५ व्या वर्षी बोनससह दिली जाते. तर 'जीवन तरुण' (प्लॅन नंबर ८३४) योजनेत मुलाचे वय २० ते २४ वर्षे असताना लवचिक पद्धतीने दरवर्षी मनी-बॅक घेण्याचा पर्याय पालकांना मिळतो.

सेफ फ्युचर

या बाल योजनांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'प्रीमियम वेव्हर बेनिफिट (पीडब्ल्यूबी) रायडर'. दुर्दैवाने पालकांचा मृत्यू झाल्यास या रायडरमुळे पुढील सर्व हप्ते पूर्णपणे माफ होतात. एलआयसी स्वतः ते हप्ते भरून मॅच्युरिटीची ठरलेली संपूर्ण रक्कम मुलाला वेळेवर देते. याशिवाय, या योजनांवर कलम ८० सी अंतर्गत दरवर्षी भरलेल्या प्रीमियमवर १.५ लाखांपर्यंत कर सवलत आणि कलम १०(१० डी) अंतर्गत मिळणारा परतावा पूर्णपणे करमुक्त असतो. त्यामुळे ही गुंतवणूक मुलांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते.



## संधी बायोटेक्नॉलॉजीमधल्या

बायोटेक्नॉलॉजी म्हणजे जैव तंत्रज्ञान. भारतासह जगभरातच हे क्षेत्र वेगाने वाढतंय. जीवशास्त्र आणि तंत्रज्ञान यांच्या एकत्रिकरणातून बरेच बदल होत आहेत. म्हणूनच इंजिनिअरिंगचं क्षेत्र निवडणाऱ्या तरुणांना बायोटेक्नॉलॉजी भुरळ घालत आहे. बायोटेक्नॉलॉजी इंजिनिअरिंगमध्ये पदवी मिळवल्यानंतर विविध क्षेत्रांमध्ये उत्तम करिअर घडवता येईल.

एका आकडेवारीनुसार २०१६ पर्यंत भारतात बायोटेक्नॉलॉजीशी संबंधित जवळपास एक हजार कंपन्या कार्यरत होत्या. यापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक कंपन्या वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित आहेत तर १४ टक्के कृषी जैवतंत्रज्ञान, तीन टक्के बायोइंडस्ट्री, एक टक्का बायोइन्फॉरमॅटिक्स आणि १८ टक्के कंपन्या बायोटेक्नॉलॉजी सेवा क्षेत्राशी संबंधित आहेत.

सध्याचा काळ स्वयंरोजगाराचा आहे.

कोण होणार?

बायोटेक्नॉलॉजी अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही उद्योजक बनू शकता. स्वतःची कंपनी सुरू करू शकता. बायोटेक्नॉलॉजी अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही बरंच काही साध्य करू शकता. येत्या काही वर्षांमध्ये पेट्रोल, डिझेलसारख्या इंधनांची कमतरता भासणार आहे. म्हणूनच बायोटेक्नॉलॉजीचा वापर करून बायोडिझेलची निर्मिती करण्यात आली. याचा लाभ सर्व जगाला होत आहे.

बायोटेक्नॉलॉजी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्हाला विविध क्षेत्रांची कवाडं खुली होतात. तुम्ही वेगाने पुढे जाऊ शकता. दहावीनंतर बायोटेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. यासोबतच पदवी, मास्टर्स आणि पीएचडीपर्यंतचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## ज्ञानाचे खुले दालन!

नागालँडच्या डोंगररांगांमध्ये वसलेले किगवेमा हे गाव अंगामी नागा संस्कृतीसोबतच एका अनोख्या उपक्रमामुळे ओळखले जाते. जुलै २०२१ मध्ये अखो आणि थेफुकॅली फिरा या दोन भावांनी गावात एका सामुदायिक ग्रंथालयाची पायाभरणी केली. मोजक्या पुस्तकांपासून सुरू झालेल्या या उपक्रमाने लोकचळवळीचे रूप घेतले असून, आज येथे ६००हून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याला कोणतेही कुलूप नाही, वाचकांची नावे नोंदवण्यासाठी नोंदवही नाही आणि पुस्तक घरी नेण्यासाठी किचकट नियम नाहीत! कोणत्याही व्यक्तीने यावे, आवडीचे पुस्तक निवडावे, निवांत वाचावे आणि प्रामाणिकपणे परत आणावे, असा साधा नियम येथे पाळला जातो. पुस्तके हरवतील या भीतीपेक्षा माणसांच्या प्रामाणिकपणावर येथे अधिक विश्वास ठेवला जातो, ज्यामुळे ज्ञानाची देवाणघेवाण ही संपूर्ण गावाची सामुदायिक जबाबदारी बनली आहे.

या ग्रंथालयाचे वाचकही तितकेच रंजक आहेत. शाळकरी मुले नवीन गोष्टींच्या शोधात येतात, तर गावातील ज्येष्ठ मंडळी पुस्तकांच्या सहवासात वेळ घालवण्यासाठी जमतात. यामुळे एकाच छताखाली वेगवेगळ्या पिढ्यांची भेट घडते आणि संवादाची नवी दारे उघडतात. लहान मुले पुस्तकातील गोष्टी मोठ्यांना सांगतात, तर ज्येष्ठ मंडळी अनुभवातून त्याला अर्थपूर्ण पैलू दाखवतात. अशा अनमोल क्षणांतून लहान मुलांमध्ये वाचनाची सवय रुजते आणि दोन पिढ्यांमधील अंतर कमी होते. या पुस्तकसंग्रहात गावकऱ्यांसह बाहेरील हितचिंतकांचेही मोलाचे योगदान मिळाले आहे. त्यामुळे हे ग्रंथालय उभारायची जबाबदारी संपूर्ण समाजाची बनली आहे. या उपक्रमाची प्रेरणा घेऊन शेजारील गावांनीही असे



विशेष

पुस्तकसंग्रह सुरू केले असून, या छोट्याशा गावात पेटलेली वाचनाची मशाल आता परिसरात ज्ञानाचा प्रकाश पसरवत आहे.

किगवेमाच्या या उपक्रमामुळे भव्य इमारत, महागडी साधने किंवा कठोर नियमावली असेल तरच शिक्षण घडते, हा गैरसमज दूर होतो. एक छोटी जागा, काही पुस्तके आणि माणसांचा परस्परांवरील विश्वासएवढ्या साध्या गोष्टींमधूनही ज्ञानाची मोठी चळवळ उभी राहू शकते, हे या गावाने दाखवून दिले आहे. येथे पुस्तक उचलताना परवानगी लागत नाही आणि परत करताना भीती वाटत नाही; कारण या व्यवस्थेचा खरा पहारेकरी कुलूप नसून माणसांचा प्रामाणिकपणा आहे. आजच्या काळात वस्तू सांभाळण्यासाठी कुलपे वाढत असताना, ज्ञान वाटण्यासाठी विश्वास वाढवणारा हा प्रयोग थेट हृदयाला भिडतो. किगवेमा गावाने पुस्तकांना कपाटात बंद न ठेवता ती माणसांच्या हातात दिली. त्यामुळे हे ग्रंथालय केवळ ६०० पुस्तकांचे घर नसून, 'ज्ञान वाटल्याने वाढते' या विचाराचे जिवंत उदाहरण बनले आहे.

## मंदिरांचं शहर : वाराणसी



वाराणसी हे उत्तर प्रदेशातलं एक शहर. वाराणसीला धार्मिक महत्त्व आहे. काशी विश्वेश्वरासह बरीच मंदिरं वाराणसीमध्ये आहेत. इथली गंगा आरती खूप प्रसिद्ध आहे. गंगा घाटावर गंगा नदीची आरती केली जाते. ही आरती बघण्यासाठी तसंच यात सहभागी होण्यासाठी पर्यटक, भाविक या ठिकाणी येतात. वाराणसी बनारस आणि काशी या नावांनीही ओळखलं जातं. वरुणा आणि असी या दोन नद्यांमुळे या शहराला वाराणसी हे नाव पडलं.

वाराणसी उत्तर प्रदेशमधलं प्रमुख शहर आहे. मकर संक्रांत आणि वसंत पंचमीला वाराणसीमध्ये भाविकांची गर्दी झालेली असते. महाशिवरात्रीचा उत्सवही इथे मोठ्या उत्साहात साजरा होतो. महाशिवरात्रीला काशी विश्वेश्वराच्या मंदिरात भाविकांची गर्दी झाल्याचं पहायला मिळतं.

वाराणसीची लोकसंख्या बारा लाखांच्या घरात आहे. भारतीयच नाही तर परदेशी पर्यटकही वाराणसीला जातात. इथे खाण्यापिण्याचीही चंगळ असते. कचोरी सब्जी, चुरा मटर, बनारसी पान, लस्सी, विविध प्रकारच्या मिठाया, समोसे इथे चाखता येतात. वाराणसीमध्ये अनेक देवी-देवतांची मंदिरं असल्यामुळे याला मंदिरांचं शहर म्हणता येईल.

सफर शहरांची

### दोस्त हे मस्त

#### प्राण्यांबद्दल थोडंसं...



प्राण्यांबद्दलच्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. आता आपल्या आसपास उडणाऱ्या फुलपाखरांचंच बघा. या फुलपाखरांचं आयुष्य २० ते ४० दिवसांचंच असतं. मनीमाऊच्या शेपटीत तिच्या शरीरातली जवळपास १० टक्के हाडं असतात. काही रेनडिअर एक वर्षात तीन हजार मैल अंतर पार करतात. कुत्र्याची पिल्लं खूप गोड असतात. पण एका वर्षातच पिल्लं प्रौढ होतात. कांगारू मागच्या दिशेला चालू शकत नाहीत.

### खादाडी

#### मस्त चीज मॅगी



तुम्हाला मॅगी आवडत असेल. पण प्रत्येक वेळी फक्त मसाला मॅगी खाण्याचा कंटाळा येतो. अशा वेळी वेगवेगळ्या पद्धतींनी मॅगी बनवता येईल. आज आपण चीज मॅगी कसं बनवायचं ते बघू या. यासाठी नूडल्सचं एक पाकीट, एक कांदा लांब चिरून घ्या, एक टोमॅटो, अर्धी सिमला मिरची, अर्धी वाटी उकडलेले स्वीट कॉर्न, दोन चीज क्यूब आणि तेल हे साहित्य घ्या. सर्व भाज्या चिरून घ्या. सर्वात आधी एका कढईत तेल गरम करा. त्यात चिरलेला कांदा आणि सिमला मिरची घाला. दोन मिनिटं परतून घ्या. मग उकडलेले स्वीट कॉर्न आणि टोमॅटो घाला. चवीनुसार तिखट आणि मीठ घाला. परतल्यानंतर त्यात पाणी घाला. मग मॅगी आणि मसाला घालून हलवून घ्या. मॅगी शिजू द्या. मग यात चीज क्यूबचे तुकडे घाला. चीज किसूनही घालता येईल. चीज वितळल्यावर मस्तपैकी चीज मॅगी खा.

### स्टडी टिप्स

#### टाळा रात्रीचं जागरण



तुम्ही रात्री जागून अभ्यास करता का? असं अजिबात करू नका. रात्री जागल्यामुळे स्मरणशक्तीवर परिणाम होतो. अभ्यास समजून घेताना अडचणी येतात. अभ्यास लक्षात ठेवण्यासाठी मेंदू ताजातवाना असणं आणि पुरेशी झोप मिळणं गरजेचं आहे. झोप झाल्यावर मेंदू ताजातवाना राहतो. झोपेमुळे मेंदू नव्या गोष्टी शिकण्यासाठी सज्ज होतो. रात्री जागरण केल्यामुळे मेंदूची नव्या गोष्टी शिकण्याची क्षमता जवळपास ४० टक्क्यांनी कमी होते. रात्रभर जागल्यानंतर मेंदूला आपली क्षमता परत मिळवायला चार दिवस लागतात ही बाब संशोधनातून समोर आली आहे. त्यामुळे रात्री वेळेत झोपा आणि सकाळी लवकर उठा. सकाळच्या वेळी मेंदू ताजातवाना असतो. तेव्हा अभ्यास करा.

### योगा टाईम

#### करा सर्वांगासन



योगासनं फक्त मोठ्यांनीच करायची असतात असं नाही तर लहान मुलांनाही योगामुळे खूप फायदा होऊ शकतो. या वयात तुमच्या शरीराची वाढ होत असते. म्हणूनच लहान मुलांनी सर्वांगासन करणं गरजेचं आहे. या आसनामुळे शरीराची वाढ चांगल्या पद्धतीने होऊ शकते. या आसनामुळे संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो. त्यामुळे नियमित तपणे सर्वांगासन करा आणि खूप मोठे व्हा.

# निवडक

## बुद्धिबळ विश्वात तिरंगा उंचावला

**समरकंद :** उझबेकिस्तानमधील समरकंद येथे नुकत्याच पार पडलेल्या ४६व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय



बुद्धिबळपटूंनी दमदार कामगिरी करत सलग तिसऱ्यांदा गॅपरिंदाश्विली करंडकावर आपले नाव कोरले. खुल्या गटात भारताने रौप्यपदक, तर महिला गटात कांस्यपदक पटकावत सर्वसाधारण सांघिक विजेतेपदाची हॅट्रिक साधली. चेन्नई येथे २०२२ आणि बुडापेस्ट येथे २०२४ मध्ये झालेल्या ऑलिम्पियाडनंतर भारतीय संघाने सलग तिसऱ्यांदा गॅपरिंदाश्विली करंडक पटकावला आहे. खुल्या गटातील भारतीय संघात अर्जुन इरिगेसी, आर. प्रज्ञानंद, निहाल सरीन, जगज्जेता डी. गुकेश आणि विदित गुजराथी या ग्रँडमास्टरचा समावेश होता. महिला संघाचे नेतृत्व प्रशिक्षक ग्रँडमास्टर स्वयंम्स मिश्रा यांनी केले. कोनेरू हंपी, दिव्या देशमुख आणि आर. वैशाली या ग्रँडमास्टरसह वंतिका अग्रवाल आणि सविता श्री या आंतरराष्ट्रीय मास्टरचा समावेश होता. सविता श्रीने पदार्पणाच्या ऑलिम्पियाडमध्ये पाचव्या पटावर अपराजित राहत १० पैकी ९ गुण मिळवत वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले. जॉर्जियाविरुद्धच्या अंतिम फेरीत भारतीय महिला संघाने बरोबरी साधल्याने संघाला कांस्यपदक मिळाले. दिव्या देशमुखने दुसऱ्या पटावर रौप्यपदक, तर डी. गुकेशने रौप्यपदक पटकावले. कोनेरू हंपी आणि वंतिका अग्रवाल यांनी कांस्यपदकांची कमाई केली.

## धीरज-कुमकुमच्या जोडीने जिंकले रौप्यपदक

**जपान :** भारतीय तिरंदाज धीरज बोम्मादेवरा आणि कुमकुम



अनिल मोहोड यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र रिकर्व्ह प्रकारात इतिहास रचला. धीरज आणि कुमकमच्या जोडीने अंतिम फेरीत रौप्य पदकावर नाव कोरले. सुवर्णपदकाच्या सामन्यात भारताला चीनकडून ३-५ असा पराभव पत्करावा लागला. धीरज आणि कुमकुम यांचे रौप्य पदक हे या प्रकारातील भारताचे पहिले आशियाई क्रीडा पदक आहे. तिरंदाजीच्या मिश्र रिकर्व्ह प्रकारात, कुमकुम आणि धीरज चीनविरुद्धच्या पहिल्या दोन सेटमध्ये अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकले नाहीत. यात चिनी जोडीने पहिला सेट ३८-३७ असा जिंकून २-० अशी आघाडी घेतली, त्यानंतर भारतीय जोडीने दुसऱ्या सेटमध्ये शानदार पुनरागमन केले, परंतु सामना ३७-३७ असा बरोबरीत सुटल्याने चिनी जोडी सामन्यात २-० ने पुढे राहिली. चिनी जोडीने पुन्हा तिसरा सेट ३७-३६ अशा फरकाने जिंकून २ गुण मिळवले आणि चौथा सेटही ३७-३७ असा बरोबरीत सुटताच, भारतीय जोडीला ५-३ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले आणि त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. पदक जिंकणारी १७ वर्षीय भारतीय तिरंदाज कुमकुम अनिल मोहोड हिने शानदार कामगिरी करत इतिहास रचला आहे.

## फारुख चौधरीचे पुनरागमन

**मुंबई :** मुंबई सिटी एफसीने क्लबमध्ये फारुख चौधरीच्या पुनरागमनाची पुष्टी करताना आनंद व्यक्त केला आहे. या आक्रमक फुटबॉलपटूने क्लबसोबत २०२६-२७ च्या हंगामाच्या अखेरपर्यंतचा करार केला आहे.महाराष्ट्रातील अंबरनाथ येथे जन्मलेला फारुख 'आयलंडर्स' साठी नवीन नाही. त्याने यापूर्वी २०२०-२१ च्या इंडियन सुपर लीग हंगामात क्लबसाठी ६ सामने खेळले आहेत.त्यानंतर त्याने जमशेदपूर एफसी आणि चेन्नईयन एफसीचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत इंडियन सुपर लीगमध्ये १२६ सामने खेळले असून, ७ गोल आणि १० असिस्ट्सची नोंद केली आहे.फारुखने भारतीय राष्ट्रीय संघाचेदेखील प्रतिनिधित्व केले असून, 'ब्लू टायगर्स'साठी २४ सामने खेळताना ३ गोल केले आहेत. आपल्या पुनरागमनाबाबत फारुख म्हणाला की, मुंबई सिटीमध्ये परतणे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. माझ्या या क्लबसोबत खूप चांगल्या आठवणी आहेत आणि परत आल्याचा मला आनंद आहे. मी नवीन हंगामासाठी, संघासोबत कठोर परिश्रम करण्यासाठी आणि मैदानावर माझे सर्वोत्तम योगदान देण्यासाठी उत्सुक आहे. आमचा संघ मजबूत आहे आणि आमची उद्दिष्टे मोठी आहेत. मी संघाला ध्येय गाठण्यात जास्तीत जास्त मदत करू इच्छितो.



## नौकानयनात भारताने रचला इतिहास

**नागोया :** एशियन गेम्समध्ये भारताने सेलिंगमध्ये (नौकानयन) आपले पहिले पदक जिंकले. गुरुवारी पुरुषांच्या स्किफ इन्वेंटमध्ये मनु फ्रांसिस आणि प्रिंस कुरिसिंकल नोबलने रौप्य पदक प्राप्त केले. ९ शर्यतीनंतर भारताने येथे दुसरे स्थान प्राप्त केले. चीन यात पहिल्या स्थानी राहिला. भारतीय जोडीने २३ प्वॉईंट्ससह रेगाटामध्ये स्पर्धा संपवली. चीनची जोडी वेन जायडिंग आणि लियू तियानने १६ पॉइंट्ससह सुवर्ण पदक जिंकले. भारतीय जोडी त्यांच्यापासून फक्त चार पॉइंट्सने पिछाडीवर राहिली. हाँगकाँग आणि चीनीची जोडी अकीला ल्यूक सकाई आणि रसेल आयल्सवर्थ २४ पॉइंट्ससह तिसऱ्या स्थानी राहिली. फ्रान्सिस आणि नोबलने सलग चांगली कामगिरी केली. त्यांचा सर्वात चांगला निकाल तिसऱ्या रेसपर्यंत गेला, जिथे त्यांनी विजय प्राप्त केले. भारतीय सेलर्सनेही तिसरी शर्यत जिंकली व इतर रेस म्हणजेच १, ५ आणि ९ व्या मध्ये ते दुसऱ्या स्थानी राहिले. ९व्या रेसमध्ये त्यांनी एकूण २९ पॉइंट्स प्राप्त केले. ८ व्या रेसमध्ये ते सहाव्या स्थानी राहिल्याने त्यांचा नेट स्कोर २३ राहिला.

### गोल्डन गर्ल्स!...चक दे इंडिया...

# भारताच्या लेकींनी ४४ वर्षांनी जिंकले सुवर्णपदक

**| जपान | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने सुवर्ण अक्षरांनी इतिहास रचला आहे. अत्यंत चुरशीच्या आणि श्वास रोखून धरणाऱ्या अंतिम लढतीत भारतीय महिलांनी यजमान चीनचा १-० असा पराभव करत मानाच्या सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या सुवर्ण विजयासोबतच भारतीय महिला हॉकी संघाने २०२८ मध्ये होणाऱ्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी थेट पात्रता मिळवली आहे.



पहिल्या क्वार्टरमध्ये दहाव्या मिनिटाला साक्षीने दिलेल्या सुरेख पासवर लालरेमसियामीने अप्रतिम वळसा घेत जोरदार 'टोमाहॉक' रिव्हर्स फटका मारला. चेंडू थेट चीनच्या गोलजाळ्यात विसावला आणि भारताने १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. एका गोलने पिछाडीवर पडल्यानंतर चीनने भारतीय गोलपोस्टवर एकापाठोपाठ एक जोरदार हल्ले चढवले. मात्र, भारतीय बचाव फळी भिंतीसारखी उभी राहिली.चीनला पेनल्टी स्ट्रोक मिळाला. मात्र, भारताची 'द वॉल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सविता पुनियाने डाव्या बाजूला अचूक सूर मारत झांग यिंगचा पेनल्टी स्ट्रोक अडवला. नवनीत कने गोललाइनवरून चेंडू बाहेर काढत दोन वेळा निश्चित गोल रोखले. शिल्पी डबास आणि अनुभवी सुशीला चानू यांनी चिनी आक्रमकांना सातत्याने अपयशी ठरवले.सामन्याच्या अखेरच्या ५७ व्या मिनिटाला चीनने गोलकीपर लिऊ पिंगला मैदानाबाहेर काढत अतिरिक्त आक्रमक खेळाडू उतरवून बरोबरी साधण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावली. ५८ व्या मिनिटाला सलिमा टेटेने प्रतिहल्ल्यात आघाडी घेत चीनच्या रिकाम्या गोलपोस्टवर चढाई केली, तर दुसऱ्या टोकाला सविताने पुन्हा एकदा हात लावून चीनचा अखेरचा प्रयत्न हाणून पाडला.



1982



2026

भारताच्या या ऐतिहासिक सुवर्ण विजयाने संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून महिला हॉकी संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तब्बल ४४ वर्षांची प्रतीक्षा संपवत भारतीय संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकाचा दुष्काळ संपवला. याआधी १९८२मध्ये नवी दिल्लीत झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने महिला हॉकीचे सुवर्णपदक जिंकले होते.

## स्टार बॉक्सर लव्हलिना बोरगोहेनने मिळवले गोल्ड मेडल

**| नागोया | वृत्तसंस्था |**

भारतीय स्टार बॉक्सर लव्हलिना बोरगोहेनने तिच्या खास वाढदिवसानिमित्त देशाला एक सुवर्ण भेट दिली. आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मधील महिलांच्या ७५ किलो वजनी गटाच्या विजेतेपदाच्या लढतीत, लव्हलिनाने बलाढ्य चीनी बॉक्सर बाओ जियायीला पराभूत करून सुवर्णपदक जिंकले. आशियाई बॉक्सिंग एलिट चॅम्पियनशिप विजेती बाओ जियायीविरुद्ध, लव्हलिनाने सुरुवातीपासूनच संयम आणि अचूक टायमिंगचे उल्लेखनीय प्रदर्शन करत आपल्या प्रतिस्पर्धीला पुनरागमन करण्याची



कोणतीही संधी दिली नाही.

सुवर्णपदकाच्या लढतीच्या पहिल्या फेरीत, चीनी बॉक्सर बाओ जियायीने आक्रमक सुरुवात करत मुक्क्यांचा भडीमार केला. तथापि, लव्हलिनाने आपला संयम राखला आणि बाओच्या प्रत्येक हल्ल्याला जोरदार प्रतिहल्ले करून प्रत्युत्तर दिले. लव्हलिनाने रिंगमध्ये अंतर आणि टायमिंगचा उत्कृष्ट वापर केल्यामुळे पंचांनी पहिली फेरी ३-२ अशी तिच्या बाजूने नोंदवली, ज्यामुळे तिला सामन्यात सुरुवातीलाच आघाडी मिळाली.

चिनी बॉक्सरने दुसऱ्या फेरीत अधिक आक्रमकता दाखवली, पण लव्हलिनाचा आत्मविश्वास दिसून आला. तिने अचूक आणि प्रभावी ठोसे मारून दुसरी फेरी ४-१ ने जिंकली आणि तीनपैकी दोन फेऱ्यांनंतर २-० अशी आघाडी घेतली. लव्हलिनाने अंतिम आणि तिसऱ्या फेरीतही पूर्ण नियंत्रण राखले. बाओला पुढे येऊ देऊन प्रतिहल्ला करण्याची तिची रणनीती पूर्णपणे यशस्वी ठरली आणि तिने एकमताने विजय मिळवला.

## आता दिवसाच्या कसोटीतही पिंक बॉलचा वापर

- **ओव्हरथ्रोची व्याख्याही बदलली**
- **महिला क्रिकेटसाठी चेंडूचे निकष**

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इंटरनॅशनल क्रिकेट काउंसिलने क्रिकेटचे अनेक नियम जारी केले आहे, जे गुरुवार १ ऑक्टोबरपासून लागू झाले आहेत. हे नियम सध्या सुरू असलेल्या कोणत्याही आंतरराष्ट्रीय मालिकेत लागू होणार नाहीत, मात्र १ ऑक्टोबर वा त्यानंतर सुरू होणाऱ्या सर्व मालिकांना हे नियम लागू होतील.यात सर्वात महत्त्वाचा नियम असा की, फलंदाजीदरम्यान वेळ फुकट घालवल्यास क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला ५ धावा पेनल्टीच्या रुपात मिळतील.

तसेच वनडे व टी-२० इंटरनॅशनलमध्ये हेड कोच ड्रिंक्स ब्रेकदरम्यान मैदानात येऊ शकतील. महिला क्रिकेटमध्ये ही व्यवस्था अगोदरपासून लागू होती. त्यासोबतच चेंडूची साइज व वजनाच्या नियमातही बदल करण्यात आला आहे.



आता फलंदाजी करताना वेळ फुकट घालवल्यास अथवा खराब केल्यास फलंदाजाला अगोदर इशारा दिला जाईल. असे पुन्हा केल्यास दुसऱ्यांदा इशारा दिला जाईल, तिसऱ्यांदा असे झाल्यास त्यांच्या धावसंख्येतील ५ धावा कापल्या जातील व त्या प्रतिस्पर्धी संघाच्या धावसंख्येत जमा होतील.

**दिवसाच्या कसोटीतही पिंक बॉलचा वापर**

खराब प्रकाशामुळे येणाऱ्या अडचणी पाहता दोन्ही संघ आपापसातील सहमतीने पिंक बॉलचा वापर करू शकतात. याचाच अर्थ आता कमी प्रकाश अथवा खराब प्रकाशामुळे सामना थांबणार नाही. गरज पडल्यास संघ पिंक बॉलने दिवसाच्या कसोटीतही वापर करू शकतात. याआधी फक्त डे-नाईट कसोटी सामन्यातच पिंक बॉलचा वापर व्हायचा.

**दिवसातील अखेरचे षटक**

कसोटी सामन्यात अखेरच्या षटकांत विकेट पडल्यानंतर दिवसाचा खेळ आपोआप संपणार नाही. षटकांतील इतर चेंडू शिल्लक असतील आणि खेळण्याची स्थिती असेल, तर षटक पूर्ण केले जाईल.

**ओव्हरथ्रोची व्याख्या**

ओव्हरथ्रोची व्याख्या स्टंप्सच्या दिशेने चेंडू फेकण्याच्या जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नाप्रमाणे केली जाते. चुकीच्या क्षेत्ररक्षणाचा समावेश करण्यात आलेला नाही.

**पूर्ण नियंत्रण**

रन आउट वा स्टम्पिंगसाठी बेल्स पाडताना क्षेत्ररक्षकांचे चेंडूवर पूर्ण नियंत्रण असणे गरजेचे आहे. फक्त बेल्सला हात लागण्याला वैध ठरवले जाणार नाही.

**महिला क्रिकेटसाठी चेंडूचे निकष**

टणक आकार आणि वजनाच्या विशिष्ट सूचनेअंतर्गत पुरुष, महिला आणि ज्यूनियर क्रिकेट चेंडूचे तीन वेगवेगळ्या श्रेणी स्थापित करण्यात येतील.

**टी-२० मधील डावाचा ब्रेक**

सामन्याच्या मध्ये १५ मिनिटांचा निश्चित अंतर लागू करण्यात आले आहे. जर काही कारणास्तव सामन्याची वेळ कमी केली असेल, तर ती कमी करून १० मिनिटांची केली जाऊ शकते.

### राज्य मानांकन स्पर्धेत श्रुती-अभिजीतला प्रथम मानांकन



**| मुंबई | प्रतिनिधी |**

सारस्वत ब्राम्हण समाज, मुंबई यांच्यावतीने शुक्रवारी २ ऑक्टोबर २०२६ रोजी पहिली राज्य मानांकन कॅरम स्पर्धेला सुरुवात होत आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने शांती निवास वातानुकूलित हॉल, चर्नी रोड ( पूर्व ), मुंबई येथे ही स्पर्धा रंगणार आहे.

शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन झाल्यानंतर पुरुष एकेरी गटाच्या सामान्यांनी स्पर्धेला सुरुवात होणार आहे. तर महिला एकेरीचे सामने ३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १ वाजल्यापासून खेळवण्यात येतील. सिस्का बुलेट शॉट कॅरम व सोंगट्यांचा वापर या स्पर्धेत करण्यात येणार आहे. पुरुष एकेरी गटात पुण्याच्या अभिजीत त्रिपनकर तर महिला एकेरी गटात पालघरच्या श्रुती सोनावणेला प्रथम मानांकन देण्यात आले आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या युट्युब चॅनलवर या स्पर्धेच्या सामन्यांचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

## आशियाई गेम्सच्या गोल्ड मेडलसाठी महामुकाबला

**| नागोया | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येणार आहेत. पुरुषांच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळणार असून, या सामन्यात सुवर्णपदकासाठी लढत होणार आहे.

आता आशियाई क्रीडा स्पर्धेच्या सुवर्णपदकासाठी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना रंगणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुवर्णपदकाचा सामना हा सामना शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार खेळवला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार सकाळी १० वाजता हा सामना सुरू होईल. सामना जपानमधील कोरोगी स्पोर्ट्स पार्क, निशिन येथे खेळवला जाणार आहे.

म्हणजेच आता भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये थेट सुवर्णपदकासाठी सामना होणार आहे. भारतीय संघ आशियाई क्रीडा स्पर्धेचा गतविजेता आहे. त्यामुळे आता पाकिस्तानविरुद्धचा सामना जिंकून पुन्हा एकदा सुवर्णपदक रिळवण्याची संधी भारताकडे आहे.

### अंडर १७ वर्ष गर्ल्स एअर पिस्तूल स्पर्धा

## सुप्रिता सुबुद्धीला सुवर्ण पदक

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई यांचे द्वारा आयोजित विभागीय शालेय शुटींग स्पर्धा २०२६/२०२७ नेमबाजी स्पर्धा ठाणे येथील प्रिसीहोल शुटींग रेंज येथे २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान संपन्न झाली. या स्पर्धेत इंडियन मॉडेल अँड ज्युनियर कॉलेजची विद्यार्थिनी सुप्रिता सुबुद्धी हिने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व



करत अंडर १७ वर्ष गर्ल्स एअर पिस्तूलमध्ये सुवर्ण पदक मिळवले.

संस्कृती पवार या स्पर्धेत ९ व्या स्थानावर राहिली तसेच अंडर १४ वर्ष गर्ल्स ज्ञानेश्वरी शिंदे हिला पिस्तुल मध्ये ४ थ्या स्थानावर समाधान मानावे लागले. सुप्रिता सुबुद्धी हिला आंतरराष्ट्रीय ज्युरी जितेश कदम यांच्या हस्ते सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत तिघींनी इंडियन मॉडेल स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज उलवा, येथील सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगड रेंजवर प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाज किशन खारके व राष्ट्रीय नेमबाज व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अलंकार कोळी तसेच विश्वजीत यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण घेतले आहे.

## इराणी चषकात रेस्ट ऑफ इंडिया २३७ धावांवर सर्वबाद

**| श्रीनगर | वृत्तसंस्था |**

इराणी कपच्या पहिल्या दिवशी रेस्ट ऑफ इंडियाचा पहिला डाव २३७ धावांवर आटोपला. कर्णधार ऋषभ पंत केवळ १० धावा करून बाद झाला. संघासाठी शिखर मोहनने ६०, तर स्मरण रविचंद्रनने ६८ धावांची खेळी केली.प्रत्युत्तरात जम्मू-काश्मीरने दिवसाचा खेळ संपेपर्यंत ७ षटकांत २१ धावांवर २ गडी गमावले. संघ रेस्ट ऑफ इंडियाच्या पहिल्या डावापेक्षा अजून २१६ धावांनी पिछाडीवर आहे.

रेस्ट ऑफ इंडियाची सुरुवात चांगली झाली नाही. संघाने चौथ्याच षटकात ८ धावांच्या स्कोअरवर सनत सांगवानचा गडी गमावला.सुदीप कुमार घरामी देखील ३२ धावांच्या स्कोअरवर पॅव्हेलियनमध्ये परतला. सरफराज खान आणि शिखर मोहन यांनी डाव सावरला. सरफराज खानने ९७ चेंडूंमध्ये ४५ धावांची खेळी केली. त्याने आपल्या खेळीत ५ चौकार लगावले. त्याने शिखरसह तिसऱ्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी केली आणि संघाची धावसंख्या १०० धावांच्या पुढे नेली.

### ४८ वर्षांचा रेकॉर्ड मोडला | रिकर्व्ह महिला टीम इव्हेंटमध्ये भारताला पहिले गोल्ड

## कुमकुम-अंकिता-कीर्तीने रचला इतिहास

**| नागोया | वृत्तसंस्था |**

भारतीय महिला तिरंदाजी संघाने आशियाई क्रीडा २०२६ मधील रिकर्व्ह प्रकारात इतिहास रचला. भारताने अंतिम सामन्यात १० वेळच्या ऑलिम्पिक चॅम्पियन दक्षिण कोरियाला ५-३ ने पराभूत करून महिलांच्या सांघिक रिकर्व्ह तिरंदाजी प्रकारात प्रथमच सुवर्णपदक जिंकले.

कुमकुम मोहाड, अंकिता भाकत आणि कीर्ती या त्रिकुटाने भारतासाठी उत्कृष्ट कामगिरी करत संघाला अंतिम सामन्यात ऐतिहासिक विजय मिळवून दिला. पहिले दोन सेट बरोबरीत



सुटल्यानंतर, भारताने तिसऱ्या सेटमध्ये दक्षिण कोरियाच्या महिला तिरंदाजी संघाला पराभूत करून सुवर्णपदकार नाव कोरले.

भारतीय महिला तिरंदाजी संघाने उपांत्य फेरीत चीनला ५-१ ने पराभूत करून पहिल्यांदाच रिकर्व्ह प्रकारातील सुवर्णपदकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात भारतीय संघाचा सामना जगातील सर्वात बलाढ्य संघांपैकी एक असलेल्या, १० वेळा ऑलिम्पिक चॅम्पियन दक्षिण कोरियाशी झाला. भारतासाठी हे आव्हान सोपे नव्हते, परंतु कुमकुम, कीर्ती आणि अंकिता यांनी उत्कृष्ट कामगिरी करत पहिल्या दोन सेटमध्ये कोरियन संघाला कडवी झुंज दिली. यामुळे पहिले दन सेट बरोबरीत सुटले.

पहिला सेट अत्यंत रोमांचक होता, ज्यात दोन्ही संघांनी प्रत्येकी ५४ गुण मिळवले. त्यानंतर भारतीय त्रिकुटाने दुसऱ्या सेटमध्येही आपली प्रभावी कामगिरी कायम ठेवली. दुसरा सेट देखील ५६-५६ असा बरोबरीत संपला, त्यामुळे दुसऱ्या सेटच्या शेवटी दोन्ही संघ बरोबरीत राहिले.भारतीय महिला रिकर्व्ह संघासाठी तिसरा सेट निर्णायक ठरला. कुमकुम, कीर्ती आणि अंकिता यांनी दक्षिण कोरियाच्या विश्वविजेत्या कांग चेयॉन्ग, ओह येजिन आणि ली युनजी यांच्या संघावर दबाव आणला. कीर्तीने भारतासाठी सुरुवातीलाच ८ गुण मिळवले. याचे तिने नंतर निर्णायक ९ गुणांमध्ये रूपांतर केले. भारताने तिसरा सेट ५५-५२ असा जिंकून सामन्यात ४-२ अशी आघाडी घेतली. त्यानंतर चौथ्या आणि निर्णायक सेटमध्ये कोरियन संघाने या सेटमध्ये ५४ गुण मिळवले होते.

त्यामुळे सुवर्णपदक मिळवण्यासाठी भारताला हा सेट किमान बरोबरीत सोडवणे आवश्यक होते. भारतीय त्रिकुटाने दबावाखाली उत्कृष्ट कामगिरी करत चौथा सेट बरोबरीत सोडवला आणि सामना ५-३ ने जिंकला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)